# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV (CBCS)

## तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र.III

# पाश्चात्त्य तत्त्वज्ञान

## विषय कोड : UAPHI402

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व प्रमुख,
मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. नारायण शंकर गडदे**
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
तत्त्वज्ञान विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. रामेश्वर रावसाहेब कणसे**
सहाय्यक प्राध्यापक,
एम. जी. एम. महाविद्यालय,
संभाजी नगर

: **प्रा. संपदा चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापक,
साठे महाविद्यालय, विले पार्ले, मुंबई

**मे २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सॉक्रेटिसपूर्व आणि सोफिस्ट | ०१ |
| २. | सॉक्रेटिसची अभ्यासपद्धती व नीतिशास्त्र | २१ |
| ३. | ॲरिस्टॉटलचा कारणता सिद्धांत (सहेतुकवाद कल्पनेचा संदर्भ), रुपबंध आणि जडद्रव्य ; व्यक्तता आणि शक्तीगर्भता | ३९ |
| ४. | पीटर अबेलर्ड : तर्क (Reason) आणि विश्वास/ श्रद्धा (Faith) यांच्यातील संबंध | ५१ |


❖❖❖❖

# SYBA Semester 4: Western Philosophy (UAPHI 402)

**The objectives of the course are:**

1. To acquaint students with the basic philosophical questions that philosophers in the Greek and medieval tradition have addressed.

2. To equip students with argumentative and analytical skills involved in philosophical reasoning.

3. To encourage a spirit of rationality in philosophizing while appreciating and respecting differing philosophical systems and perspectives.

**Unit- 1 Pre-Socratics and sophists (11 lectures)**

Natural philosophers (Thales, Anaximander and Anaximenes), the problem of change (Parmenides and Heraclites), Pluralists (Democritus), Sophists (Protagoras)

**Unit- 2. Socrates and Plato (11 lectures)**

Characteristics of Socratic method, Plato's theory of knowledge (Simile of Divided Line and Allegory of cave), criticisms against sense perception, Characteristics of Forms/Ideas

**Unit- 3 Aristotle and Post-Aristotle (11 lectures)**

Aristotle's theory of Causation (reference to the notion of teleology), Form and Matter; actuality and potentiality, Stoicism (Epictetus), Skepticism (Sextus Empiricus)

**Unit- 4. Medieval Philosophy (12 lectures)**

Peter Abelard (Relationship between reason and faith), Characteristics of the Schools of Mu'tazilites and Asharites, Moses Maimonides (Philosophy and Theology)

**Semester End Exam Evaluation [100 marks]**

1. There shall be five compulsory questions
2. First four questions shall correspond to the four units
3. Question 5 shall be Short Notes (one from each unit and attempt any 2 of 4)
4. All questions shall contain internal choice
5. Each question shall carry a maximum of 20 marks

**References and reading list recommended for the course**


Annas, Julia. *Ancient Philosophy: A Very Short Introduction* (Oxford University Press, 2000)

Barnes, Jonathan. *Early Greek Philosophy,(*Penguin; Revised edition 2002)

Elrouayheb K, SChmidtke S, Oxford handbook of Islamic Philosophy, Oxford University Press, 2017

G. S. Kirk and J. E. Raven. *The Pre-Socratic Philosophers. (*Cambridge University Press, 1957)

Grube, G. M. *Plato's Thought* (London: Methuen, 1935)

Guthrie, W. K. C. 1962, 1965, 1969, *A History of Greek Philosophy*, Vols. I, II, and III, IV, V, VI (Cambridge University Press. 1962, 1965, 1969)

Jones, W.T. *A History of Western Philosophy: The Medieval Mind* (Harcourt, Brace and World, Inc. 1969)

Michael Marmura, Etienne Gilson*. 'Al Ghazali, The incoherence of the Philosophers'*( University of Chicago Press 1998)

Osborne, Catherine. 2004 *Pre-Socratic Philosophy: A Very Short Introduction* (Oxford University Press 2004)

Stace, W.T. *A Critical History of Greek Philosophy* (Macmillan, 1985, 1992)

Stumpf, S.E. & Fieser, J*. Philosophy: History and Problems* (McGraw-Hill, 1971)

Walsh, Martin *A History of Philosophy* (London: Geoffrey Chapman, 1985)

Frederick Copleston *A History of Philosophy* (volumes 1, 2, 3) Image 1993

D.J. O'Connor *Critical History of Western Philosophy* Free Press, 1985

# १

# सॉक्रेटिसपूर्व आणि सोफिस्ट

**घटक रचना :**


१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ सॉक्रेटिसपूर्व काळातील निसर्गवादी/ विश्वोत्पत्तीवादी तत्वज्ञ

१.२.१ थेलीस

१.२.२ ॲनॅक्झिमँडर

१.२.३ ॲनॅक्झिमिनिज

१.३ परिवर्तनाची (बदलाची समस्या)

१.३.१ पार्मेनायडिज

१.३.२ हेरॅक्लिटस

१.४ डेमॉक्रिटस

१.५ सोफिस्ट – प्रोटॅगोरास

१.६ सारांश

१.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न


## १.० उद्दिष्टये

१) सॉक्रेटिस काळातील निसर्गवादी तत्वज्ञांचा अभ्यास करणे.

२) थेलीस, ॲनॅक्झिमँडर व ॲनॅक्झिमिनिज यांच्या विचारांचा अभ्यास करणे.

३) परिवर्तनाची समस्येमध्ये पार्मेनायडिज व हेरॅक्लिटस यांची भूमिका पाहणे.

४) डेमॉक्रिटसच्या अणुवादाचा अभ्यास करणे.

५) प्रोटॅगोरास याच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

भारतीय आणि पाश्चात्य विचारवंतांनी ग्रीकांच्या तत्त्वज्ञानाचा वारसा स्वीकारला आहे. विश्व म्हणजे काय ? विश्वचि निर्मिती कशी झाली ? विश्वाचे स्वरूप कसे आहे ? अंतिम सद्वस्तू काय आहे ? जगाचे कारण काय असावे ? या जगताचे अंतिम सत्य काय आहे ? या विविध प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञानात केला गेला. पाश्चात्य तत्वज्ञानातील सॉक्रेटिसपूर्व काळात प्राचीन ग्रीसमध्ये विश्वमीमांसा करणारे निसर्गवादी तत्वज्ञ होऊन गेले. थेलीस, ॲनॅक्झिमँडर व ॲनॉक्झिमिनिज हे विश्वमीमांसक तत्वज्ञ होते. ते आयोनियन संप्रदायातील तत्त्वचिंतक म्हणूनही ओळखले जातात. प्राचीन ग्रीक शहरांपैकी मायलेटस नावाचे ग्रीक नगरराज्य होते, ते शहर आयोनियन वसाहतीचाच एक भाग होते. आयोनियन तत्त्वज्ञानाचे मायलेटस शहरात राहणारे हे आयोनियन तत्त्वज्ञ होते. त्यानं 'मॉयलेशियन' तत्त्वज्ञ म्हणूनही ओळखले जाते. मायलेशियन हे समुद्राच्या किनाऱ्यावर राहत असल्याने समुद्रावर होणाऱ्या पाणी व हवा सतत बदलांचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. त्यांना दोन गोष्टी स्पष्टपणे प्रतीत झालेल्या होत्या. १) निसर्गात होणाऱ्या सर्व विशिष्ट बदलांना आधारभूत असलेले सतत एकच स्वरूपाचे असंरे विश्वव्यापी द्रव्य आहे. २) चालामान व गतिमान द्रव्य हेच प्राणतत्त्व किंवा जीवन आहे. या विश्वमीमांसकांना एकाचा प्रश्न सोडवायचा होता तो म्हणजे हे विश्वव्यापी द्रव्य कोणते आहे ? कोणते द्रव्य सतत चालामान वा गतिमान म्हणून ते प्राणमय होते ? कोणते द्रव्य सतत चालामान व गतिमान म्हणून ते प्राणमय होते ? या प्रश्नांना त्यांनी वेगवेगळी उत्तरे दिली. थेलीसने 'पाणी' हेच या जगाचे मूळ कारण असावे असे मानले. ॲनॅक्झिमँडरने पाणी हे दृश्य असून त्यास मर्यादा आहे. विश्व ते तर अगाध आहे. विश्वाचे उपादान कारण एकच असून ते अदृश्य व अमर्याद असावे. अर्थात अनंतस्वरूप असले पाहिजे. ॲनॉक्झिमिनिजने विश्वाचे उपादान कारण जल वा पाणी नसून ते वायू होय असा निष्कर्ष काढला.

तत्वज्ञानातील एक महत्वाची समस्या म्हणजे परिवर्तनाची समस्या होय. जगातील सर्व काही परिवर्तनशील वा अनित्य आहे. या जगात कायमी वा शाश्वत स्वरूपाचे नित्य असे काही नाही. कोणतीही वस्तू स्थायी स्वरुपाची नसून त्या सर्व वस्तू सतत बदलत असतात. यावरून हेरॅक्लिटसने असा विचार मांडला की विश्वातील वा जगातील सर्वकाही परिवर्तनशील वा अनित्य आहे. या विश्वाच्या वा जगाच्या मुळाशी नित्य व शाश्वत स्वरूपाचे असे काहीही नाही. तो मूलतत्त्व प्रवाही वा सतत बदलणारे मानतो. पार्मेनायडिज हा शाश्वतवादी व एकतत्त्ववादी ग्रीक तत्त्वचिंतक होता. तो एलिआ शहराचा रहिवाशी असल्याने त्याच्या वैचारिक भूमिकेला एलिआटिक तत्त्वचिंतन असे म्हणतात. पार्मेनायडिजने हेरॅक्लिटसच्या परिवर्तनाला विरोध करून त्या विश्वाची रचना सुव्यवस्थित, सुसूत्र व नियमबद्ध असून त्याच्या मुळाशी एकाचा तत्त्व आहे आणि ते तत्त्व म्हणजे ईश्वर होय. त्याने एकतत्त्ववाद व एकेश्वरवादाचा सतत पुरस्कार केला.

इ.स.५ व्या शतकातील पाश्चात्य ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात सोफिस्ट हा विचारवंताचा वर्ग निर्माण झाला. सोफिस्ट म्हणजे शहाणा माणूस होय. त्यांचे कार्य शिक्षण

देण्याचे होते. सोफिस्टांनी लोकशाहीत लोकांवर प्रभाव पाडण्यास उत्तम वक्तृत्व हवे म्हणून वक्तृत्वावर भर दिला. सोफिस्ट हे तत्त्वज्ञान, क्रीडाशास्त्र, काव्य, संगीत, कला इतिहास, गणित इत्यादी विषयांचे लोकांना शिक्षण देत होते. सोफिस्टांनी ज्ञानदानाची कला जोपासली. त्यांनी केवळ तत्त्वज्ञान वा ज्ञानमीमांसाच सांगितली नाही तर नीतिशास्त्राचेही विवेचन केले. "मानव हा सर्व गोष्टींचा मापदंड आहे. (Man is the measure of all things) मानव सर्व गोष्टींचा केंद्रबिंदू आहे हे मानण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती. ते ते ज्ञानदाते व लोकशिक्षक होते. ॲसिमॅकस, गॉरजिआस व मोटॅगोरस हे सोफिस्ट विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या ज्ञानमीमांसेविषयीचे विवेचन आपण शेवटी करणार आहोत.

## १.२ सॉक्रेटिसपूर्व काळातील निसर्गवादी/ विश्वोत्पत्तीवादी तत्त्वज्ञ

इ.स.पूर्व सहाव्या शतकात ग्रीक तत्त्वज्ञानाचा प्रारंभ झाला. या विश्वाची निर्मिती कशी झाली ? या जगताचे स्वरूप कसे आहे ? हे जगत (विश्व) कोणी निर्माण केले ? या प्रश्नांना वैज्ञानिक दृष्टिने प्रत्युत्तर देण्याचा प्रथम सॉक्रेटिसपूर्व काळातील तत्त्वज्ञांनी केला. त्या काळापूर्वी अनेक पौराणिक दंतकथांचा, विश्वमीमांसकांचा आणि धर्मशास्त्रज्ञांच्या काव्यांचा अभ्यास केला जात असे. ते काव्य आणि धमर म्हणून त्याकडे पहात असत. तत्त्वज्ञान म्हणून नव्हे. ग्रीक पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे ढोबळमानाने तीन कालखंड पडतात.

### १) सॉक्रेटिसपूर्व कालखंड :

हा पहिला कालखंड ढोबळमानाने सॉक्रेटिसपूर्व तत्त्वज्ञानाचा म्हणून ओळखला जातो. यामध्ये सोफिस्ट या विचारवंताचा अंतर्भाव न होता हा कालखंड ग्रीक तत्त्वज्ञानाचा उगम म्हणून ओळखला जातो. या कालखंडात थेलीस, ॲनॅक्झिमँडर ॲनॉक्झिमिनिज, पार्मेनायडिज, हेरॅक्लिटस इ. तत्त्वज्ञाचा अंतर्भाव आहे.

### २) सोफिस्टांचा कालखंड :

हा कालखंड सोफिस्टापासून ते ॲरिस्टॉटल पर्यंतच्या विचारांचा कालखंड होय, की ज्यात सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचा समावेश असून ग्रीक तत्त्वज्ञानाची परिपक्वता त्यात दिसून येते.

### ३) ॲरिस्टॉटलोत्तर कालखंड :

हा कालखंड ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानानंतरचा असून, बौद्धिक विचारांचा झालेल्या ऱ्हासाचा हा कालखंड होय.

आरंभीच्या काळातील ग्रीक तत्त्वज्ञान हे नैसर्गिक तत्त्वज्ञान म्हणून ओळखले जात असे. त्यांचे लक्ष प्रत्यक्ष निसर्गाकडे असे. निसर्गात होणाऱ्या सर्व विशिष्ट बदलांना आधारभूत असलेले सतत एकाच स्वरूपाचे असणारे विश्वव्यापी द्रव्य आहे. या नैसर्गिक कालखंडात तत्त्वज्ञ ब्राह्म निसर्गाविषयी प्रामुख्याने दोन स्वतंत्र समस्येवर विचार करीत असत. पहिली समस्या म्हणजे द्रव्य या समस्येवर विचार करीत या जगातील मुलभूत द्रव्य कोणते ?

आणि दुसरी समस्या म्हणजे परिवर्तनाची समस्या होय. या विश्वाच्या मुळाशी नित्य व शाश्वत स्वरूपाचे असे काहीही नसून अंतिम सत्ता ही प्रक्रिया स्वरुपाची असून ती प्रवाही वा परिवर्तनशील असते. असा विचार हेरॅक्लिटसने मांडला. तर पहिल्या समस्येचा विचार हा ॲनॅक्झिमँडर ॲनॉक्झिमिनिज यांनी मांडला. एकूणच विश्वनिर्मितीविषयीचे भिन्न भिन्न दृष्टिकोन सॉक्रेटिसपूर्व कालखंडात होऊन गेलेल्या थेलीस, ॲनॅक्झिमँडर ॲनॉक्झिमिनिज, पार्मेनायडिज व हेरॅक्लिटस यांनी मांडले. सर्व तत्त्वज्ञ विश्वमीमांसावादी होते.

### १.२.१ थेलीस (Thales) ख्रि.पूर्व ६२४ ते ५२६

थेलीस, ॲनॅक्झिमँडर व ॲनॉक्झिमिनिज हे सॉक्रेटिसपूर्व कालखंडातील आयोनियन तत्त्वज्ञ होते. मायलेटस या ग्रीक शहरात जगातील पहिला निसर्गवादी व विश्वाची मीमांसा करणारा प्रसिध्द तत्त्ववेत्ता थेलीस राहात होता. तो मायलेशियन किंवा आयोनियन तत्त्वज्ञ म्हणून ओळखला जातो. तो वैज्ञानिक शास्त्रीय दृष्टिने विचार करणारा होता. अनेक शास्त्र त्याला अवगत होती. थेलीस हा सूक्ष्म निरीक्षक होता. तो या विश्वातील ताऱ्यांचे निरीक्षण करीत असे. इ.स.पू. ५८५ साली सूर्यग्रहणाचे भविष्यकथनही त्याने केले होते.

थेलीस हा समुद्राच्या काठी एकदा पहुडला असतांनाच त्याला या सभोवतालच्या जगाचा पसारा बघून त्याच्या मानत प्रश्न उद्भवला What is all this हे जग कशाचे बनलेले आहे ? या जगाचे उत्पादन कारण कोणते असावे ? जसे मातीच्या भांड्याचे उपादान कारण मातीच असते. तसे या जगाचे उपादान कारण काय असावे ? या जगाचे उपादान कारण एकच असावे असा अंदाज त्याने केला. तो समुद्राच्या बाजूला मिलेटस नगरात राहत होता. त्याने अनेकदा सूर्याच्या उन्हामुळे पाण्याची वाफ होते असे पाहिले होते. कडाक्याच्या थंडीत त्याच पाण्याचे घनीभवन होऊन बर्फ होते. एकच द्रव्य तीन रुपात जसे पाणी प्रवाहीरुपात, वाफ वायुरूपात तर बर्फ घनरुपात दिसून येते. तसेच पाणी (जल) हे सर्वांना आवश्यक असून समग्र जीवसृष्टी पाण्यावर अवलंबून असते. पृथ्वी सपाट असून ती पाण्यावर तरंगते असा समजही त्याकाळी होता. म्हणून त्याने तर्क (अंदाज) केला की 'पाणी' हेच या विश्वाचे उपादान कारण असले पाहिजे. अर्थात संपूर्ण विश्वाच्या मुळाशी पाणी हे मूलद्रव्य असावे असे तार्किक स्वरूपाचे तत्त्वचिंतन त्याने केले.

त्याच्या मते सर्व वस्तुंचे मूलद्रव्य पाणी असून या विश्वातील सर्व वस्तूंची उत्पत्ती जलापासून झालेली असून सर्व वस्तूंची परिसमाप्ती शेवटी जलातच होत असते. पृथ्वी ही सपाट असून ती पाण्यावर तरंगते आहे. थेलीसची दृष्टि व विचारसरणी ही अनिर्बंध स्वैरकल्पना करणाऱ्या पौराणिक कल्पनांवर आधारलेल्या व धार्मिक उपपत्ती लोकांहून वेगळी होती. त्याने अतिनैसर्गिक घटनांचे विवरण न करता नैसर्गिक शक्तिच्या आधाराने या विश्वाची उत्पत्ती मांडण्याचा प्रयत्न केला पाणी हेच या विश्वाचे आदीकरण किंवा उपादान कारण असले पाहिजे. असा विचार मांडून विश्वातील सर्व वस्तुंचे त्यातच स्थित्यंतरे होऊन निर्माण झाले असले पाहिजे. अशी त्यांची धारणा होती. पाणी हे या विश्वाचे मूलद्रव्य असले पाहिजे. ह्या प्रकारच्या त्याच्या विचारला फारसे नसले तरी या

विश्वाचे उपादानकारण कोणत्या तरी नित्य, परिवर्तनीय अविकारी द्रव्यात असले पाहिजे. या जगातील सर्व मर्यादित व विकारी पदार्थ त्या एका मूलद्रव्यातून निर्माण झाले असले पाहिजे. तो निसर्गातील कोणता तरी पदार्थ असला पाहिजे. हज थेलीसचा विचारच शास्त्रीय दृष्टीचा द्योतक आहे. त्याच्या विचारसरणीत निसर्गाच्या वरवरच्या भासमय रूपाचा पडदा भेदून त्यातील मूलतत्त्वाकडे जाण्याचा प्रयत्न आहे. थेलीस आपल्या अनुभवाच्या आधारे तर्क करून या जगाचे उत्पादन कारण काय असावे याचा अंदाज करीत होता. त्याचे उत्तर आज कालबाह्य, आरोग्य व अप्रमाणभूत वाटत असले तरी पाश्चात्य ग्रीक तत्त्वज्ञानात त्याने बौद्धिक तत्त्वचिंतनास सुरुवात केली हे महत्त्वाचे आहे. एकूण थेलीस हा विश्वमीमांसक व त्या काळातला एक भौतिक शास्त्रज्ञ व एकतत्त्ववादी तत्त्वचिंतक होता.

**आपली प्रगती तपासा.**

१) थेलीसचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोन विशद करा.

## १.२.२ ॲनॅक्झिमँडर (Anaximander) ख्रि. पू. ६११ ते ५४७ :

थेलीसनंतर विशेष मान्यता पावलेला आयोनियम तत्त्वज्ञ ॲनॅक्झिमँडर होऊन गेला. तत्त्वज्ञानावर व विज्ञानावर गद्यात ग्रंथरचना करणारा सॉक्रेटिसपूर्व काळातील पहिलाच ग्रीक विचारवंत होता. थेलीस हा वरील चर्चा ॲनॅक्झिमँडरशी करीत असे. ॲनॅक्झिमँडर हा स्वतंत्र विचार करू लागला. तो उत्क्रांतीवादाचा जनक मनाला जातो. या विश्वाच्या बुडाशी असलेल्या अंतिम तत्त्वाचा शोध घेत होता. या विश्वाचे मूलद्रव्य पाणी, वायू आणि अग्नि असेच असले पाहिजे. असे समजण्याची जरुरी नाही. या विश्वाच्या बुडाशी असलेले मूलद्रव्य ज्यापासून वस्तू निर्माण होतात व शेवटी ज्यात विलीन होतात असे अमर्याद, अनंत, आकाररहित गुणरहित, अनंतस्वरूप असे काहीतरी असले पाहिजे. असे त्याचे मत होते.

पाणी हे दृश्य असून त्यास मर्यादा आहेत. विश्व तर अगाध आहे. या विश्वाचे उपादानकारण एकच असावे पण ते पाण्यासारखे मर्यादित असू शकत नाही. ते अदृश्य असून अमर्यादित असले पाहिजे. ते कोणत्याही दृश्य वस्तूसारखे वा द्रव्यासारखे नसावे. त्याचे निश्चित स्वरूप सांगणे अशक्य आहे. परंतु ते अमर्याद किंवा असीम (Boundless) असावे. अर्थात अनंतस्वरुप (Indefinite) असले पाहिजे. तात्त्विकदृष्ट्या ॲनॅक्झिमँडरची भूमिका बरोबर होती. परंतु अशा भूमिकेमुळे मानवी मनाचे समाधान होत नाही. या विश्वाचे अमर्यादित कारण मान्य करूनही त्यांच्या स्वरुपाविश्यीची परिचिताच्या स्पष्टीकरण करून अपरिचिताला समजून घेतो. ॲनॅक्झिमँडरच्या मते पृथ्वी ही सिलिंडर सारखी लांब व गोल आहे. लोक तिच्या पृष्ठभागावर राहतात या दृष्टिने त्याचे चिंतन भौतिकशास्त्राच्या दृष्टिने विचार प्रवर्तक दिसतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) ॲनॅक्झिमँडरचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोन विशद करा.

### १.२.३ ॲनॅक्झिमिनिज (Anaximenes) ख्रि. पू. ५८८ ते ५२४ :

आयोनियन व मायलेशियन संप्रदायाचा तिसरा तत्त्ववेत्ता ॲनॅक्झिमिनिज हा होय. थेलीस व ॲनॅक्झिमँडर प्रमाणेच तो मायलेटसचा रहिवाशी होता. ॲनॅक्झिमँडरचा युक्तीवाद मान्य करूनही त्याचे तात्त्विक उत्तर ॲनॅक्झिमिनिजला असमाधानकारक वाटू लागले. म्हणून त्याने आपल्यापरीने तत्त्वचिंतन चालू ठेवले. थेलीस, ॲनॅक्झिमँडर यांच्याप्रमाणे त्याने स्वयंप्रज्ञेच्या आधारे विश्वाचे उपादान कारण एकच असावे, परंतु ते सूक्ष्म अदृश्य व मर्यादारहीत असावे असा निष्कर्ष त्याने काढला व त्यास वायू असे म्हटले ॲनॅक्झिमिनिज मते या विश्वाचे कारण पाणी (जल) नसून वायू होय. वायुचेच पाणी (प्रवाहीरूप) व बर्फ (घनरूप) अशी रूपे आहेत. तसेच वायू डोळा या इंद्रियास प्रत्यक्ष दिसत नाही. वायूचे अस्तित्व जाणवते पण ते डोळ्यांना दिसत नाही. वायू अमर्याद असून पाण्यापेक्षा अधिक मुलभूत व अत्यावश्यक आहे. प्राण्यांना श्वासोच्छवास चालू असेल तर पाणी उपयोगी पडते. असा तर्क करून त्याने असा निष्कर्ष काढला की जगाचे उत्पादन कार्य वायू होय. वायू हा अवकाशात अमर्यादपणे सर्वत्र पसरलेला आहे. तो सतत चंचल व गतिमान असतो. त्याच्याठिकाणी गती किंवा हालचाल निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. वायूपासून या विश्वाचा विकास झालेला आहे. या जगाच्या निर्मितीस कारण असलेल्या प्रक्रियांना ॲनॅक्झिमिनिज विरलीभवन व घनीभवन अशी नावे देतो. उष्णता म्हणजे विरलीभवन व शीतल म्हणजे घनीभवन होय. हवा (वायू) विरल झाली म्हणजे तिचे अग्नीत रुपांतर होते व ती जसजशी अधिकाधिक थंड वा शीतल होते तसतसे क्रमाने तिचे जल, पृथ्वी व पाषाणात रुपांतर होते व ती जसजशी अधिकाधिक थंड वा शीतल होते तसतसे क्रमाने तिचे जल, पृथ्वी व पाषाणात रुपांतर होते व शेवटी पुन्हा या जागाचे मूल वायूत (हवेत) रुपांतर होते. अनेक जगे आहेत व ती सर्व हवेत राहातात असे ॲनॅक्झिमिनिजचे मत आहे. अर्थात या जगात अनेक प्रकारचे गुणधर्म पाहावयास मिळतात ते गुणधर्म मुळात नसून परिणामांच्या कमी अधिक प्रमाणातून व त्यांच्या घनीभवनामुळे घनत्वातून निर्माण होतात. असा अर्थ त्याच्या घनीभवन व विरलीभवन या पदांमध्ये अनुस्यूत असावा. घनीभवनामुळे ठराविक आकारमानात जडपणा, टणकपणा आपणास पाषाणाच्या ठिकाणी पाहावयास मिळतो. या उलट विरलीभवनामुळे मऊपणा, हलकेपणा यासारखे गुण व्यक्त होतात.

**मूल्यांकन :**

वरिल विवेचनावरून ॲनॅक्झिमँडरपेक्षा ॲनॅक्झिमिनिज हा अधिक तर्कनिष्ठ व निश्चित विचारांचा तत्त्वज्ञ होता. त्याचे घनीभवन व विरलीभवन या पदांच्या कल्पना व त्यांच्या प्रक्रियांच्या सहाय्याने पदार्थांचे गुणधर्म बनण्याची प्रवृत्ती ही निश्चित शास्त्रीय व तात्विकदृष्ट्या महत्त्वाची आहे. विश्वमीमांसा करणारा हा तत्त्वचिंतक एकतत्त्ववादी होता. थेलीस, ॲनॅक्झिमँडर व ॲनॅक्झिमिनिज हे तिघेही तत्त्वचिंतक आपल्या अनुभवाच्या आधारे तर्क करून जगाचे उपादान कारण काय असावे याचा अंदाज करीत होते. त्यांची उत्तरे आज कालबाह्य, अयोग्य अ अप्रमाणभूत वाटत असली तरी त्यांनी पाश्चात्य जगातील बौद्धिक तत्त्वचिंतनास सुरुवात केली ही महत्त्वाची बाबा आहे. त्यांच्या मुळे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा क्षेत्रात गहन विचार करणारे महान तत्त्ववेत्तेही ग्रीकांनी प्रचंड

बौद्धिक प्रगती केली व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात गहन विचार करणारे महान तत्त्ववेत्तेही ग्रीकमध्ये निर्माण झाले.

**आपली प्रगती तपासा.**

१. ॲनॅक्झिमिनिजचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण विशद करा.

## १.३ परिवर्तनाची (बदलाची समस्या)

या विश्वात (जगात) सर्वत्र सतत बदल घडत असतात. स्थिर असे काहीच नाही. सृष्टीत वा विश्वात एकसारखे नवीन बदल उत्पन्न होतात जसे प्राणी जातीमध्ये बदल घडतात, नवीन प्राणीजाती निर्माण होतात, प्राण्यांच्या प्रत्येक पिढीत एकसारखे बदल होतात हे डार्विनने उत्क्रांतीवादात स्पष्ट केले आहे.

बदल वा परिवर्तन म्हणजे विकास नव्हे. विकासाला दिशा व उद्दिष्ट असते. विकास हा पूर्णतेकडे जातो. परंतु परिवर्तनाच्या संकल्पनेत विकासाची कल्पना अंतर्भूत नाही. विकासाची प्रक्रिया ही परिवर्तनाची प्रक्रिया असली तरी प्रत्येक परिवर्तन वा बदल हा विकास नव्हे. परिवर्तनाची समस्या अशी आहे की जे स्थिर आहे तेच बदलू शकते. या म्हणण्यात विसंगती आहे. बदल आणि स्थिरता परस्पर विरोधी गोष्टी असून त्यात जी तात्विक समस्या निर्माण होते ती म्हणजे जे बदलते ते स्थिरपणे काय असते हीच ती समस्या होय. ह्या समस्येची सोडवणूक करण्यासाठी दोन ग्रीक तत्त्वचिंतकांनी प्रयत्न केला. त्यातील पहिला पार्मेनायडिज व दुसरा हे हेरॅक्लिटस हा होय.

### १.३.१ पार्मेनायडिज (Parmenisdes) ख्रि. पू. ५४० ते ४७०

पार्मेनायडिज हा इटलीच्या दक्षिणेकडिल एलिया या शहराचा रहिवासी असल्यामुळे त्याच्या वैचारिक भूमिकेस 'एलिआटिक तत्त्वचिंतन' असे म्हणतात. हा एक शाश्वतवादी व एकतत्त्ववादी ग्रीक तत्त्वचिंतक होता. पार्मेनायडिजने हेरॅक्लिटसच्या परिवर्तनविषयक सिद्धांताला (क्षणिकवादाला) पूर्णपणे विरोध केला. त्याने अंतिम सत्ता सत्तत्त्व स्थिर, अविकारी, अविभाज्य, गतिशून्य अपरिवर्तनीय आहे असा मूलभूत सिद्धांत मांडला. थोडक्यात अंतिम सद्वस्तूत बदल होत नाही हा विचार मांडला. पार्मेनायडिजने एक दार्शनिक कविता (Philosophical poem) लिहिली होती. या कवितेच्या उपोद्घातात त्याने कवीला एक देवता भेटते असा उल्लेख केलेला आहे. ही देवी कवीसमोर सत्य प्रकट करते. हेच सत्य त्याने आपल्या काव्यात युक्तिवादाच्या स्वरुपात मांडलेले आहे. त्याच्या मते बौद्धिक शोधनप्रक्रियेत दोनच पर्याय असू शकतात. It is or it is not अंतिम सत्ता सत्भाव (It is) असते. हा पर्याय आपण स्वीकारतो परंतु दूसरा पर्याय स्वीकारू शकत नाही. जे नाही किंवा ज्याविषयी असते. हा पर्याय आपणस काहीच माहिती नाही त्याविषयी बोलणारे बरे. A thing must either be or not be DeeefCe "What is, cannot change" म्हणजे जे आहे ते एकात्म, अविभाज्य, शाश्वत गतिशुन्य व अपरिवर्तनीय असले पाहिजे. ही एकात्म सत्ता (Reality) वा अंतिम सद्वस्तुच्या संदर्भात अयोग्य व अनुचित होत. बदल व परिवर्तन सत्य मानल्यास एकच

वस्तू 'आहे'. व 'नाही' अशी आहे आणि अशी नाही असे म्हणावे लागेल हे कसे शक्य आहे ? एकाच वस्तुविषयी अशी परस्परविरोधी विधाने मानवी बुद्धीला मान्य होणे शक्य नाही. तसेच बदल सत्य मानने म्हणजे 'शून्यातून एखादी गोष्ट निर्माण होण्यासारखे आहे'. किंवा एखादी वस्तू नाहिशी होण्यासारखी आहे. शून्यातून काहीही निर्माण होणे शक्य नाही. Out of nothing, nothing comes. स्वतःमधून ती निर्माण झाली असे म्हणणे म्हणजे ती स्वतःशी एकरूप आहे, असे म्हणावे लागेल. अर्थात ती वस्तू पूर्वीही होती, तशीच आजही आहे व पुढेही तशीच राहील. म्हणून जे आहे व जसे आहे ते नाही शकत नाही. तसेच जे नाही, त्याची उत्पत्तीही होऊ शकत नाही. जे आहे ते अविभाज्य व सतत स्थायी स्वरूपाचे असेले पाहिजे. अंतिम सत्ता वा अंतिम सद्वस्तू बदलत नाही. तिच्यात बदल होत नाही. बदल वा परिवर्तन हे इंद्रियगम्य असले तरी ते भ्रामक आहे. जे आहे ते शाश्वत आहे.

थोडक्यात  पार्मेनायडिज म्हणतो की, जे अंतिम सत्य आहे ते परिवर्तनरहित म्हणजेच अपरिवर्तनीय आहे. खरे पाहता काहीच बदलत नाही. जे नित्य आहे ते तसेच आहे ते तसेच आहे. नवीन काही निर्माण होऊ शकत नाही जुने काही नाहीसे होत नाही. जे बदल आपल्याला दिसतात ते केवळ भ्रम आहेत.

पार्मेनायडिज ह्या शाश्वतवादी तत्त्वचिंतकाने सद्वस्तू (Reality) वा असणे Being व त्याविषयी विचार करणे ह्या दोन सत्ता व दोन बाबी नाहीत. Being and thought are one. ज्याचा विचार होऊ शकत नाही, ते असणे शक्य नाही. तसेच जे असणे शक्य नाही (Non being) याचा विचार करणेही शक्य नाही. ज्याचा विचार होऊ शकतो तेच असणेही शक्य आहे. अर्थात हा एक प्रकारचा द्वंदात्मक चिद्वाद होय. परंतु अंतिम सत्ता चिद्स्वरूप आहे की नाही ? याविषयीचे स्पष्ट विचार पार्मेनायडिजने मांडलेला नाहीत. ही अंतिम सत्ता एकात्म असून तिचे स्वरूप भर आहे. हाच त्याचा सत्याविषयक सिद्धांत होय. इंद्रियजन्य ज्ञान हे भ्रमात्मक होय. केवळ तार्किक पद्धतीने चिंतन केल्यास अंतिम सत्तेचे एकत्व, अपरिवर्तनशीलता, गतिमानता  ही भ्रमात्मक आहे, असे लक्षात येते. पार्मेनायडिज हा काही ठिकाणी अंतिम सत्तेचे गोलाकार हे विशेषण लावतो. फ्रँक थिल्ली या इतिहासकाराच्या मते हे पार्मेनायडिजच्या कल्पनाशक्तीचे द्योतक आहे. अर्थात पार्मेनायडिज हा एवढ्यावरून  जडवादी होता हे ठरविणे चुकीचे आहे. तो तत्त्वचिंतक रूपक म्हणून का होईना देवीच्या कोटीचा उल्लेख आपल्या तात्विक कवितेत करतो. तो कट्टर जडवादी असणे शक्य नाही. 'असणे' (Being)   विचार करणे (Thought) यांची एकात्मता मानणारा पार्मेनायडिज हा भौतिकवाद असणे शक्य वाटत नाही. तो शाश्वतवादी व बुद्धिवादी होता.  अंतिमसत्ता एक व अपरिवर्तनीय आहे. परंतु इंद्रियजन्य व ज्ञानानुसार या जगातील वस्तू बदलतात म्हणून अंतिम सद्वस्तुकमीत कमी अभौतिक असली पाहिजे. बुद्धी व इंद्रियप्रत्यक्ष यांचा सूर परस्परविरोधी असेल तर बुद्धीबलास प्राधान्य व प्रमाणभूतता दिली पाहिजे. म्हणून पार्मेनायडिज म्हणतो की, अंतिम सद्वस्तु अपरिवर्तनशील व एकात्म असून तिच्या अधिष्ठानावर बदलणारे हे दृश्य जग भासमान होय. ही अंतिम सद्वस्तु बुद्धिगम्य आहे. परंतू इंद्रियगम्य नाही.

बर्ट्रांड रसेलच्या मते या विश्वाच्या जगताच्या मुळाशी असलेल्या सत्तेविषयी, सत्ता म्हणजे सद्वस्तु असा बौद्धिक व भाषिक तर्क करणारा वा युक्तिवाद मांडणारा पार्मेनायडिज हा पहिला ग्रीक तत्त्वचिंतक होय. त्याचे हे तार्किक चिंतन आज मान्य होईलच असे नाही. परंतु भाषेची रचना यांच्या आधारे सत्ताशास्त्रीय निष्कर्ष कसे सहजपणे काढले जातात. याचा उत्कृष्ट नमुना पार्मेनायडिजच्या चिंतनात आढळतो. तो बुद्धिवादी तत्त्वचिंतक होता. त्याच्या चिंतनात ज्ञानेद्रियांना त्याने मुळीच स्थान दिलेले नाही. त्याच्या मते गतिशीलता, परिवर्तनशीलता वा बदल या संकल्पना अंतिम सद्वस्तूच्या संदर्भात अयोग्य व अनुचित होत. या उलट अंतिम सत्तेचे एकत्व अपरिवर्तनशीलत्व गतिशन्यत्व व शाश्वता हीच बुद्धीला पटते, असे त्याचे मत आहे. अशा प्रकारे पार्मेनायडिजने शाश्वतवादाचा पुरस्कार केला व बुद्धिप्रमाण्याला अधिक महत्त्व दिले. अर्थात व्यावहारिक जगातील अनुभवायला येणाऱ्या विविधतेची व अनेकत्वाची व्यवस्था लावणे हे एकतत्त्ववाद्यांना  कठीण जाते. बुद्धिबरोबर व्यावहारिक क्षेत्रात तरी इंद्रियानुभवाचे प्रामाण्य मानावे लागते. हे विवेचन पार्मेनायडिजच्या विचाराचे मुल्यांकन करण्यास पुरेसे आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१. पार्मेनायडिज याची परिवर्तनाची समस्या विशद करा.

## १.३.२ हेरॅक्लिटस (Heraclitus) ख्रि. पू. ५३५ ते ४७५ :

पाश्चात्य ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात हेरॅक्लिटस या रहस्यवादी वा गूढवादी तत्त्वचिंतकाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याने पार्मेनायडिजच्या शाश्वतवादी व नित्यत्ववादी विचारसरणीला विरोध केला. तरी हे दोघेही बुद्धिप्रामाण्यवादी तत्त्वचिंतक होते. इंद्रिय प्रत्यक्षवादाला या दोहोंचा विरोध होता. हेरॅक्लिटसचा जन्म आयोनिया प्रांतातील इफिसस या शहरात इ.स.पू. ५३५ च्या सुमारास झाला. तो पार्मेनायडिजच्या  व गौतम बुद्धाच्या समकालीन होता. हेरॅक्लिटसच्या  जीवनात व चिंतनात आणि भगवान बुद्धाच्या जीवनात फार आश्चर्यकारक साम्य आढळून येते. दोघांचाही जन्म राजघराण्यात झाला. दोघांनाही राजगादीचा वारसा अव्हेरला. परंतु राजपदत्यागाची दोघांची कारणे वेगळी होती. सिद्धार्थ गौतम जगातील दु:ख बघून अस्वस्थ झाला. त्याने दु:खाची कारणे शोधून या करुणामूर्तीने लोक उद्धाराचे कार्य केले. या उलट हेरॅक्लिटसला आपल्या बुद्धिमत्तेचा गर्व होता. सर्वसामान्य माणसांमध्ये मिसळणे वा त्यांच्याशी चर्चा करणे त्याला पसंत नव्हते. त्याच्या मते जास्तीत जास्त लोक मूर्ख असतात. त्यांना उपदेश करणे म्हणजे मूर्खपणा होय. तो मूर्खकरिता लिहित नाही. केलेला उपदेश समजू शकत नाही त्याचा विपर्यास करतात. त्याचा त्यामुळे लोकशाहीला विरोध होता. मूर्ख लोकांचा राजा होणे, त्याला मान्य नव्हते म्हणूनच त्याने राजपद नाकारले. भगवान बुद्ध परमकारुणिक होते. जगातील दु:खे शोधण्यासाठी व त्यावरील उपाय शोधण्यासाठी बुद्धांनी राजगादी नाकारली व राजवाडयाबाहेर पडले, ते आर्यसत्ये शोधण्यासाठी होय.

सर्व क्षणिकम हे बौद्धमत सर्वांना ज्ञात आहे. जगातील सर्व काही परिवर्तनशील व अनित्य आहे अशा बौद्धमताचा हेरॅक्लिटसने पुरस्कार केला. हेरॅक्लिटसच्या मते विश्वात कायमी, शाश्वत स्वरूपाचे असे काही नाही. या जगातील कोणतीही वस्तू स्थिर स्वरुपाची नाही.

सर्व वस्तू सतत बदलत असतात. केवळ बदल, एकसारखा बदल एवढीच गोष्ट आहे. त्याच्या मते आपण पाण्याच्या प्रवाहात परत ठेवू शकत नाही. कारण पाण्याचा प्रवाह तोच नसतो. नवे पाणी आलेले असते. त्याचप्रमाणे पाय ठेवणारा मीही तोच नसतो. नवे पाणी आलेले असते. त्याचप्रमाणे पाय ठेवणारा मीहि तोच नसतो. माझ्यातसुद्धा बदल झालेला असतो. भगवान बुद्धाने याच मताचा पुरस्कार केला. त्यांच्या या मताला 'क्षणभंगवाद' असे म्हणतात. जे आहे ते क्षणभरच असते व दुसऱ्या क्षणी नष्ट पावते. हेरॅक्लिटसने म्हटले की स्थिर असे काहीच नाही. "बदल व सतत बदल हीच वास्तविकता आहे." या विश्वातील सर्वकाही परिवर्तनशील आहे. विश्वाच्या मुळाशी नित्य व शाश्वत असे काहीही नाही. अंतिम सत्ता ही प्रक्रिया स्वरुपाची (Reality is a flux, a process) आहे. हे सांगण्यासाठी नदीच्या पाण्यातील प्रवाहाचे रूपक वापरले आहे. नदीच्या पाण्याचा प्रवाह हा गतिमान असतो या प्रवाहातील पाण्यात कोणालाही दोनदा उडी मारता येत नाही. ज्या पाण्यात पोहणारा पहिली उडी मारतो ते पाणी दुसऱ्या उडीच्या वेळी तिथून वाहून गेलेले असते. हे वर सांगितले आहेच. या विश्वातील कोणतेही मूलभूत द्रव्य पृथ्वी, आप (जल), वायू हे कायम स्वरूपाचे नसते. परंतु थेलीस सारखे निसर्गवादी व एकतत्त्ववादी आयोनियन तत्त्वज्ञ मूलतत्त्वाला स्थायी (स्थिर) स्वरूपाचे मानीत परंतु हेरॅक्लिटससारखे तत्त्वज्ञ मूलतत्त्वसुद्धा बदलणारे वा प्रवाही स्वरूपाचे मानतात.

हेरॅक्लिटसच्या मते विश्वातील शक्ती परस्परविरोधी असतात. त्यांच्यात संघर्ष चालू असतो. त्यांच्यात तणाव असतो. या तणावपूर्ण संघर्षातून या दृश्य जगातील वस्तू व घटना निष्पन्न होतात. म्हणून तो म्हणतो, War is the father of all things. परस्परविरोधातून वस्तू निर्माण होतात. अर्थात हेरॅक्लिटसचा हा सिद्धांत कार्ल मार्क्सच्या द्वंद्वात्मक विरोधविकासाची आठवण करून देतो. या विश्वातील विकास प्रक्रियेच्या मुळाशी ते 'अग्नी' वा 'तेज' हे तत्त्व मानतो. हे वैश्विक अग्नितत्त्वही गतिमान व प्रवाही (बदलणारे) आहे. त्याच्या आकुंचन क्रियेतून स्थिरवस्तू भासू लागतात. याल तो अधोगामी मार्ग मानतो. स्थिरवस्तूंच्या विरलीभवनातून पुन्हा अग्नीचे स्वरूप प्राप्त होते याला तो ऊर्ध्वगामी मार्ग म्हणतो.

मानवातील जीवात्मा हा वैश्विक अग्नी वा तेजस्वरूपी तत्त्वाचा अंश आहे. या आत्मिक अंशात बुद्धी आणि जाणीव विशेष रूपाने दिसून येते. यावरून अग्नितत्त्व हे जाणीव (बोधात्मक स्वरूपाचे असावे, असे म्हणता येईल. याला हेरॅक्लिटस 'लॉगॉस' असेही म्हणतो. लॉगॉस म्हणजे वैश्विक बुद्धी होय. या वैश्विक बुद्धीमुळेच विश्वात नियमबद्धता आहे. माणसाने आपल्या बुद्धीच्या सहाय्याने हे नियम शोधून त्यांच्यानुसार जगले पाहिजे. विकारांच्या अधीन न जाता, वासनांचे गुलाम न होता बुद्धी मान्य नियमानुसार जीवन घडविले पाहिजे. कारण या विश्वाच्या मुळाशी रचनात्मक ऐक्य आहे हे जाणण्यात शहाणपण आहे व मानवी जीवनाचे साफल्य आहे.

**मूल्यांकन :**

हेरॅक्लिटसने आत्मसंयम, इंद्रियदमन, स्वयंशिस्त, नियमांचा आदर करणे हीच नीतिमत्ता होय. लोकशाही राज्यात लोकांच्या विकारांना व वासनांना आवाहन केले जाते. म्हणून तो लोकशाहीला विरोध करतो. त्याने प्रचलित धर्मातील कर्मकाण्डाला विरोध केला. मानवीजीवन हा एक दु:खद खेळ आहे असा निराशाजनक सूर त्याच्या तत्त्वचिंतन दिसून येतो. केवळ ज्ञानी माणूस या विश्वरचनेच्या विश्वबुद्धीला जाणणारा असतो. अशाप्रकारे हेरॅक्लिटस हा बुद्धिवादी तत्त्वचिंतक होता. गौतमबुद्धांनी सामान्य माणसाचे प्रबोधन केले. या दृष्टीने विचार केल्यास हेरॅक्लिटस हा हेकेखोर राहिला. त्याच्या निराशाजनक विचारांमुळे त्याला Weeping philosopher असे म्हटले जाते. तो एक रहस्यवादी वा गूढवादी तत्त्वचिंतक होता. तो लोकाभिमुख न राहिल्यामुळे त्याच्या विचाराचा समाजमनावर प्रभाव पडला नाही. परंतु त्याच्या काही विचारांचा परिणाम आधुनिक काळातील तत्त्वचिंतकांच्या मतावर झालेला दिसतो. त्याची संघर्ष ही संकल्पना मार्क्सच्या साम्यवादात दिसून येते. 'अंतिम सत्ता' गतिमान प्रक्रियारूप आहे असे विचार मांडणाऱ्या हेरॅक्लिटसच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव अनेक तत्त्वज्ञांवर व विसाव्या शतकातील भौतिक शास्त्रांवर पडलेला आहे. अर्थात परिवर्तनाची समस्या सोडविण्याचे पार्मेनायडिजचे व हेरॅक्लिटसचे दोन्ही मार्ग निरुपयोगी आहेत. परिवर्तनास जरी भ्रम म्हटले तरी भ्रम शिल्लक राहतोच. आपणास त्याची जाणीव होते. म्हणून समस्या ही तशीच रहाते. हेरॅक्लिटसप्रमाणे नुसते परिवर्तनच सत्य आहे असे म्हणून भगत नाही. कारण परिवर्तन कशाचे तरी व्हावे लागते व ज्याचे परिवर्तन होते ते स्थिर असेच राहिले पाहिजे. परिवर्तनाचा ज्ञाता जो मी तो नित्य असला पाहिजे. जर अनुभव घेणारा ज्ञाता नाहिसा झाला तर स्मरण कोणाला होणार ? परिवर्तन प्रक्रियेत एकसारखे बदल होत असले तरी जे कारण आहे ते नित्यच असते परिवर्तनाची समस्या सोडविण्यासाठी कारण या संकल्पनेचा उपयोग केला जातो. अर्थात हेरॅक्लिटस व पार्मेनायडिजने ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला असला तरी त्याचे मार्ग निरुपयोगी ठरले आहेत हे या विवेचनावरून लक्षात येते.

**आपली प्रगती तपासा.**

१. हेरॅक्टिस याची परिवर्तनाची समस्या विशद करा.

## १.४ डेमॉक्रिटस (ख्रि. पूर्व ४६० ते ३७०)

डेमॉक्रिटस - (ख्रि. पू. ४६० जन्म, ख्रि. पू. ३७० मृत्यू) डेमॉक्रिटस याचा जन्म थेरस मधील अब्डेरा येथे ख्रि. पू. ४६० मध्ये झाला. त्याचा ज्ञानाची फार आवड होती. वा त्यासाठी त्याने दूरवर खूप प्रवास केले होते. त्याने इजिप्त, बाबिलोनिया, पर्शिया व अथेन्सल भेटी दिल्या होत्या. डेमॉक्रिटसचे मन सर्वस्पर्शी होते. त्याच्या काळातील तत्त्वज्ञानातील सर्व ज्ञानाचा त्याला जवळून परिचय होता. त्याच्या व्यापक चिंता शीलतेच्या बाबतीत त्याची ॲरिस्टॉटल्शी तुलना होऊ शकेल. डेमॉक्रिटस हा जरी भौतिकवादी होता तरी वृत्तीने तो एक महान चिद्वादी होता व त्याने आपले संपूर्ण जीवन

संशोधन करण्यात, प्रगल्भ विचारात व चिंतन करण्यात घालविले आणि राजपद मिळविण्यापेक्षा त्याला तत्त्वचिंतनात अधिक समाधान लाभून धन्यता वाटत असे.

ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांच्या तात्त्विक भूमिकेत वेगळेपणा असा दाखविता येत नाही. ते दोघेही अणूवादी आहेत. दोघांच्याही मते अंतिम सत्ता ही अजात, अनिर्मित व अविनाशी अशा अणूंची आहे. डेमॉक्रिटसच्या मते प्रामुख्याने पार्मेनायडिसच्या मताप्रमाणे या विश्वात निरपेक्ष निर्मिती व निरपेक्ष विनाश असे काही नसतेच. या विश्वातील सत्तेची जी असंख्य रूपे आहेत व जी गतिमानता आहे ती पार्मेनायडिसप्रमाणे असत्य, मिथ्या किंवा भासमान आहेस असे मानावयास डेमॉक्रिटस तयार नाही. त्याच्या मते पार्मेनायडिस आणि हिरॅकिल्टस या दोघांच्याही भूमिका संपूर्णपणे बरोबर नसल्या तरी त्या एकांगी आहेत व त्यांच्यात बरेचसे तथ्य आहे.

आपल्या तत्त्वज्ञानात एम्पिडोक्लिस याने पार्मेनायडिसची नित्य, शाश्वत व अविकारी सत्ता किंवा भाव व सतत बदलणाऱ्या अभावरुपी विकारी संभावाच्या कल्पनांचा समन्वय घडविणाचा प्रयत्न केला हे खरे. पण त्याने कणांची किंवा अणूंची किंवा परिमाणांच्या साहाय्याने गुणांची निर्मिती होऊ शकते याविषयी मात्र काही उत्पत्ती मांडली नाही. जे सर्व गुणात्मक भेद असतात ते कणांच्या किंवा अणूंच्या विविध प्रमाणातील संमिश्रणांनी निर्माण होतात अशा तऱ्हेची कल्पना मांडण्याआधीचा एम्पिडोक्लिसचा संक्रमणावस्थेतील विचार होता असे दिसते. त्याने विश्वातील सर्व पदार्थ मूलद्रव्यांच्या अणूंच्या संमिश्रणातून किंवा संयोजनातून घडतात असा विचार मांडलाच नाही. तो विचार ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांच्या मते कोणत्याही वस्तूचे व पदार्थाचे विभाजन केले तर त्याचे बारीक बारीक भाग करीत असता शेवटी ज्यांचे पुढे तुकडे किंवा भाग करता येत नाहीत अशा अविभाज्य एकका प्रत आपण येऊन पोहोचतो. ते इतके लहान, सूक्ष्म व संख्येने अगणित असतात की जे डोळ्यांना दिसू शकत नाहीत. ते कोणत्याही वस्तूचे किंवा पदार्थांचे अंतिम घटक अवयव असतात ; त्यांना 'अणू' (Atom) म्हणतात. हा कणवादाचा किंवा अणुवादाचा मूळ सिद्धांत आहे. भारतीय तत्त्वज्ञानात असा अणुवाद किंवा कणवाद वैशेसिकांनी प्रथम मांडला. त्यांच्या माताप्रमाणेही या विश्वातील सर्व वस्तू अविभाज्य कणांच्या किंवा अणूंच्या संयोजनातून तयार होत असतात. वैशेसिकदर्शनाचा प्रवर्तक ऋषी 'कणाद' होता व तो कण खाऊन राहात होता असे म्हणतात. 'कण अत्तिइति कणाद:' अशी त्या शब्दाची व्युत्पत्ती आहे. वैशेसिकांच्या मतेही जे अंतिम सप्त पदार्थ आहेत ते त्यांच्या विशेष गुणधर्मावरून ठरलेले आहेत. अंतिमभेद हे 'विशेष' आहेत व हे अंतिम आहेत असे दर्शनकार मानतात. म्हणून त्याला ' 'वैशेषिक' दर्शन असे म्हणतात. एम्पिडोक्लिस असे हे अंतिम स्वरूपाचे चार पदार्थ आहेत असे मानतो. परंतु 'अणुवादी' मात्र फक्त एकच अंतिम मूलद्रव्याचे किंवा पदार्थाचे सर्व अणु असतात असे मानतात. अणूंमध्ये गुणात्मक भेद मुळीच नसतात; त्यांच्यातील सर्व फरक किंवा भेद हे केवळ संख्यात्मक किंवा परिमाणात्मक असतात ते अणू आकारमानाने लहान - मोठे असे असतात त्यांचे आकारही भिन्न असतात. अंतिम अणुंना स्वतःचे असे गुणधर्म नसतात व म्हणून वस्तूचे जे प्रत्यक्ष गुणधर्म असतात ते त्यांच्या अणूंच्या रचना, अणूंची स्थाने व त्यांचे अभिकल्प यांच्या भेदामुळेच तयार होत असतात. म्हणजे अणूंच्या यांत्रिक

रचनेच्या सहाय्याने त्यांच्या गुणधर्मांचा अर्थ लावता येतो. 'सेंद्रिय रसायनशास्त्रत' परमाणंच्या विविध प्रकारच्या प्रकारच्या रचनांच्या सहाय्याने त्यांच्या गुणधर्मातील फरकांचे स्पष्टीकरण आधुनिक रसायनशास्त्रात जे दिले जाते त्याचा उगम या अणुवादात सापडतो.

ल्युसिपत डेमॉक्रिटस यांना अभिप्रेत असलेले अणू हे अत्यंत सूक्ष्म असल्याने डोळ्यांना न दिसणारे आकारमानाने फारच लहान, भिन्न आकारांचे व स्वतः चे असे कोणतेच गुणधर्म नसलेले आसे आहेत. त्यांच्या ठिकाणी असणारे गुणधर्म म्हणजे फक्त घनत्व (Salidity ) व अवेध्यता (Impenetrability) व अविभाज्यत्व (Indivisibility) हे होते. ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांच्या अणूंना स्वतःचे असे वजन होते का की वस्तूंचे वजन हे त्यातील अणूंच्या हालचाली व स्थितिवैशिष्टयामुळे असते हा एक प्रश्नच आहे एपिक्युरिअन्स अणूंना  वजन आहे असे मानतात. अणूंची कल्पना त्यांनी ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांच्यापासून उचलली होती हे खरे ; पण अणूंना वजन असते असे डेमॉक्रिटसचे मुळातच म्हणणे आहे की त्या मताची भर एपिक्युरिअन्सनी घातली हे मात्र निश्चितपणे सांगता येत नाही.

अणूंना सीमा असून ते एकमेकांपासून विभक्त व सुटे असतात आणि अणूंचे संभवन (Becoming) व वस्तूंचे गुणशीलत्व, अणूंचे संमिश्रण व वियोजन यामुळे होत असते असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा अणूंच्या हालचालींना रिकामी जागा असली पाहिजे, पोकळी असली पाहिजे हे स्पष्टच आहे; कारण स्थानांतरण होण्यासाठी मोकळी जागा, रिकामा अवकाश असलाच पाहिजे; नाहीतर ते फिरुच शकणार नाहीत, एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी त्यांचे जाणेच राहणार नाही. अणुवाद्यांच्या मते रिकामा अवकाश हाच अ-भाव किंवा अ-सत् आहे व या अर्थाने अ-भाव किंवा अ-सत्  हे अस्तित्वात असते. या बाबतीत डेमॉक्रिटस म्हणतो, 'सत् हे असत्यपेक्षा कशानेही अधिक सत्य असत नाही.' अणु हे गुणविरहित असल्यामुळे ते रिकाम्या अवकाशापासून दुसऱ्या कोणत्याही बाबतीत भिन्न नसतात; फक्त ते 'भरीव' असतात. हाच काय तो त्यांचा रिकाम्या अवकाशापासूनच फरक किंवा भेद होय. म्हणून अणू व शून्यता यांना प्लेनम व पोकळी म्हणतात.

अणू हे गणिताच्या अर्थाने अविभाज्य आहेत असे नाही तर ते वास्तविक व भौतिक अर्थाने अविभाज्य आहेत; याचा अर्थ असा की, त्यांच्यामध्ये रिकमा अवकाश किंवा पोकळी नाही. सौद्धातिंक दृष्टिने पाहाता या अर्थाने अणू हा जगाएवढा मोठा का असू नये असे न मानण्यास काही कारण असू शकत नाही. असा हा अणु पार्मेनायडिस याचा विश्वगोल असू शकेल. सर्व अणु हे अदृश्य आहेत याचा अर्थ सर्व अणू एकाच आकारमानाने असले पाहिजेत, असे नाही. कारण दृश्यत्वाला लागणाऱ्या सीमेच्या खाली जी अणूंची आकारमाने असतील त्यात अनंत विविधता असू शकेल.

वजन हा अणूंचा प्राथमिक गुणधर्म नाही; म्हणून वस्तूचे वजन हे अणूंचे आकारमान व त्यांची संयोजने यावरून ठरते असे ल्युसिपस मानतो. वजनाला मूळ अणुवाद्यांच्या दृष्टीने दुय्यम किंवा गौण महत्त्व आहे. कारण आकारमान अतिशय वाढले म्हणजे वस्तूस वजन

प्राप्त होते असे ते मानत. 'वजन' ही निरपेक्ष संकल्पना नाही ही अत्यंत महत्त्वाची वैज्ञानिक कल्पना प्राचीन ग्रीकांनाही आली होती असे म्हणावयास हरकत नाही.

ल्युसिपस दिक्ला असत्य समजत होता म्हणजे त्याच्या मते ही भौतिक वस्तू नव्हती. नंतरचे एपिक्युरिअन्स मात्र असे मानत होते की वजनामुळे शून्यामध्ये अणू हे खालच्या दिशेकडे पडत रहातात. कदाचित त्यांच्या या विचारावर ॲरिस्टॉटलच्या निरपेक्ष वजनदारपणा व हलकेपणा याविषयीच्या कल्पनांचा परिणाम झाला असावा. परंतु डेमॉक्रिटसाना शून्यात 'वर', 'खाली', 'मध्ये' असे विभाग करणे हे अशक्य वाटत असे.

अणुवाद्यांनी समजण्यात एक चूक केली की निर्वात प्रदेशात हलक्या वस्तूपेक्षा जड वस्तू अधिक जलद खाली पडतात. खरे म्हणजे हलक्या व जड वस्तू सारख्याच वेगाने पडत असतात. पण या अणुवाद्यांचे मात्र असे मत आहे की जड अणु हे हलक्या अणूंपेक्षा अधिक वेगाने पडत असल्यामुळे ते हलक्या अणूंना धक्के देतात व त्यांना एका बाजूला किंवा वरच्या बाजूला ढकलतात, अशा या अणूंच्या प्रचंड हालचालींमुळे व ढवळण्याने भोवरा तयार होतो व त्यामुळे समानधर्मी अणू एकत्र येतात आणि अणूंच्या अशा एकत्रीपणाने सृष्टी तयार होते. दिक् किंवा अवकाश अमर्याद आहे व त्यात अणूंचे पतन हे अप्रतिहतपणे व सतत चालत राहात असल्याने तिच्यात असंख्य सृष्टी - जगे निर्माण होत असली पाहिजेत व आपले हे जग त्यांपैकी एक आहे. जेव्हा हे एकत्र किंवा संयोजित झालेले अणू परस्परांहून वियुक्त किंवा विलग होतात तेव्हा आपल्या ह्या विवक्षित जगाचे अस्तित्व संपुष्टात येते. पण ही सर्व प्रक्रिया घडू शकते हे मत अणूंना वजन आहे, या उपपत्तीवर आधारलेले आहे.

पण हे जर खरे मानले तर ल्युसिपस व डेमॉक्रिटस या मूळ अणुवाद्यांनी हालचालीचे कारण तरीकोणते मानली ? म्हणजे विश्वातील हालचालीच्या किंवा गतिमानतेच्या कारणाविषयी अणुवाद्यांच्या मनात गोंधळ होता. म्हणजे विश्वातील गतिमानतेस अमुक एक कारण जबाबदार आहे असे त्यांना निश्चितपणे सांगता येत नाही.

डेमॉक्रिटसच्या मते, जगातील सर्व घटना, बदल, परिवर्तने, स्थित्यंतरे, संभवन हे संपूर्णतः आंधळ्या किण्व बुद्धी व विचार विरहित व संकल्पविरहित अशा आडदांड यांत्रिक शक्तींनी नियंत्रित होतात असे डेमॉक्रिटसचे मत आहे, असे दिसते. कारण अणुवाद्यांना वैज्ञानिक भुमिकेवरून विश्वातील व सृष्टीतील सर्व घटनांच्या वर्तनाचे उपपादन हे जास्तीत जास्त हेतुविरहित आणि भौतिक व यांत्रिक शक्तींच्या सहाय्याने करणे अधिक संयुक्तिक व आवश्यक वाटणे साहजिक आहे.

डेमॉक्रिटसच्या मते आल्याच्या अणूंची हालचाल ही सूर्यकिरणात जे सूक्ष्म धूलिकण सर्व दिशांत वारा वाहात नसतानाही इतस्तत: फिरत असतात त्यांच्या हालचालीसारखी असते. वेगवेगळ्या प्रकारच्या पदार्थांच्या स्वरूपाचे विशदीकरण हे त्यांच्या घटक अणूंचे आकार, आकारमान व त्यांची स्थिती यांच्या सहाय्याने करावे असे अनुवाद्यांचे मत आहे. या दृष्टीने अनुवादी असे मानतात की 'अग्नी', हा चिकण व गोल अणूंनी बनलेला आहे. आलाही चिकण व गोल अणूंनी बनविला असून तो अत्यंत शुध्द व परिष्कृत अग्नी आहे. मृत्युच्या वेळी आत्म्याचे अणू विखुरले जातात व म्हणून भावी जीवनाचा किंवा पुनर्जन्माचा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही.

याशिवाय डेमॉक्रिटसने आपली स्वतःची संवेदनविषयक अशी उपपत्ती मांडली आहे. त्या उपपत्तीप्रमाणे जगातील वस्तू स्वतःच्या प्रतिमांचे बाहेर प्रक्षेपण करीत असतात व त्या प्रतिमा अणूंच्या बनलेल्या असतात. या प्रतिमा ज्ञानेंद्रियांवर आघात करतात व समानधर्मी अणू समानधर्मी अणूंना संवेदित होतात. जेव्हा आत्मा समशीतोष्ण अवस्थेत असतो तेव्हा विचार हा सत्य असतो, तो खऱ्या अर्थाने कळतो. गंध, रुची, रंग यासारखे इंद्रियसंवेध गुण हे वस्तूंच्या ठिकाणी वसत नसतात, तर ते ज्या पद्धतींनी आपल्या ज्ञानेंद्रियांवर परिणाम घडवितात त्या पद्धती व्यक्त करतात व म्हणून ते गुणधर्म व्यक्तिसापेक्ष असतात.

आणखी हेही लक्षात ठेवले पाहिजे की, ल्युसिपस व डेमॉक्रिटस यांचे अणू पायथागोरियन चिदणू असून पार्मेनायडिसच्या सत्तेचे गुणधर्म त्यांच्या ठिकाणी आहेत. एका दृष्टिने असेही म्हणता येईल की आधुनिक कालखंडातील अणु वास्तवशास्त्राची मुलभूत वैचारिक व वैज्ञानिक बीजे की सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी ग्रीसच्या ल्युसिपस व डेमॉक्रिटस या वैज्ञानिक विचारवंतांच्या तत्त्वज्ञानात रोवलेली आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१. डेमॉक्रिटस याची अणुवादी भूमिका विशद करा.

## १.५ सोफिस्ट

ग्रीक नगरराज्यातील काही पंडितानी जुनी परंपरा व जुन्या तत्त्वज्ञानाच्या विचारांवर संशय प्रकट केला. त्यांच्या दृष्टिकोन हा व्यावहारिक होता. मनुष्याने विश्वासंबंधीच्या चिंतनात सोडचिठ्ठी देऊन मानवी व्यवहार आणि समाज याबाबतीत विचार करायला हवा. या विश्वाच्या वा सृष्टीच्या मुळाशी काहीही असेल आणि जरी ते समजले तरी त्याचा व्यावहारिक प्रश्न सोडविण्यासाठी काय उपयोग ? अशाप्रकारे उपयोगितेचा वा व्यावहारिक दृष्टिकोन ध्यानात ठेऊन मनुष्यविषयक व्यावहारिक प्रश्नांवर अधिक जोर दिला असे सोफिस्ट (Sophist) होते. याच पंडितांना 'सोफिस्ट' असे म्हटले जाते. Philosophy या शब्दात Philo आणि Sophia म्हणजे ज्ञान. म्हणून सोफिस्ट म्हणजे ज्ञानदाता, पंडित, विवेकी, बुद्धिमान कि ज्याने विशिष्ट क्षेत्रात प्रगल्भ यश संपादन केलेले आहे, असा मनुष्य होय. अर्थात हे सोफिस्ट त्याकाळचे विचारवंत लोकशिक्षणकार व बुद्धिजीवी लोक होते. सोफिस्ट या नावाची कोणती एक तत्त्वज्ञानाची प्रणाली नाही. परंतु या सोफिस्टांमध्ये काही गोष्टी समान दिसतात. तत्त्वज्ञानाला ते 'मनुष्यकेंद्री' करीत होते. व्यावहारिक ज्ञान समाजात पसरविण्यासाठी इच्छूक होते. म्हणून त्यांना सार्वजनिक शिक्षण तज्ञ, समाजशिक्षक, लोकशिक्षणकार या नावाने संबोधित केले जाते. हे सोफिस्ट जे व्यावहारिक ज्ञान तरुणांना देत असत त्याचा मोबदला म्हणून त्यांच्याकडून पैसे घेऊ लागले, ते पैशासाठी शिक्षण देऊ लागले. विद्या ही पवित्र वस्तू आहे व ती विकायची नसते अशी प्राचीन ग्रीकांची धारणा होती. सोफिस्टांची ज्ञानदात्याची भूमिका ही आर्थिक व राजकीय समस्यांनी बांधलेली व मर्यादित होती. म्हणून सोफिस्ट या शब्दाचा अर्थ चांगला असूनही त्याला हळूहळू हिनकस वा वाईट अर्थ प्राप्त झाला. राजकारण हा एक महत्त्वाचा विषय असल्यामुळे या विषयाच्या क्षेत्रात पुढे

जाणण्यासाठी शब्दच्छल कसा करावा ? कोणत्या युक्त्या लढाव्यात ? लोकांवर प्रभाव पाडणारी भाषा कशी बोलावी ? अशा प्रकारचे व्यावहारिक ज्ञान देऊन सोफिस्टांनी जे ज्ञानाच्या व नीतीच्या क्षेत्रात बौद्धिक मानदंड असतात त्यांची उपेक्षा केली. त्यामुळे सोफिस्ट या शब्दाला अर्थार्जनासाठी बुद्धी व विद्येचा उपयोग करणारे असा हिनकस, वा वाईट अर्थ प्राप्त झाला. म्हणून सोफिस्ट मत्स्यन्यायाचा प्रचार करीत तर काही निराशावादाचा वा शून्यवादाचा प्रचार करीत.

सोफिस्ट हे अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, निष्णात, वाक्पटू, संभाषण चतुर व उत्तम युक्तिवाद करणारे होते. त्यांच्याविषयी लोकांची मते कुलषित झाली. याचे कारण ते आपल्या बुद्धिमत्तेचा दुरूपयोग करून त्यांनी व्यवहारज्ञानाची दुकाने मांडली. खऱ्याचे खोटे करणे, शब्दजल करणे, वादविवादात प्रतिपक्षाला कसे हरवावे याचे शिक्षणही  काही सोफिस्ट देऊ लागले त्यामुळे सोफिस्ट हा शब्द बदनाम झाला. पैसे घेऊन व्यवहारात कोणत्याही प्रकारचे यशस्वी कसे व्हावे याचे शिक्षण देणारे व अर्थाजन करणारे लाभार्थी स्वार्थी लोक म्हणून लोक त्यांच्याकडे बघू लागले सत्य व असत्य चांगले व वाईट या द्वंद्वाना वस्तुनिष्ठ आधार नाही. प्रभावी माणूस जे ठरवील तेच सत्य असे समीकरण होऊ लागले. बळी तो कण पिळी हा जंगलाचा न्याय समाजात विशेषतः तरुणांमध्ये रूढ होऊ लागले. वाईटाची नीति समाजात बळावू लागली. सत्यासत्य व शुभाशुभ यांच्यातील रेषा धूसर होऊ लागली. यालाच बौद्धिक व नैतिक अराजकता  (Intellectual & Ethical Anarchy) म्हणतात.

### १.५.१ प्रोटॅगोरस (ख्रि. पूर्व ४८१ ते ४११)

प्रोटॅगोरस (जन्म ख्रि. पू. ४८१ - मृत्यू ख्रि. पू. ४११)

प्रोटॅगोरस याला आदराने 'अब्डेराचा मुनी' या शब्दांनी  संबोधतात. त्याचा जन्म अब्डेरा येथे सुमारे ख्रि. पू. ४८१ मध्ये झाला होता. त्याचा व्युसिपसशी परिचय होता व डेमॉक्रिटस हा त्याचा त्याच्याहून वयाने लहान असा समकालीन होता. त्याने ॲथेन्सला अनेक वेळा भेटी दिल्या होत्या. त्याचा पेरिक्लिसशी दृढ स्नेह होता आणि युरिपिडीसशीही त्याचा दाट परिचय होता. सर्वत्र त्याचे आदराने स्वागत होत असे. त्याचे कार्य अनेकांगी होते. प्रोटॅगोरासचे  लिखाण निश्चित स्वरुपात उपलब्ध नाही. त्याची काही वचने जी सापडतात त्यांत त्याच्या ते असे - "जगात ज्या वस्तू आहेत त्या तशा असण्याचे व ज्या तशा नाहीत त्या तशा नसण्याचे प्रमाण मनुष्य हाच आहे." त्याचा मृत्यू ख्रि. पू. ४११ मध्ये तुर्की मधील मिलोटस येथे झाला.

प्रोटॅगोरासची शिकवण ही मूलतः ज्ञानेंद्रियांची व संवेदनाने मिळणारे ज्ञान व बुद्धीने मिळणारे ज्ञान यांत होणाऱ्या गोंधळातून निर्माण झाली आहे असे म्हणता येईल. म्हणजे बुद्धी व इंद्रिय-संवेदन यांतील फरक आपण स्पष्टपणे समजावून घेतला पाहिजे. बुद्धीला किंवा प्रज्ञेला होणारे ज्ञान सार्वदेशिक व साधारण स्वरूपाचे असते तर संवेदन हे विवक्षिताचे किंवा विशिष्टाचे असते. बुद्धीला किंवा प्रज्ञेला होणारे ज्ञान सार्वदेशिक व साधारण स्वरूपाचे असते तर संवेदन हे विवक्षिताचे किंवा विशिष्टाचे असते. बुद्धीला होणाऱ्या ज्ञानाचे संप्रेषण होऊ शकते, तसे संवेदनाचे संप्रेक्षण करता येत नाही. संवेदन हे

प्रत्येकापुरते व व्यक्तिविशिष्टच राहाते. त्याची जाणीव फक्त विशिष्ट व्यक्तीपुरतीच मर्यादित राहाते. पण विचार दुसऱ्याला सांगता येतो, पटवून देता येतो. म्हणजे व्यक्तीपुरताच अनुभव, संवेदन व ज्ञान मर्यादित राहाते व दुसऱ्याला सांगता व पटविता येत नाही, अशा अर्थाने ज्याला जे प्रतीत होते ते त्याच्या दृष्टीने सत्य असते अशी व्यक्तिनिष्ठ व व्यक्तिविशिष्ट भूमिका प्रोटॅगोरासची आहे असे डब्ल्यू. टी. स्टेसचे मत आहे. प्रोटॅगोरसला हे विधान करताना विशिष्ट व्यक्ती अभिप्रेत आहे - संपूर्ण मानवजात अभिप्रेत नाही आणि 'माप' याचा अर्थ सत्य मोजण्याचे 'प्रमाण' असा अर्थ आहे; म्हणजे प्रत्येक व्यक्तीला स्वतः ला जे योग्य किंवा आदर्श वाटते त्याचे ते 'प्रमाण' असते, व जेवढया भिन्न व्यक्ती असतील तेवढी त्यांची सत्यविषयी प्रमाणेही भिन्न बनतील अशी स्टेसच्या मते प्रोटॅगोरासची भूमिका आहे.

ज्ञानाच्या प्रक्रियेत आपण ज्ञाता व ज्ञेय किंवा मन व विषय, व्यक्ती व ज्ञानवस्तू यांत करीत असतो. या दोघांपैकी एकावर दुसऱ्यापेक्षा जेव्हा अधिक जोर दिला जातो तेव्हा एकांगी व अतिरेकी भूमिका तयार होतात आणि या भूमिका अनुक्रमे व्यक्तिनिष्ठ किंवा व्यक्तिकेंद्री किंवा ज्ञातकेंद्री व वस्तुनिष्ठ,वस्तुकेंद्री किंवा ज्ञेयकेंद्री अशा संबोधल्या जातात. सत्याच्या बाबतीतही या दोन भूमिका लक्षात घ्यावयास पाहिजेत. जेव्हा प्रोटॅगोरास सत्यास व्यक्तिनिष्ठ किंवा ज्ञातकेंद्री म्हणून समजतो तेव्हा त्याचा अर्थ जेव्हा व्यक्तीस एखादे सत्य जाणवते तेव्हा ते तिच्या इच्छा- आकांक्षा, आवडी-निवडी, प्रवृत्ती, काल अभिरुची, अभिवृत्ती यांवर अवलंबून राहून त्यांनी ते निर्धारित होते. त्याचे स्वरूप व्यक्तीच्या विशिष्ट प्रवृत्तीवरून ठरते व ते केवळ तिच्यापुरते खरे ठरते. तिच्याहून कोळ्या व्यक्तींना तिला वाटणारे सत्य हे सत्य म्हणून मान्य होईलच किंवा मान्य झालेच पाहिजे असे नाही. कारण त्यांपैकी प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र असते व तिला स्वतःच्या आणखी वेगळ्या इच्छा - आकांक्षा, आवडी-निवडी, प्रवृत्ती, काळ, अभिरुची व अभिवृत्ती असतात व म्हणून या सर्वांना अनुलक्षून तिला स्वतःला जे सत्य वाटेल ते वेगळेच असेल व इतरांना जे वाटेल ते तिला सत्य वाटेलच असे नाही अशी एकदा भूमिका जर मान्य केली तर ती अतिरेकी व्यक्तिनिष्ठवादाप्रत नेते. तेव्हा 'मानव-मापन' उपपत्तीच्या निमित्ताने प्रोटॅगोरास याला एकांगी किंवा अतिरेकी व्यक्तिनिष्ठवादाची भूमिका प्रतिपादावयाची होती की काय याचा सखोल व मूलगामी विचार व्हावयास पाहिजे.

स्टेसच्या भूमिकेहून या संदर्भात वेगळी अशी भूमिका झेलर व गॉम्पर्स यांनी मांडली आहे. प्रोटॅगोरासाला अभिप्रेत असलेले 'मानव' हा प्रत्येक स्वतंत्र 'मानवी व्यक्ती' आहे की तो शब्द अखिल मानवजातीस अनुलक्षून म्हणजे जातिवाचक या अर्थाने त्याने वापरले आहे या बाबतीत मतभेद आहेत. खरे म्हणजे हा मुद्दा संदिग्धच आहे व म्हणून त्याची वेगवेगळी अर्थ विवरणे झालेली पाहावयास सापडतात. 'मानव' हा शब्दं एकव्यक्तीवाचक नसून तो जातिवाचक किंवा सामुहिक अर्थाने (म्हणजे राष्ट्र, टोळी इत्यादी) वापरलेले आहे असे झेलरचे मत आहे.

झेलरच्या मते प्रोटॅगोरास हा व्यक्तिवादाचा प्रतिनिधी मुळीच नव्हता. याचे कारण थिआटेटस या संवादात प्लोटो सॉक्रेटिसच्या तोंडून सोफिस्टांचे जे वर्णन करतो त्या अन्वये सोफिस्टांचे कार्य हे एखाद्या माळ्याच्या किंवा वैद्याच्या कार्यासारखे आहे असे

सुचविले आहे. आणखी शिक्षणाने आत्म्याची वाईट अवस्था बदलून ती सुधारता येते व व्यक्तीमध्ये चांगल्या व निरोगी भावना व वृत्ती यांचे आरोपण करता येते असेही मत व्यक्त केले आहे. दुसऱ्या एका ठिकाणी प्लेटोच्या संवादात प्रोटॅगोरासने असेही म्हटले आहे की निती व न्याय यांशिवाय आदराची भावना असल्याशिवाय कोणताही समाज जगू शकत नाही. यावरून झेलरने असे मत व्यक्त केले आहे की प्रोटॅगोरासच्या मते सर्व नीती व कायदे हे फक्त सापेक्षत:च योग्य असतात. हे निस्संशय आहे; आणि असे प्रत्येक समाजाने घडविलेले नीतिनियम फक्त त्याच समाजास बंधनकारक असतात आणि तेही जोपर्यंत तो समाज त्या कायद्यांना व नीतीला योग्य व चांगले समजतो तोपर्यंत ते त्या समाजावर बंधनकारक असू शकतात. या दृष्टिकोनातून पाहिल्यास सर्वकाळात अबाधितपणे व अपवादाशिवाय लागू पडणारा असा निरपेक्ष धर्म, निरपेक्ष नीती व निरपेक्ष न्याय नसतो.

प्रोटॅगोरासची भूमिका अनुभवनिष्ठ असल्याने जे इंद्रियगम्य नाही त्याचा स्वीकार करण्याकडे त्याची प्रवृत्ती नाही. 'स्पर्शिका' वर्तुळाचा फक्त एकाच बिंदूत स्पर्श करीत नाही असे प्रोटॅगोरासने एका ठिकाणी म्हटलेले आहे. म्हणजे त्याची तात्त्विक भूमिका अनुभववादी जॉन स्टुअर्ट मिल्लसारखीआहे असे म्हणता येईल. मिल्लनेही 'व्याख्यांशी तंतोतंत जुळणाऱ्या वास्तव वस्तू नसतात' असे म्हटलेले आहे. म्हणजे परिमेयाशिवाय बिंदू नसतात, रुंदीशिवाय रेषा नसतात, परिपूर्णपणे सरळ रेषा नसतात, सर्व त्रिज्या तंतोतंत समान असणारी वर्तुळे नसतात, इत्यादी भूमितीतील सर्व सत्ये व विधाने हे अनुभवनिर्मित आहेत की अनुभवपूर्व आहेत याविषयी प्रोटॅगोरासची भूमिका काय असावी असा विचार केला तर त्याची भूमिका आधुनिक जॉन लेस्ली, जॉन हर्शेल, मिल्ल व हेल्म होल्टस या अनुभववाद्यांप्रमाणेच भूमितीतील सिद्धांत, गृहीत तत्त्वे व व्याख्या या अनुभवाधिष्टीत आहेत अशीच असावी असे म्हणता येईल. प्रोटॅगोरासचे तत्त्वज्ञान अनुभववादी आहे. सर्व ज्ञानाचा उगम संवेदनात आहे अशी त्याची भूमिका आहे.

प्रोटॅगोरासची भूमिका जरी सापेक्षवादाची होती तरी त्याने मूल्यांचा संपूर्णपणे इन्कार केला नाही किंवा त्याचा निरास केला नाही. त्याचा मुख्य मुद्दा असा आहे की स्थल कालनिरपेक्ष किंवा देशकाळपात्र निरपेक्ष अशी केवळ पोकळीत मुल्ये असू वाढू व जगू शकत नाहीत. त्यांची मुक्तता बदलत्या काळानुरूप बदलत असते व प्रत्येक काळाला आवश्यक व अनुरूप अशी मूल्ये असावी व घडवावी लागतात, तरच ती लोकजीवनास उपयुक्त व मार्गदर्शक ठरून त्यांचा प्रभाव लोकजीवनावर राहातो. कालबाह्य मुल्ये ही निरुपयोगी ठरतात.

प्रोटॅगोरास हा आधुनिक प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान्यांच्या पुरोगामी होता. आधुनिक प्रत्यक्षवादाची मूळ बीजे प्रोटॅगोरासच्या अनुभववादी, निरीक्षणप्रयोगवादी, निकषणप्रधान व विगामी विचारसरणीत पाहावयास मिळतात. प्रोटॅगोरास व त्याचे सहकारी सोफिस्ट हे प्रामुख्याने खंदे वक्ते, वाक्पटु, वादविवादपारंगत व उच्चदर्जाचे अलंकार

शास्त्रज्ञ होते. प्रतिपक्षाला आपल्या भाषेवरील व वक्तृत्वावरील प्रभुत्वाने नामोहरम व पराभूत कसे करावयाचे याचे शास्त्र ते चांगलो जाणत होते. निष्णात अलंकारशास्त्राज्ञाने

त्याच्या मते दोन उद्दिष्टे समोर ठेवली पाहिजेत. पाहिले म्हणजे त्याने विरोधकांचा प्रचंड तोफखाना आपल्या उपहासपूर्ण वाग्युद्धाने नाकाम केला पाहिजे व दुसरे म्हणजे त्याने विरोधकांचे तीक्ष्ण बाण आपल्या बुद्धिवादी युक्तिवादांच्या अभेद्य ढालीवर झेलले पाहिजेत व त्यांना बोथट केले पाहिजे.

प्रोटॅगोरास हा एक अत्यंत प्रभावी, चतुर व यशस्वी अध्यापक होता. त्याला शिक्षणाचे महत्त्व नीट समजले होते. त्याच्या मते शिकवण्याला एक विशिष्ट कृत्ती स्वभावत:च लागते व तिला वळण लावावे लागते व तेही तारुण्यातच करावे. आणि त्या बाबतीत सिद्धांताशिवाय केवळ आचरण किंवा आचरणा- शिवाय सिद्धांत याचा काही उपयोग होऊ शकत नाही. प्रोटॅगोरासचे संस्कृतीविषयीचे मत फार महत्त्वाचे आहे. तो म्हणतो, 'आपल्या अंतरंगात खोलवर भिडल्याशिवाय आत्म्यात संस्कृती बहरत नाही.' प्रोटॅगोरास हा एक निष्णात भाषाशास्त्रात व अलंकार शास्त्रज्ञ होता. वक्तृत्व, संभाषण व वादविवाद परिणामकारक होण्यासाठी त्याने भाषाशास्त्र अधिक प्रभावी बनविण्याचा प्रयत्न केला. शिक्षणक्रमात त्याने व्याकरणाला प्रथम स्थान दिले.

**आपली प्रगती तपासा.**

१. प्रोटॅगोरास याची तत्त्वज्ञानविषयक भूमिका विशद करा.

## १.६ सारांश

सॉक्रेटिस पूर्व काळात सोफिस्टांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यात प्रोटॅगोरस, थ्रॅसिमॅकस, गॉरजिआस यासारखे काही सोफिस्ट होते. त्यांनी निसर्गवादी तत्त्वज्ञांपेक्षा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जे योगदान दिले ते, मानवकेंद्री तत्त्वज्ञान करण्याचा होय. "मानव हाच सर्व वस्तूंचा मापदंड आहे." असे त्यांनी प्रतिपादन केले. त्याकाळी सोफिस्ट हे त्यासामाजाचे लोकशिक्षक म्हणून बुद्धीजीवी, विचारवंत वा पंडित म्हणून संबोधिले जात. ते व्यावहारिक ज्ञान समाजात पसरवित होते. अर्थात त्यांचे उद्दिष्ट अर्थाजन करणे एवढया पुरतेच मर्यादित होते. त्यांची ज्ञानदात्याची भूमिका ही आर्थिक व राजकीय समस्यांनी बांधलेली व मर्यादित होती. पुढे सोफिस्टांविषयी जनमानसात अनादरही निर्माण झाला.

थेलीस यांनी पाणी हे विश्वाचे मूलद्रव्य असले पाहिजे असे मानले आहे. तर ॲनॅक्झिमँडर यांनी म्हटले आहे की, विश्व तर अगाध आहे. या विश्वाचे उपादानकारण एकच असावे, परंतु ते सूक्ष्म अदृश्य व मर्यादित असू शकत नाही. ॲनॅक्झिमिनिज यांनी विश्वाचे उपादान कारण एकच असावे, परंतु ते सूक्ष्म अदृश्य व मर्यादारहीत असावे असा निष्कर्ष त्याने काढला. व त्यास वायू असे म्हटले. परिवर्तनाच्या बद्दल पार्मेनायडिस व हेरॅक्लिटस यांनी आपले विचार स्पष्ट केले आहेत.

सोफिस्टांनी ज्ञानमीमांसेत व नीतीमीमांसेत जी मोलाची भर टाकली ती महत्त्वाची आहे. ज्ञान हे व्यक्तिसापेक्ष या विचारसरणीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाची उभारणी झाली. इंद्रियानुभवावर आधारित संवेदन हेच ज्ञानाचे त्यांनी प्रमाण मानले. संवेदन अनुभव व ज्ञान हे व्यक्तिपुरतेच मर्यादित राहते. दुसऱ्याला ते सांगता येत नाही. प्रत्यक्ष वा संवेदनाने

जे ज्ञान होते ते त्याच दृष्टीने सत्य असते, अशी ज्ञानविषयक भूमिका सोफिस्टांनी घेतली. त्यांनी समाजात नीती, रूढी, परंपरा, न्याय, धर्म, ईश्वर शासनसंस्था, कुटुंबा विषयी आपली स्वतंत्र मते व्यक्त केली. सदगुण शिकवल्याने येतात. असा सोफिस्टांचा सिद्धांत आहे. सद्गुण हे जन्मावर, कुटुंब व वर्ग यांच्या स्वरूपावर अवलंबून न राहाता योग्य व अयोग्य, चांगले व वाईट याचे यथार्थ ज्ञान करून देण्याने माणसाचे आचरण सद्गुणी बनविता येते अशी सोफिस्टांची धारणा होती. त्यांनी शिकवण्याकरून ग्रीक नागरिकांना सद्गुणी बनविता येते अशी सोफिस्टांची धारणा होती. त्यांनी शिकवण्याकरून ग्रीक नागरिकांना सद्गुणी बनविण्याची आकांक्षा बाळगली होती. थोडक्यात सोफिस्टांनी नीतीच्या क्षेत्रातही महत्त्वाची कामगिरी केली. पुढे सॉक्रेटिस या बुद्धिवादी तत्त्वज्ञाने समाजविषयक विचारांना योग्य दिशा व समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे महान कार्य केले.

## १.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१. "मानव सर्व वस्तूंचे प्रमाण वा मापदंड आहे." या सोफिस्टांच्या विचारांचे चिकित्सक परीक्षण करा.

२. थेलीसचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण सविस्तर विशद करा.

३. ॲनॅक्झिमँडर व ॲनॅक्झिमिनिज यांचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण विशद करा.

४. पार्मेनायडिज याची परिवर्तनाची समस्या सविस्तर स्पष्ट करा.

५. हेरॅक्टिस याची परिवर्तनाची समस्या सविस्तर स्पष्ट करून मुल्यमापन करा.

६. डेमॉक्रिटस याची अणुवादी भूमिका सविस्तर विशद करा.

७. प्रोटॅगोरास याची तत्त्वज्ञानविषयक भूमिका विशद करा.

**थोडक्यात टीपा लिहा**

१. ग्रीकांचे तीन कालखंड

२. थेलीसचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण

३. ॲनॅक्झिमँडर यांचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण

४. ॲनॅक्झिमिनिज यांचा विश्वोत्पत्तीचा दृष्टिकोण

५. पार्मेनायडिज याची परिवर्तनाची समस्या

६. हेरॅक्टिस याची परिवर्तनाची समस्या

७. डेमॉक्रिटस याची अणुवादी भूमिका

८. प्रोटॅगोरास

❖❖❖❖

# २

## सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती व नीतिशास्त्र

## (Socrates : Methods and Ethics)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती

२.३ सॉक्रेटिस प्रश्नोत्तर संभाषण पद्धती

२.४ सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टिकोन

२.५ सॉफिस्टांच्या विचारांचे खंडन

२.६ प्लेटोची ज्ञानमीमांसा

२.७ प्लेटोचे आयडियाज चा सिद्धांत

२.८ समीक्षा

२.९ सारांश

२.१० विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

२.११ संदर्भ

---

### २.० उद्दिष्टये

---

१) सॉक्रेटिसच्या अभ्यास पद्धतीचा परिचय होईल.

२) सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर (संभाषण) पद्धती अभ्यासता येईल.

३) सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टिकोन समजावून घेता येईल.

४) प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व समजून घेणे.

५) प्लेटोचा ज्ञानविषयक सिद्धांत जाणून घेणे.

६) प्लेटोचा आयडियाजच्या सिद्धांताचे महत्त्व जाणून घेणे.

७) प्लेटोच्या रूपकांचा अर्थ व महत्त्व समजून जाणून घेणे.

## २.१ प्रस्तावना

सॉक्रेटिसच्या तत्त्वज्ञानाचा विचार करतांना त्या अगोदरची पार्श्वभूमी पाहणे गरजेचे आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानाची सुरुवात ग्रीक नगरराज्यांमध्ये प्रथम तत्त्वज्ञानाने होते. इ.स. पूर्व सहाव्या शतकात ग्रीक नगरराज्यांमध्ये प्रथम तत्त्वज्ञानाची सुरुवात झाली. तत्त्वज्ञान सर्व शास्त्रांची जननी आहे. तत्त्वज्ञानामध्ये मानवीबुद्धी किंवा जिज्ञासा महत्त्वाची आहे. म्हणून प्लेटो म्हणतो, 'तत्वज्ञान हे आश्चर्यभावनेचे अपत्य आहे.

१५०० वर्षापूर्वी ग्रीक नगरराज्यांमध्ये शैक्षणिक संस्था नव्हत्या. सर्व ग्रीकांसाठी सर्वांना समान अशी धर्मसंस्था पण नव्हती. होमरसारख्या महाकवीने जे काही विचार काव्यात्मक भाषेत मांडले होते, त्यांचाच प्रभाव ग्रीकांवर होता. इ. स. पूर्व सहाव्या शतकात थेलीस नावाच्या विचारवंताने स्वतः च्या बुद्धीने विश्वाच्या उत्पत्तीविषयी व विश्वाच्या मूलभूत द्रव्याविषयी प्रश्न उभे केले. या प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी निरीक्षण आणि अनुमान यांचा उपयोग केला. त्याच्या चिंतनाने सृष्टीमीमांसेची सुरुवात झाली.

त्याचाच समकालीन तत्त्वचिंतक पायथॅगोरस होता. या साधुपुरुषाने विश्वाच्या उत्पत्ती बरोबरच जीवात्म्याचाही विचार केला. गणित, संगीत, नियंत्रित आहार, विहार, सत्संग अशा गोष्टींवर पायथॅगोरसने आपल्या चिंतनावर अधिक भर दिला आहे. त्यांनी फक्त गणित व विज्ञान या विषयावर जोर दिला. हेरॅक्लिट्स सारख्या विचारवंताने विश्वात होणारे बदल अथवा परिवर्तनाची मीमांसा करतांना विश्वाच्या मुळाशी असलेले अंतिम तत्त्व शोधण्याचा प्रयत्न केला.

हेरॅक्लिटसच्या तत्त्वचिंतनात अशाश्वतेवर किंवा अंतिम तत्त्व प्रवाही आहे. अशा विचारांवर मुख्यतः भर आहे. त्याच्या अगदी विरुद्ध विचार पार्मेनायडिसनी ग्रीकांसमोर ठेवले आहेत. त्यांच्यामते अंतिम तत्त्व हे शाश्वतच असले पाहिजे. त्यांत परिवर्तन होऊ शकत नाही. या दोन्ही तत्त्वज्ञांनी इंद्रियाद्वारे मिळणारे ज्ञान बेभरवशाचे मानले आहे. दोघेही आपल्याला दृष्टीने बुद्धिवादी होते. पार्येनायडिसचा अनुयायी झेनो याने एक परमतखंडनाची निराळीच पध्दत विकसित केली. अशा प्रकारे तत्त्वज्ञानाचा प्रवास जो थेलीसपासून सुरु झाला तो आजपर्यंत युरोपात चालू आहे. एम्पीडोक्लिससारख्या काही चिंतकांनी समन्वयाचा दृष्टिकोन स्विकारला आहे. विश्वमीमांसेत केवळ यांत्रिक किंवा उत्पादन कार्यकारण भाव अपूर्ण असून त्याबरोबर प्रयोजनमूलक कार्यकारण भावसुद्धा स्वीकारला पाहिजे. असा विचार मांडला.

इ. स. पाचव्या शताब्दीत ग्रीक नगरराज्यातील काही पंडितांनी जुनी परंपरा व जुन्या तत्त्वज्ञानाच्या विचारांवर संशय प्रकट केला. त्यांच्या दृष्टिकोन, व्यावहारिक होता. मनुष्याने विश्वासंबंधीच्या चिंतनाला सोडचिठ्ठी देऊन मानवी व्यवहार आणि समाज या बाबतीत विचार करायला हवा. सृष्टीच्या मुळाशी काहीही असेल आणि जरी ते समजले तरी त्याचा व्यावहारिक प्रश्न सोडविण्यासाठी काय उपयोग आहे ? अशा प्रकारे उपयोगितेचा किंवा व्यावहारिक दृष्टिकोन ध्यानात घेऊन त्यांनी मनुष्यविषयक व्यावहारिक प्रश्नांवर जोर दिला.

याच पंडितांना सोफिस्ट म्हटले जाते. Philosophy या शब्दात Philo आणि Sophia असे दोन शब्द येतात. सोफिया म्हणजे ज्ञान Sophist म्हणजे पंडित किंवा ज्ञानी, ज्ञाता होय. सोफिस्ट या नावाची कोणती एक तत्त्वज्ञानाची प्रणाली नाही. परंतु या सोफिस्टांमध्ये काही गोष्टी समान दिसतात. तत्त्वज्ञानाला ते मनुष्यकेंद्री करीत होते. व्यावहारिक ज्ञान समाजात पसरवण्यासाठी ते इच्छूक होते. म्हणून त्यांना सार्वजनिक शिक्षण तज्ञ किंवा समाजशिक्षक या नावाने, शब्दप्रयोगांने सुद्धा संबोधित केले जाते. हे सोफिस्ट जे व्यावहारिक ज्ञान तरुणांना देत असत त्यांच्या मोबदल्यात पैसे पण घेत असत.

त्यांची ज्ञानदात्याची भूमिका आर्थिक आणि राजकीय समस्यांनी बांधलेली किंवा मर्यादित होती म्हणून सोफिस्ट या शब्दाचा अर्थ चांगला असूनही हळूहळू या शब्दाला, वाईट अर्थ प्राप्त झाला. राजकारण हा एक महत्त्वाचा विषय असल्यामुळे या विषयाच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी शब्दच्छल कसा करावा ? कोणत्या युक्त्या लढवाव्यात ? लोकांवर प्रभूत्व पाडणारी भाषा कशी बोलावी ? इ. अशा प्रकारचे व्यावहारिक ज्ञान देऊन सोफिस्टांनी जे नीती व ज्ञानाच्या क्षेत्रात बौद्धिक मानदंड असतात त्यांची उपेक्षा केली. त्यामुळे अर्थार्जनासाठी, बुद्धी व विद्येचा उपयोग करणारे असा अर्थ, सोफिस्ट या शब्दाला प्राप्त झाला. ते शून्यवाद किंवा निराशावादाचा प्रचार करीत. प्रोटॅगोरससारखे सोफिस्ट एवढेच करू इच्छित होते की ज्ञान, विज्ञान किंवा तत्त्वज्ञान मनुष्याला केंद्रस्थानी ठेऊन विकसित केले पाहिजे. "मनुष्य हाच सगळ्या गोष्टींचा मापदंड आहे." "(Man is Measure of all things)" हे त्याचे प्रसिध्द वाक्य होय. परंतु सोफिस्टांच्या विचारांचा तरुणांवर जो प्रभाव पडला, तो परिणामकारक व विनाशकारी तसाच घातक होता. कारण त्यांनी तरुणांना सार्वजनिक अशी नैतिक मूल्ये आणि बुद्धीचे निकष दिले नाहीत. परिणामतः नीति आणि ज्ञानाच्या क्षेत्रात अराजकता व बेजबाबदारीची वृत्ती फैलावली. राजकारणात वावदूकपणा (Demagogy) वाढला.

याच काळात अथेन्सच्या एका सामान्य कुटुंबात सॉक्रेटिसचा जन्म झाला. त्याच्या पित्याचे नाव सोफ्रोनिकस तर आईचे नाव फिनारेट् होते. नीति आणि विचारांच्या क्षेत्रात अराजकता निर्माण झाली किऊ समाजातही अराजकता व अस्वस्थता निर्माण. होते. ग्रीक नगरराज्यांमध्ये नैतिक व वैचारिक क्षेत्रात जी अराजकता फैलावली होती, तिचे आव्हान स्वीकारणारा महापुरुष सॉक्रेटिसचा जन्म ही एक ऐतिहासिक आवश्यकता होती. विचारांच्या इतिहासातही सामान्यतः तीन पायऱ्या असतात. १) हट्टाग्रही विचार १) या हट्टाग्रहाला आव्हान देणारा संशयवाद ३) रचनात्मक तत्त्वज्ञान.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सॉक्रेटिसचे काम अद्वितीय आहे. त्याने निस्वार्थापणे, एक दैवी काम समजून विचारांची सेवा केली आणि ग्रीक तत्त्वज्ञानाला रचनात्मक परंतु समीक्षात्मक वळण दिले.

इ. स. पूर्व ४२७ मध्ये अथेन्स या शहरातील एका उच्चभ्रू कुटुंबामध्ये प्लेटोचा जन्म झाला. त्याकाळी उपलब्ध असलेले सर्वोत्तम असे शिक्षण प्लेटोला मिळाले. प्लेटोचे मूळ

नाव ॲरिस्टोक्लीस असे होते. परंतु त्याच्या रुंद बांध्यामुळे त्याच्या शिक्षकांनी प्लेटो असे नांव ठेवले.

प्लेटोवर सॉक्रेटिसचे व्यक्तिमत्त्व जीवन व तत्त्वज्ञान याचा फार मोठा प्रभाव पडला होता. प्लेटोचे तत्त्वज्ञान संवादांच्या रुपात आहे. या संवादामधील प्रमुख व्यक्तिरेखा सॉक्रेटिस आहे. प्लेटोने त्याचे तत्त्वज्ञान सॉक्रेटिसच्या मुखाने वदवून गुरुबद्दलचा पूज्यभाव दर्शविला आहे.

## २.२ सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती

सॉक्रेटिसची जन्म सामान्य परिवारात झाला. त्याचे वडील मूर्तिकार होते. त्याची आई सेवाभावी दाईचे काम करीत असे. सॉक्रेटिस मोठया गौरवाने सांगायचा की मी माझ्या आईचा वारसा उचलला आहे. ज्याप्रमाणे माझी आई समाजात उपयुक्त अशा दाईचे काम करते त्याप्रमाणे मी सुद्धा केवळ बौद्धिक दाईच्या रुपात समाजात काम करतो. हेच माझे जीवित कार्य आहे. ज्यावेळी दाई ही महिलांच्या प्रसूतीच्या वेळी उपयुक्त असते. तसाच मी प्रत्येकाच्या मनात असलेले ज्ञान बाहेर काढण्यासाठी बौद्धिक दाईच्या रुपात उपयुक्त आहे. सॉक्रेटिसने कधीही ज्ञानदात्याची भूमिका स्वीकारलेली नाही. सॉफिस्टांसारखे त्याने ज्ञानाचे दुकानही उघडले नाही. 'आत्मज्ञान' हे त्याचे ब्रीदवाक्य असूनही त्या आत्मज्ञानाचे प्रदर्शन त्याने कधीही केले नाही.

प्रत्येक मनुष्य बुद्धिमान असल्यामुळे त्याने आपले जीवन अर्थात जीवनपद्धती व विचार करण्याची पद्धती तपासून घेतली पाहिजे. तो म्हणत असे. 'Unexamined life is not worth living' पुष्कळवेळा बुद्धिवादी लोक नकारात्मक भूमिका स्वीकारतात. इतकचं नाही तर काही बुद्धिवादी विद्वानांमध्ये केवळ परमतखंडानाचा आवेश दिसून येतो. सॉक्रेटिसला सत्त्यशोधनात रुची होती व सत्यशोधनासाठी प्रत्येकाची बुद्धी समर्थ आहे असे त्याचे मत होते. प्रश्न पद्धतीने मनुष्य हा स्वतः च्या बुद्धीच्या सहाय्याने आंतरिक ज्ञान व्यक्त करू शकतो. त्यावर सॉक्रेटिसचा विश्वास होता. त्याचप्रमाणे बौद्धिक शक्तींचा वापर करून कुणाच्या विचारांचे खंडण करणे यात त्याला रुची नव्हती. अशाप्रकारे त्याच्या जीवनात सद्भाव आणि सत्यनिष्ठा दिसून येत असे. म्हणूनच त्याला 'बुद्धिवादाचा संत' (Saint of Rationalism) असे म्हटले जात असे. म्हणूनच त्याचे व्यक्तिमत्व ऋषितुल्य होते. इतकेच नाही तर त्याचा दृष्टिकोनही रचनात्मक होता असे म्हटले जाते. सॉक्रेटिस दिसण्यास जेवढा कुरूप होता तेवढाच आंतरिक सौदर्याने भरलेला होता. म्हणूनच त्याने त्याच्या विरोधकांना ना शिव्या दिल्या ना शाप दिले. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सॉक्रेटिसने मानवी प्रश्नांना अधिकाधिक महत्त्व दिले आहे. नैतिक, सामाजिक, राजकीय, आत्मज्ञानासंबंधी प्रश्नांना सॉक्रेटिसच्या चिंतनात अधिक महत्त्व व प्राधान्य आहे. जे सॉफिस्टांचे ज्ञान, तत्त्वज्ञान मनुष्यकेंद्री होते. तसेच त्याचेही तत्त्वचिंतन मनुष्यकेंद्री होते. परंतु सॉफिस्टस् व्यवहारवादी होते. व सॉक्रेटिस आदर्शवादी होता. अर्थात बुद्धिनिष्ठेने जी तत्त्वे त्याने स्वीकारली त्या तत्त्वांसाठी हसत हसत मरण्याची तयारी सॉक्रेटिसमध्ये दिसून येते.

सॉक्रेटिसने जी पद्धती अवलंबिली होती, तिचा लोकांना आणि विशेषतः तरुणांना बुद्धिवादी आणि बुद्धिनिष्ठ बनवण्यात झालेला दिसतो. हाच त्याचा मुख्य हेतू होता. रोज सकाळी बाजारपेठेत जाऊन तो मानवी प्रश्नांबद्दल एका अनोख्या पद्धतीने चर्चा करीत असे. मानवी प्रश्नांची चर्चा करणे हा मानवी स्वभाव आहे. त्यात राजकारण, नीतीमत्ता, समाजकारण, शासनव्यवस्था इत्यादी गोष्टी चर्चेचा विषय असत. सॉक्रेटिसची भूमिका एका सत्यशोधक प्रश्नकर्त्यांची होती. उदाहरणार्थ एखाद्या ठिकाणी राजकारणाची चर्चा चालू असेल तर त्याविषयी सॉक्रेटिस अत्यंत मूलगामी प्रश्न विचारी. त्या प्रश्नाचे उत्तर बोलणाऱ्याला द्यावे लागे. जे उत्तर मिळे त्यावर तो पुन्हा प्रश्न विचारी. अशा तऱ्हेने उत्तरोत्तर प्रश्न विचारून उत्तर देणारा कथित विद्वान निरुत्तर होऊन जाई. तरुणांना बौद्धिकदृष्टया अस्वस्थ करून त्यांच्यात बुद्धिपूर्वक निर्णय घेण्याची वृत्ती उत्पन्न करण्याच्या त्याने प्रयत्न केला. म्हणून त्याला 'अथेन्सची बौद्धिक गोमाशी' '(Intellectual Gadfy of Athens)' म्हणत. त्याचा हेतू शुद्ध असल्यामुळे त्याला "बुद्धीवादाचा संत" (Saint of Rationalism) म्हणतात. हा उपक्रम अपवादात्मक नसून दररोज सॉक्रेटिस हेच आपले जीवितकार्य समजून मार्केटमध्ये जाऊन अशाच संवाद पद्धतीने सत्यशोधन करीत असे. या पद्धतीमध्ये ज्या लोकांचे अज्ञान प्रकट झाले, मनुष्य स्वभावाला अनुसरून ते सॉक्रेटिसचे विरोधक बनले. त्यांनी सॉक्रेटिस विरुद्ध प्रचार सुरु केला. काही लोकांनी त्याला सॉफिस्ट ठरवलं. तसेच परंपरावादी लोक त्याचे विरोधक बनले. त्याच्या हितचिंतकात व त्याला मोठा समजणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी होती. त्या काळात राजकारण हा एक महत्त्वाचा विषय होता. जर सॉक्रेटिससारखा पुरुष तरुणांसाठी आदर्श बनला व त्यांना तो आदर्श वाटू लागला तर राजकीय क्षेत्रात सुद्धा तरुण लोक मौलिक, मूलगामी प्रश्न विचारू लागतील. म्हणून काही राजकारणी सॉक्रेटिसला भिऊ लागले आणि त्यांच्या विरुद्ध गेले. अशा सगळ्या लोकांनी एक षड्यंत्र रचले आणि सॉक्रेटिस समाजाचे भले करीत नाही किंबहुना तो समाजाला घातक आहे, असा आरोप त्यावर ठेवला. यात मुख्यतः दोन आरोप होते. १) सॉक्रेटिस हा पारंपारिक देवदेवतांना मानत नाही आणि १) सॉक्रेटिस तरुणांना बिघडवतो. या आरोपपत्रांवर त्यांच्या लोकसभेत त्यांच्या पद्धतीनुसार चर्चा झाली. मतदान झाले आणि काही सॉक्रेटिसच्या विरुद्ध गेली. सॉक्रेटिसला मृत्यूदंडाची शिक्षा झाली.

प्लेटोने ॲपोलॉजी (Apologys) नामक आपल्या प्रसिद्ध संवाद ग्रंथात सॉक्रेटिस अंतिम दिवसाचे वर्णन केले आहे. सॉक्रेटिस ज्याप्रमाणे प्रत्येक मनुष्यास बुद्धीप्रधान समजत असे त्याप्रमाणे तो माणसाला पौरुषप्रधानही मानत असे. (Manilliness is man) म्हणूनच त्याच्या जीवनांत बुद्धिवाद, बुद्धिनिष्ठा, पौरुष आणि पुरुषार्थाचा अनोखा मिलाफ दिसून येतो. देहान्ताची सजा होण्यापासून वाचवण्यासाठी जे प्रचलित मार्ग होते. (दयेची याचना करणे, माफी मागणे, देहत्याग करणे, देहदंडाचे रुपांतर आर्थिक सजेत करणे इत्यादी) त्यांचा त्याने आपले नैतिक धैर्य प्रकट करून धाडसी वृत्तीने अस्वीकार केला आणि आपल्या तत्त्वज्ञानासाठी मृत्यूला हसत हसत आलिंगन दिले. म्हणूनच त्याचा मृत्यू हा गौरवशाली व प्रेरणादायी आहे. जेव्हा समाज विरुद्ध व्यक्ती असा संघर्ष एखाद्या व्यक्तीच्या जीवनात निर्माण होतो. तेव्हा समाजाशी सामना करणे काही व्यक्तीनांच शक्य होते. त्यापैकी सॉक्रेटिस हा एक आहे. त्याचा आत्मविश्वास इतका प्रबळ

आहे की समजाच्या प्रभावामुळे तो अस्थिर झाला नाही. त्याने आपल्या विचारांना सोडले नाही. व्यावहारिक तडजोड केली नाही, इतकेच नाही तर शिक्षेच्या उत्तरादाखला जे वक्तव्य त्याने दिले आहे त्यात त्याच्या वंशजांनी त्यांचे अपूर्ण काम पुरे करावे असे ध्वनित केले आहे. काही विचारवंत जेव्हा पशूंच्या पातळीवर जगणाऱ्या मानव समाजाला वर उंचावण्यासाठी येतात तेव्हा त्यांचे पहिले काम हे असते की त्या लोकांना आत्मिक व बौद्धिक दृष्टीने असंतुष्ट किंवा अस्वस्थ बनवणे. सॉक्रेटिसने स्वतःच्या कौटुंबिक आर्थिक दुरुवस्थेला स्वीकारूनही आपले दैवी कार्य देहदण्डापर्यंत सोडले नाही. म्हणूनच सॉक्रेटिस जीवन हे एका तत्त्वनिष्ठ, सत्यनिष्ठ तपस्व्याचे जीवन आहे. एका दार्शनिक हौतात्म्याचे जीवन आहे.

## २.३ सॉक्रेटिस प्रश्नोत्तर संभाषण पद्धती

सॉक्रेटिस जीवितकार्य लोकांना आणि विशेषतः तरुणांना विचारप्रवण करणे, विवेक निष्ठ बनविणे हे होते. बुद्धिनिष्ठ बनविण्याचा संस्कार केवळ नैतिक उपदेशपर भाषण देऊन होत नाही. म्हणून सॉक्रेटिसने बुद्धिनिष्ठा काय आहे, त्यात कोणती तत्त्वे येतात, बुद्धि निष्ठेने मनुष्य अंतिम कुठेपर्यंत पोहचू शकतो अशा प्रश्नांवर भर दिलेला नाही. रोज बाजारात जाऊन सत्यशोधनासाठी विशिष्ट पद्धतीचा वापर सॉक्रेटिसने केला आहे. या संवादांत सॉक्रेटिसची भूमिका सत्यशोधक प्रश्नकर्त्यांची आहे. मानवी सम्स्यांसंबंधाचे आमचे विचार अपूर्ण, विपरीत, अस्पष्ट व वरवरचे असतात हे त्यातून स्पष्ट होत असे. अशा संवादात अगर एखाद्या व्यक्तीने ज्ञानदात्याची भूमिका घेऊन प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न अथवा प्रयास केला तर सॉक्रेटिस त्या संदर्भात जी महत्त्वाची कल्पना आहे तिची व्याख्या देण्याचा आग्रह करीत असे. उत्तर म्हणून जी व्याख्या मिळे ती अपूर्ण आहे. हे स्पष्ट करण्यासाठी सॉक्रेटिस व्यावहारिक उदाहरणे देई आणि त्यामुळे हे स्पष्ट होई की विशिष्ट संकल्पनेची प्रस्तुत व्याख्या बदलली पाहिजे. अशा प्रकारे सॉक्रेटिसची पध्दत विगमनात्मक (Inductive) तथा निगनात्मक (Deductive) सुद्धा होती. सॉक्रेटिसच्या पद्धतीत प्रश्नांना महत्त्वाचे स्थान आहे. इतकेच नाही तर संशय संदेहालाही त्यात महत्त्व आहे. परंतु सॉक्रेटिस संशयवादी (Sceptic) नव्हता. संदेहालाही त्यात महत्त्व आहे. परंतु सॉक्रेटिसचा मानवी बुद्धीवर व अंतिम सत्यावर विश्वास होता. संशय वाद्यांमध्ये असा विश्वास नसतो. म्हणून त्याची पद्धती संवादात्मक होती. "वादे वादे जायते तत्त्वबोध" यावर विश्वास दिसतो.

सॉक्रेटसच्या तत्त्वचिंतनात बौद्धिक स्वावलंबनावर अधिक भरवसा दिसून येतो. प्रत्येकाजवळ बुद्धी आहे आणि या बुद्धीचा उपयोग करून नैतिक जीवनाची तात्विक बैठक व स्व संबंधी ज्ञान प्रत्येक जण मिळवू शकतो, यावर त्याचा विश्वास होता. तो नेहमी म्हणत असे की ज्ञान इंद्रियाद्वारे बाहेरून येत नाही. तसेच दुसऱ्यांकडुनही मिळत नाही. दुसरा मनुष्य मोठा असेल तर तो बौद्धिक दाईचे काम चांगल्या पद्धतीने करू शकतो. बुद्धीचे ज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्व आहे. हे समजावताना सॉक्रेटिस म्हणतो की 'ज्ञान हे संकल्पनात्मक असते'. कोणत्याही विषयाच्या बाबतीत जी संकल्पना आहे, तिचे बुद्धीने होईल. असे विश्लेषण करताना विविध अनुभवांचा उपयोग जरूर होईल, परंतु मुख्य काम

बुद्धीचे असल्यामुळे संकल्पनाचे विश्लेषण करताना संकल्पनेतील अपूर्णता अथवा अतार्किकता यांचे ज्ञान बुद्धिलाच होईल. आमचे ज्ञान अर्थात संकल्पज्ञानांचे ज्ञान हे अधिकाधिक स्पष्ट होत जाईल ही संकल्पना जितकी अधिक स्पष्ट होईल तितकाच मनुष्य विपरीत ज्ञान आणि अस्पष्ट विचार यांपासून दूर राहू शकतो. परंतु या बौद्धिक प्रवासाची सुरुवात प्रामाणिकतेतून झाली पाहिजे, आणि ही प्रामाणिकता म्हणजे स्वतः चे अज्ञान मान्य करणे म्हणून सॉक्रेटिस म्हणतो की स्वतःच्या अज्ञानाच्या ज्ञानाची सुरुवात होते. हा विरोधाभास नसून सत्यस्थिती आहे. मला माझ्या अज्ञानाच्या ज्ञानापासून ज्ञानाची सुरुवात होते. हा विरोधाभास नसून सत्यस्थिती आहे. मला माझ्या अज्ञानाची जाणीव होणे अगत्याचे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती स्पष्ट करा.

२. सॉक्रेटिस प्रश्नोत्तर (संभाषण) पद्धती स्पष्ट करा.

## २.४ सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टिकोन

सॉक्रेटिसला ज्ञानाचे प्रचंड आकर्षण व प्रेम असूनही केवळ ज्ञानाकरिता ज्ञान मिळवणे हे त्याचे ध्येय नव्हते. केवळ कल्पनांचा खेळ करण्यात रमून जाणे, स्वैरकल्पनांच्या विहारात व साम्राज्यात स्वच्छंदाने तरंगत राहणे हे हे सॉक्रेटिसचे ध्येय नव्हते. उलट ज्ञानाने आपले नैतिक आचरण व जीवन स्वच्छ, पवित्र व उच्च पातळीचे व्हावे असाच त्याचा आग्रह होता. म्हणजे केवळ सैद्धान्तिक ज्ञान मिळविणे, बुद्धीचा विलास इतरांना दाखविणे हे त्याचे ध्येय नव्हते, तर व्यवहारात व प्रत्यक्ष जीवनात ज्ञानाने माणसांना सदाचरणी व सच्छील बनवावे अशीच त्याची खऱ्या ज्ञानापासून अपेक्षा आहे. "कोणीही मनुष्य स्वेच्छेने चूक करीत नाही." हे लहानसे एकच वाक्य आहे. पण ते सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान अत्यंत अर्थपूर्ण रीतीने व्यक्त करते. या वाक्याचे रहस्य व गुढार्थ असा आहे की प्रत्येक नैतिक वैगुण्याचे मूळ बुद्धीत असते व ते आकलनाच्या विभ्रमात असते. थोडक्यात त्याचा अर्थ असा की ज्याला चांगले (शिव) काय आहे ते समजते. तोच चांगले आचरण करतो. दृष्टी किंवा मर्मदृष्टीचा अभाव हे अनैतिक आचारणाचे खरे कारण आहे. यावरून सॉक्रेटिसच्या मते संकल्पनेचे स्पष्ट व नि : संदिग्ध ज्ञान हे नैतिक आचरणास कसे साहाय्यक, उपयुक्त व आवश्य आहे हे स्पष्ट होते. 'सदगुण म्हणजे ज्ञान' ही सॉक्रेटिसची उक्ती एक अविनाशी, विश्वसत्य म्हणून ओळखली जाते. त्याच्या मते आत्म्यामध्ये अविवेकाचा असा कोणताही भाग जणू नसतोच. माणसाची प्रत्येक कृती ही बुद्धीने निर्धारित होत असते. माणसाची बुद्धीच सर्व काही ठरवीत व नियंत्रित करीत असते. म्हणजे एखादी गोष्ट योग्य व चांगली आहे आणि तरीही ती न करणे व न कृतीत आणणे किंवा एखादी गोष्ट वाईट आहे असे माहीत असूनही ती करावयास भाग पडणाऱ्या प्रवृत्तीस बळी पडणे ही गोष्ट सॉक्रेटिसच्या मते केवळ शोकजनक व घातकच नाही. पण ती घडणे केवळ अशक्यप्राय आहे असे सॉक्रेटिसचे मत आहे. इच्छेच्या आहारी जाणाऱ्या मनाच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध सॉक्रेटिसचे मते केवळ शॉकजनक व घातकच नाही. पण ती

घडणे केवळ अशक्यप्राय आहे असे सॉक्रेटिसचे मत आहे. इच्छेच्या आहारी जाणाऱ्या मनाच्या प्रवृत्तीच्या विरुद्ध सॉक्रेटिस नुसता निषेध करून थांबत नाही, पण इच्छेने मानवी मन पूर्णपणे गिळंकृत होणे, मानवी कामवासनेच्या संपूर्ण आहारी जाणे ही गोष्ट तो अशक्यच समजतो.

सॉक्रेटिसचा मुख्य संदेश बुद्धिनिष्ठा व नीतिनिष्ठा हा आहे. त्याच्या नैतिक चिंतनातही बुद्धिनिष्ठेचा अविष्कार स्पष्टपणे दिसतो. नैतिक चिंतनात आणि तसेच नैतिक जीवनात जी रूढीनिष्ठा आणि गतानुगतिकता येते. त्यामुळे समाजात नैतिकतेबाबत चिंतन करण्याची उदासीनता दिसून येते. जी कृती रुढीमान्य आहे तिलाच नीति समजले जाते. जी कृती केली आहे, अथवा जिला बहुसंख्य लोकांनी स्वीकृती दिली आहे, तिला नैतिक समजले जाते. परंतु सॉक्रेटिसच्या मतानुसार रुढीची व कायद्याची सुद्धा नैतिकता तपासून घेतली पाहिजे. उदाहरणार्थ संभव आहे की गुलामगिरीची पद्धती एक जमान्यात विशिष्ट प्रकारची रूढी लोकोपयोगी होती. परंतु बदललेल्या जमान्यात किंवा बदललेल्या कायद्यामुळे ती रूढी हानिकारक होऊ शकते.

म्हणून बुद्धिप्रधान नैतिक चिंतन किंवा विवेक निष्ठ नीतिमत्ता आवश्यक आहे. सॉक्रेटिसचा हा विचार वर उल्लेख केल्याप्रमाणे त्याच्या प्रसिद्ध सुत्रात्मक वाक्यात प्रगट झाला आहे आणि तो विचार आहे 'Virtue is knowledge' 'सदगुणज्ञान आहे.' सदगुण किंवा सदाचार प्रत्यक्ष कृतीसंबंधी आहे आणि ज्ञान हे बुद्धिनिष्ठ आहे. म्हणून सॉक्रेटिस या विचाराला खूप महत्त्व आहे.

सामान्यतः मनुष्याला वाटते की एखादा नैतिक सदगुण चांगला असूनही त्याचे ज्ञान असूनही प्रत्यक्ष व्यवहारात हा सदगुण साकार होऊ शकत नाही. मी नीतिमत्ता चांगली जाणतो. परंतु माझे आचरण नीतिमत्तेपासून दूर आहे. अशी वाक्ये लोकांच्या संवादात ऐकायला येतात. सॉक्रेटिसला अशा तऱ्हेची भूमिका अमान्य आहे. वर उल्लेखल्या प्रमाणे त्याचे म्हणणे आहे. जर आम्हाला नीतिचे मर्म निश्चित आणि स्पष्ट रूपाने ज्ञात असेल तर आम्ही अनीतिमान राहूच शकत नाही. सॉक्रेटिसचे ज्ञान म्हणजे अंतःप्रज्ञेपासून मिळालेली कर्म दृष्टी आहे. हे ज्ञान केवळ पुस्तकी किंवा भाषिक नाही. नीतिमत्तेत सत् असत, चांगले-वाईट यातील विवेक जेव्हा स्पष्ट होईल, चांगले का आहे ? आणि वाईट हे वाईट का आहे ? याचे मनुष्य बुद्धीला अत्यंत निश्चित आणि स्पष्ट ज्ञान जर झाले तर मनुष्य वाईट करणारच नाही. जेव्हा मनुष्य वाईट गोष्टींचे अवलंबन करतो, तेव्हा त्याच्या मागे सुद्धा मनुष्याची अशी समजूत असते की ही वाईट गोष्ट सुद्धा कोणत्या ना कोणत्या रुपात चांगली समजून उचलले जाते यात बुद्धी ही विकाराच्या आधीन रहाते.

सॉक्रेटिसचा हा विचार पुष्कळ लोकांना अव्यावहारिक वाटतो. परंतु त्याची दुसरी बाजू पण आपण बघू शकतो आणि ती म्हणजे ज्ञानाचा परिणाम व्यवहारात व्हायला हवा. कृतीत व्हायला हवा. आजकाल ज्ञान आणि व्यवहार, विचार आणि आचरण यात खूपच मोठी तफावत दिसू येते. आपल्याकडेही म्हणतात, "य: क्रियावान् स: पण्डित:', सॉक्रेटिस बुद्धिनिष्ठ व तत्त्वनिष्ठ असल्यामुळे त्याला ज्ञान व कृती यातील तफावत मान्य नाही. ही तफावत होण्याचे कारण आम्ही बौद्धिक दृष्टया प्रामाणिक बुद्धिनिष्ठ नाही हे

आहे. आम्ही आमच्या बुद्धीच्या निर्णयाशी प्रामाणिक नाही. पुष्कळ वेळा आम्ही या बुद्धीला मूलगामी प्रश्नांद्वारा एखाद्या विषयाच्या मुळापर्यंत नेत नाही. पुष्कळसे सदाचारी हे केवळ पारंपारिक दृष्टीन सदाचारी असतात. सदाचाराचे महत्त्व मर्म त्यांना माहित नसते. श्रीमद्भगवद्गीतेमध्येही तेराव्या अध्यायामध्ये काही महान सद्गुणांना ज्ञान म्हटले आहे. 'अमानितवम् .... इति ज्ञानम्' असा सद्गुण सॉक्रेटिसच्या प्रश्न पद्धतीनुसार शिकवला जाऊ शकतो. त्यावर व्याख्याने देऊन नव्हे. या अर्थानी 'Virtue is teachable' सद्गुण शिकवता येतात.' अशा पद्धतीने सॉक्रेटिसचे नैतिक चिंतन पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात फार महत्त्वाचे अर्थपूर्ण व प्रेरक मानले जाते. आजही संकल्पनांचे बौद्धिक विश्लेषण व त्या स्पष्ट करणे (Analysis of Concepts) हे तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे कार्य मानले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१. सॉक्रेटिस नीतिविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

## २.५ सॉफिस्टांच्या विचारांचे खंडन

प्लेटोची वस्तुमीमांसा व ज्ञानमीमांसा यात भेद करणे कठीण आहे. प्लेटोच्या मते मनुष्याला वस्तुनिष्ठ व यथार्थ ज्ञानाचा बोध होऊ शकतो. ज्ञान म्हणजे काय व ज्ञानाच्या प्रमुख लक्ष्य काय आहे याचा शोध प्लेटोने घेतला. यथार्थ ज्ञान म्हणजे काय हे सांगण्यासाठी प्लेटोने ज्ञात म्हणजे काय नाही याचे विवेचन केले. सॉफिस्ट तत्त्वज्ञानांनी असे प्रतिपादन केले होते की ज्ञान म्हणजे इंद्रिय संवेदन होय. दुसरा सॉफिस्ट विचार असा होता की ज्ञान म्हणजे मत होय. प्लेटोने त्यावेळी प्रचलित त्या दोन सिद्धांताचे खंडन करून त्याचा ज्ञान सिद्धांत विशद केला.

### २.५.१ 'ज्ञान म्हणजे इंद्रियसंवेदन नव्हे':

प्रसिद्ध सॉफिस्ट तत्त्वज्ञ प्रोटॅगोरसच्या मते मानव हा जगातील सर्व गोष्टींचा मापक आहे. सत्य वस्तुनिष्ठ नसून व्यक्तिनिष्ठ असते. ज्याला जे जसे दिसते ते त्याच्या दृष्टीने व त्याच्यापुरते सत्य असते. ज्ञान व इंद्रिय संवेदन यात तादात्म्य आहे. वस्तुनिष्ठ किंवा सर्वांसाठी सत्य असे काही नसते. ज्ञान केवळ प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे इंद्रियसंवेदन असते.

**प्लेटोने प्रोटॅगोरसच्या त्या सिद्धांताचे पुढील प्रमाणे खंडन केले -**

१) जर इंद्रिय संवेदन म्हणजे ज्ञान आहे असे मानले तर प्राण्यांना सुद्धा संवेदना होतात. तर मग प्राण्यांनाही ज्ञान होते व प्राणीसुद्धा सर्व गोष्टींचे मानक ठरतात का ?

२) प्रोटॅगोरसच्या मते प्रत्येक व्यक्तीला जे खरे वाटते ते त्या व्यक्तीसाठी खरे असते. जर प्रोटॅगोरसचा सिद्धांत मला (प्लेटोला) खोटा वाटत असला तर हा सिद्धांत खोटा ठरतो का ? प्रोटॅगोरस हे मान्य करील का ?

३) मनुष्याने भविष्यकालाविषयी निर्णय अनेकदा चुकतात. म्हणजे व्यक्तीला जे वाटते ते प्रत्येक वेळी खरे नसते.

४) प्रोटॅगोरसच्या मते सर्व इंद्रिय संवेदन सारखीच सत्य असतात. इंद्रिय संवेदने अनेकदा विरोधात्मक असतात. एखादी वस्तू जेव्हा जवळ असते तेव्हा मोठी दिसते. जेव्हा ती वस्तू दूर असते तेव्हा ती वस्तू लहान दिसते. एखादा कागदाचा तुकडा वेगवेगळ्या कोनामधून वेगवेगळ्या आकाराचा दिसतो अशा व्यावर्तक इंद्रिय संवेदना मधील कोणते इंद्रियसंवेदन ज्ञान म्हणून ग्राह्य धरायचे ?

५) प्रोटॅगोरसच्या मते सर्व इंद्रिय संवेदन एक सारखी सत्य असतात. म्हणजे एखाद्या लहान मुलाची संवेदन त्याच्या शिक्षकांच्या इंद्रियांच्या संवेदनाइतकीच खरी असावयास हवी. या सिद्धांतानुसार सर्व शिक्षण, चर्चा वाद-प्रतिवाद अशक्य ठरतात.

६) प्रत्येकाचे इंद्रियानुभव सत्य आहेत असे जर स्वीकारले तर आपण का चुकतो याचे स्पष्टीकरण मिळत नाही. विशिष्ट वेळेला एखाद्या गोष्टीचे जे ज्ञान आपणास होते ते तसे वेगळ्या वेळेस नसल्याचे आढळते. ह्या प्रकारची ज्ञानातील भिन्नता अथवा चुकांना प्रोटॅगोरसच्या सिद्धांतानुसार काहीच आधार मिळत नाही.

७) प्रोटॅगोरसचा सिद्धांत 'सत्य' या संकल्पनेची वस्तुनिष्ठता नष्ट करून सत्य व असत्य यातील भेद अर्थहीन करतो. जे मला दिसते ते माझ्या साठी खरे आहे हे म्हणणे आपल्या इंद्रिय संवेदनाना केवळ दुसरे नांव देणे आहे.

८) केवळ एका इंद्रियसंवेदनामुळे ज्ञान होत नाही. विभिन्न इंद्रियानुभवांचे एकत्रीकरण, संघटन, तुलना ही इंद्रियांची कार्ये नसून एक मानसिक प्रक्रिया आहे. त्यामुळे ज्ञान हे केवळ इंद्रियसंवेदन नसून बुद्धिचे कार्य आहे.

### २.५.२ ज्ञान हे मत नाही :

सॉफिस्ट तत्त्वज्ञांनी प्रत्येक विषयावर अनेक मते शक्य असतात असे प्रतिपादन करीत होते. त्यामुळे ज्ञान म्हणजे मत असाही सिद्धांत मांडण्यात आला. प्लेटोने ज्ञानाची मत म्हणून व्यक्तिसापेक्षता अमान्य केली. ज्ञान कोणाचाही अभिप्राय असू शकत नाही यासाठी प्लेटोने पुढील युक्तिवाद केले.

१) मत अथवा अभिप्राय खरे किंवा खोटे असू शकते. खोटे मत ज्ञान ठरू शकत नाही. तसेच खरे मत सुद्धा ज्ञान नाही. अभिप्राय अंत:प्रज्ञेतून किंवा सहजप्रवृत्तीमधून येतो. पण त्यासाठी कोणतीही कारण मीमांसा देता येत नाही. खरे मत एखादी गोष्ट विशिष्ट प्रकारची आहे सांगते पण ती विशिष्ट प्रकारची का आहे याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

२) कोणतेही मत किंवा अभिप्राय अस्थिर असतो. कोणतेही मत, खरे असले तरी वक्तृत्व कौशल्याने खोडून काढता येते. मत संभावात्मक असते तर ज्ञान निश्चित स्वरूपाचे असते.

३) ज्ञान विश्वासावर किंवा कोणत्याही अभिप्रायावर अवलंबून नसते. ज्ञान हे बुद्धिने व तर्काने प्राप्त होणारे संपूर्ण आकलन असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्लेटोने ज्ञान हे इंद्रिय संवेदन आहे या सिद्धांताचे खंडन कसे केले आहे ?

२) प्लेटोने ज्ञान हे मत आहे या सिद्धांताचे कसे खंडन केले आहे ?

## २.६ प्लेटोची ज्ञानमीमांसा

सॉफिस्ट तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताचे खंडन केल्यानंतर प्लेटोने फीडो, रिपब्लिक व सॉफिस्ट या संवादांमधून ज्ञान म्हणजे नेमके काय ? या प्रश्नांचे सकारात्मक उत्तर दिले. प्लेटोच्या मते ज्ञान कोणत्याही व्यक्तीच्या इंद्रिय संवेदनावर अवलंबून नसते. ज्ञान इंद्रियसंवेदनाच्या पलीकडील आकाररूप आयडियाज चे बुद्धी द्वारा होणारे बोधन होय.

प्लेटो द्वंद्वात्मक विचारांचा प्रणेता होता. जे आहे व जे असावे यातील द्वंद्व सनातन आहे. प्लेटोच्या वस्तुमीमांसेमध्ये सत्ताशास्त्रात, ज्ञानमीमांसेमध्ये तसेच नीतिशास्त्र व राज्यशास्त्र यामध्ये द्वंद्वात्मक विचार आढळतात. प्लेटो वस्तुस्थिती व आदर्श यातील अंतर त्याच्या तत्त्वज्ञानामध्ये अधोरेखित करतो.

### २.६.१ ज्ञान म्हणजे चिरंतन आयडियाज चे बोधन :

प्लेटोच्या मते इंद्रियांद्वारे मनुष्याला केवळ विकारी सतत बदलणारी नाशवंत, ज्ञातृसापेक्ष व अस्थिर अशा इंद्रियसंबंध सृष्टीचे ज्ञान होते. बदलत जाणाऱ्या वस्तू केवळ पडछाया असतात. सत्य या पडछायांच्या पलीकडे चिरंतर अपरिवर्तनीय व सार्वदेशिक असते. सत्य ज्ञान म्हणजे बदलत जाणाऱ्या विशिष्ट वस्तूंकडून शाश्वत व अपरिवर्तनीय, सार्वदेशिक सामान्य संकल्पनांचे ज्ञान म्हणजे बदलत जाणाऱ्या विशिष्ट वस्तूंकडून शाश्वत व अपरिवर्तनीय सार्वदेशिक सामान्य संकल्पनांचे ज्ञान होय. प्लेटो अशा नित्य व चिरंतन सामान्यांसाठी आकार अथवा आयडिया अशी संज्ञा वापरतो.

सॉक्रेटिसच्या मते सत्य केवळ संकल्पनांद्वारा समजू शकते. ज्ञान संकल्पनांनी बनते. प्लेटोच्या मते आकाररूप आयडिया (सारतत्त्वे) बुद्धिगम्य सृष्टीत असतात. मनुष्याच्या अंतर्दृष्टिप्रधान विमर्श बुद्धीने इंद्रिय संबंध सृष्टीच्या पलीकडे असणाऱ्या विचार सृष्टीचे ज्ञान होते. विचार सृष्टी प्रामुख्याने वस्तूंच्या व कल्पनांच्या पूर्णत्वांच्या विकारांनी बनलेली आहे. तिच्यातील सर्व आकार (सारतत्त्वे / आयडिया) स्थिर शाश्वत अविकारी, अपरिवर्तनशील व पूर्ण असतात. या चिरंतन आयडियांचे बोधन म्हणजे ज्ञान होय.

### २.६.२ ज्ञान केवळ अनुस्मरण असते :

प्लेटोच्या मते मानवी आत्मा अमर व अविनाशी आहे. आत्म्याचे मूळ स्थान आयडियांचे विश्व आहे. मानवी शरीर धारण केल्यावर आत्म्याला त्याच्या मूळ ज्ञानाचे म्हणजेच आयडियांचे विस्मरण होते. भौतिक विश्वामध्ये अनेक वस्तूंचे अनुभव येतात. त्यामधून बुद्धिगम्य सारतत्त्वांचे केवळ संकेत मिळतात. या संकेताद्वारे तसेच चिंतन व मनन यांच्या सहाय्याने विस्मृतीत गेलेल्या सारतत्त्वांचे पुन्हा स्मरण होते. ज्ञान म्हणजे अनुचिंतन अथवा विस्मृत सारतत्त्वांचे जागृतीकरण आहे.

प्लेटो ज्ञानामध्ये अनुभवपूर्व घटक मानतो. शिक्षण म्हणजे मनामधील उपजत व सुप्तावस्थेतील पूर्वस्मृती झालेल्या ज्ञानाचे पुन:स्मरण करणे म्हणजे शिक्षण घेणे होय.

### २.६.३ ज्ञानाच्या पातळ्या :

रिपब्लिक या ग्रंथामध्ये प्लेटोने मानवी मनाचा अज्ञानाकडून ज्ञानाकडे होणारा प्रवास स्पष्ट केला आहे. एका विभाजित रेषेच्या सहाय्याने प्लेटो या प्रवासातील अप्रगत व प्रगत अवस्था म्हणजे ज्ञानाच्या पातळ्या दर्शवितो.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रगत अवस्था | ज्ञान | विवेक बुद्धी<br>विलक्षण बुद्धी | सारतत्त्वे<br>(आयडिया)<br>विभिन्न शास्त्रे |
| अप्रगत अवस्था | मत | व्यावहारिक<br>प्रातिभासिक | धारणा, विश्वास<br>कल्पना, विलास,<br>श्रम |


प्लेटोने अप्रगत अवस्थेतील बोधनाला मत व प्रगत अवस्थेतील बोधनाला ज्ञान असे संबोधिले आहे. मत ही अप्रगत अवस्था व्यावहारिक ज्ञान व प्रातिभासिक ज्ञान यामध्ये विभाजित होते. प्रातिभासिक ज्ञान कल्पनाविलासाचे भ्रामक असते. व्यावहारिक ज्ञान इंद्रियगोचर विश्वाचे व जगण्यासाठी पुरेसे असते मात्र व्यावहारिक ज्ञानाला सत्य ज्ञान म्हणता येणार नाही.

ज्ञान ही प्रगत अवस्था विवेकात्मक ज्ञान व विलक्षण बुद्धीने प्राप्त ज्ञान यात विभाजित होते. विलक्षण बुद्धी वैज्ञानिक चिंतन व गणिती ज्ञान प्राप्त करून देते. असे ज्ञान सत्याच्या जवळ जाते. परंतु संपूर्ण सत्याचे दर्शन विलक्षण बुद्धीने होत नाही. विवेकात्मक ज्ञान संपूर्ण सत्याचे म्हणजे "आयडियांचे" ज्ञान करून देते.

मानवी मनाचा अज्ञानाकडून ज्ञानाकडे असा प्रवास सोपा नाही. त्यासाठी वैचारिक शिस्त व मानसिक बळ लागते Eros हे तत्त्व मानवी मनाचा विकास घडवून आणते. Eros हे अशरीरी प्रेम होय. इंद्रियातील आकाररूप आयडियाचे संपूर्ण आकलन होणे हे मानवी मनाच्या विकासाचे उद्दिष्ट आहे. केवळ विवेकात्मक बुद्धी उदात्त व रमणीय सारतत्त्वांच्या (आयडिया) तात्त्विक सौंदर्याच्या अथांग सागराकडे बघण्याची क्षमता प्राप्त करून देते.

### २.६.४ गुहेचे रूपक :

रिपब्लिक या ग्रंथामध्ये प्लेटोने गुहेच्या रुपकाद्वारे मानवी आत्म्याचा अज्ञानाच्या अंधाऱ्या जगतामधून ज्ञानाच्या तेजोमय जगताकडे प्रवास स्पष्ट केला आहे. ज्ञानाच्या तेजोमय सृष्टीमध्ये प्रवेश करणारी व्यक्तीच राज्य कारभार करू शकते. असा ज्ञानसूर्य पाहणारा मानव तत्त्वज्ञानी राजा बनू शकतो. गुहेचे रूपक मानवी आत्म्याचे आभासी पडछायांच्या निम्नस्तरीय बोधाकडून चिरंतन विवेकात्मक व झगझगीत सत्याच्या सर्वोच्च ज्ञानाकडे उत्थान दर्शविते.




प्लेटोने प्रकाशाकडे तोंड असलेल्या एका खोलगट गुहेचे रूपक सांगितले आहे. या गुहेत बालपणापासून साखळदंडाने जखडलेली माणसे राहतात. त्यांचे तोंडे कायम गुहेच्या आतील भिंतीकडे असून त्यांची पाठ गुहेच्या प्रवेशद्वाराकडे असते. गुहेतील जखडलेल्या कैद्यांनी सूर्यप्रकाश कधीही पाहिलेला नाही. गुहेच्या प्रवेशद्वाराशी धगधगता अग्नी आहे. कैदी व अग्नी यामध्ये एक उंच उभट रस्ता व तसेच ठेंगणी भिंत अथवा पडदा आहे. उभट रस्त्यावरून जाणाऱ्या -जाणाऱ्या व्यक्तीच्या हातातील पुतळे, जनावरांच्या आकृती किंवा अन्य वस्तूंच्या सावल्या गुहेच्या आतील भिंतीवर पडतात. साखळदंडाने बांधले गेलेले कैदी केवळ आतील भिंतीवरील छायाप्रकाशाचा खेळ पाहू शकतात व केवळ प्रतिध्वनी ऐकू येतात.

अशा अनेक कैद्यांमधून एखादा कैदी मुक्त होऊन गुहेच्या बाहेर आला तर सुरुवातीला खऱ्याखुऱ्या सूर्यप्रकाशामुळे त्याचे डोळे दिपून जातील. नवीन संवेदनांशी तसेच वस्तूंच्या अस्तित्वाशी त्याला जुळवून घ्यावे लागेल. सूर्यप्रकाश पाहिलेला, नवीन दृष्टी प्राप्त झालेला माणूस परत गुहेत आला तर अंधारामुळे तो अडखळू लागेल व अन्य कैद्यांच्या उपहासाचा  विषय बनेल.

गुहेचा आतील भाग मानवी मनाची मत अप्रगत अवस्था दर्शवितो गुहेतील माणसांना केवळ पडछायांचे ज्ञान होते. पण ते सत्यज्ञान नसते. गुहेचा बाहेरील भाग मानवी मनाची ज्ञान ह प्रगत अवस्था दर्शवितो. गुहेच्या बाहेर आल्यावर वस्तूंच्या खऱ्या रूपाचे दर्शन होते. मुक्त होऊन चित् सूर्य" पाहू शकणारा माणूस ज्ञानी विचारवंत व तत्त्वचिंतक असतो.

सूर्य पाहिलेला माणूस'  या मराठी नाटकामध्ये प्लेटोचे गुहेचे रूपक अतिशय नेमकेपणाने व कलात्मकतेने प्रकट झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. प्लेटोच्या मते ज्ञान म्हणजे काय आहे ?

२. मानवी मनाची ज्ञानाकडे प्रगती कोणत्या टप्प्यांमधून होते ?

३. प्लेटोचे गुहेचे रूपक स्पष्ट करा.

## २.७ प्लेटोचे आयडियाज चा सिद्धांत

प्लेटोच्या तत्त्वज्ञानामध्ये 'आयडियांच्या' सिद्धांताला मध्यवर्ती स्थान आहे. 'आयडियांचे ज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. 'आयडियाची अनुभवातील व बुद्धीगम्य अशी स्वतंत्र सृष्टी आहे. भौतिक वस्तुंचे इंद्रियसंवेदनांनी ज्ञान होते. सतत परिवर्तन होत असलेल्या भौतिक वस्तूंमधील स्थिर व नित्य भागाला प्लेटो आयडिया अथवा आकार असे नांव देतो. आयडिया म्हणजे सारतत्त्व होय. उदा. घोडा काळा पांढरा किंवा अन्य रंगाचा असतो. मात्र सर्व घोडयांमध्ये आढळणाऱ्या समान अथवा सामाईक गुणधर्मांना प्लेटो आकार अथवा आयडिया म्हणतो. घोडयाच्या रंगाचे ज्ञान इंद्रिय संवेदनांमुळे होते. मात्र घोडयाच्या सारतत्त्वाचे (आयडियाचे ज्ञान विवेकबुद्धिने प्राप्त होते.) आयडियाचा सिद्धांत मानवी मनाची नश्वर, अस्थिर व अनेक अशा मूर्त वस्तूंकडून शाश्वत स्थिर व एक अशा अमूर्त संकल्पनांच्या ज्ञानाकडे प्रगती दर्शवितो.

प्लेटोच्या आयडियाच्या सिद्धांतामध्ये हिरॅक्लिटस, पार्मेनायडिज व सॉक्रेटिसच्या विचारांचे संमिश्रण सापडते. प्लेटोने इंद्रियगोचर वस्तूंच्या अविरत परिवर्तनाची कल्पना हिरॅक्लिटस कडून घेतली. आयडियांच्या चिरंतन अस्तित्वाची कल्पना पार्मेनायडिज कडून घेतली सॉक्रेटिसच्या संकल्पनांना चिरंतन अस्तित्व देऊन प्लेटोच्या आकाररूप सारतत्त्वांच्या सिद्धांताचा उगम झाला.

**प्लेटोच्या मते आयडियांची अथवा सारतत्त्वांची वैशिष्टये पुढील प्रमाणे आहेत.**

१. प्लेटोच्या 'आयडिया' द्रव्ये (Substances) त्या स्वयंनिर्मित व स्वयंनियंत्रित आहेत. आयडिया स्वतः च अंतिम सत्ता असून त्यांचे अस्तित्त्व अन्य कशावरही अवलंबून नाही.

२. आयडिया सार्वदेशिक आहेत. त्या विवक्षित वस्तू नसून सामान्य (Universals) आहेत.

३. आयडिया भौतिक नसून विचाररूप (Thought) आहेत. परंतु त्या कोणाच्याही मनातील विचार नसून आयडियांना त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे.

४. आयडिया ऐक्यरूप (Unity) असतात. आयडिया अनेकामध्ये एक असते. सृष्टीमध्ये अनेक झाडे असतात. परंतु झाड ही आयडिया एकच असते.

५. आयडिया इंद्रियगोचर वस्तूंचा आधार (Ground) असतात. असंख्य, विविध वस्तूंच्या विवक्षित अस्तित्वाचे स्पष्टीकरण आयडियामुळे मिळते.

६. आयडिया अपरिवर्तनशील अविकारी व अविनाशी (Eternal) असतात. सुंदर वस्तू कालांतराने नाश पावतात. परंतु सौंदर्य ही आयडिया कधीच नष्ट होत नाही. भूतलावरील सर्व मनुष्य नाहिसे झाले तरी मनुष्य ही संकल्पना नित्य व अविनाशी आहे.

७. आयडिया (सारतत्त्वे) पूर्णत्व (Perfection) व्यक्त करीत असतात. इंद्रियगोचर सृष्टीमधील वस्तूंमध्ये काही ना काही न्यूनत्व अथवा अपूर्णत्व आढळते. परंतु सारतत्त्वे सर्व दोषांपासून मुक्त असून ती परिपूर्ण असतात.

८. आयडिया वस्तूमध्ये अन्तर्हित अथवा (Immanent) असतात त्याच प्रमाणे वस्तूंच्या अतीत (Transacendental) सुद्धा असतात. सौंदर्य ज्याप्रमाणे फुलांमध्ये सामावलेले असते.

९. आयडिया दिक् आणि काल (Space & Time) यांच्या मार्यादांपासून मुक्त व अतीत असतात.

१०. आयडियांचे आकलन केवळ विवेकबुद्धीला होते. असंख्य तसेच विभिन्न वस्तूंमधील समानता शोधून त्यातील सार तत्त्वाचे आकलन केवळ विचारमंथनाचे शक्य होते.

११. आयडिया अनेक प्रकारच्या असतात. घोडा, मनुष्य, झाड, नदी तारा यासारख्या भौतिक वस्तूंच्या आयडिया असतात. शुभ्रत्व, गुरुत्व, माधुर्य यासारख्या गुणधर्माच्या आयडिया असतात. न्याय, सौंदर्य, सत्य, शिवत्व यासारख्या नैतिक आयडिया सुद्धा असतात. नैसर्गिक तसेच मानवनिर्मित वस्तूंच्या ही आयडिया असतात.

१२. प्लेटोच्या मते विविध सारतत्त्वाची रचना एखाद्या पिरॅमिड सारखी असते. आयडियांच्या रचनेमधील सर्वश्रेष्ठ व सर्वव्यापी आयडियाला प्लेटो शिवतत्त्व (Idea of Good) म्हणतो. शिवतत्त्व हीच अंतिम सत्ता असून ती सर्वोत्तम, सर्वव्यापक व सर्वसमावेशक आहे. सारतत्त्वांमधील परस्परसंबंधाच्या शास्त्राला द्वंदन्याय (Dialectic) म्हणतात. तत्त्वज्ञानाचे उदिष्ट अंतिम सत्ता असलेल्या शिवतत्त्वाचे व द्वंदन्यायाचे यथार्थ आकलन करून घेणे आहे.

१३. आयडिया परिपूर्ण असतात. मात्र इंद्रियगोचर विश्व सदोष व अपूर्ण आहे. अनुभवजन्य विश्वातील वस्तूंच्या दोषांचे अपूर्णत्वाचे कारण जड द्रव्य आहे. प्लेटोच्या मते ईश्वर (Demiurge) सारतत्त्वानुसार भौतिक वस्तू घडवितो. ईश्वर विश्वाचा निर्माता नसून तो विश्वाचा रचनाकार आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. प्लेटोच्या आयडियांची वैशिष्टये सांगा.

## २.८ समीक्षा

१) प्लेटोचे तत्त्वज्ञान अत्यंत विस्तृत, व्यापक, बहूरंगी व समृद्ध आहे. प्लेटोच्या विचारांमध्ये त्यांच्या आधीच्या तत्त्वचिंतकांच्या विचारांचे धागे अत्यंत सफाईदार पद्धतीने मिसळले आहेत आणि तरीही प्लेटोचे विचार सर्वांपेक्षा अत्यंत वेगळे ठरतात. प्लेटोमध्ये उदात्त आदर्श व सूक्ष्म विचार, गाढ विद्वत्ता आणि प्रतिभा, ज्ञान लालसा व सौदर्यान्वेषण ही वैशिष्टे आढळतात. प्लेटोमध्ये सूक्ष्म तरल, व भेदक चिकित्सा व

विश्लेषण करणारा तत्त्वचिंतक आणि उत्तुंग व रोमांचकारी कल्पनाविलासामध्ये रमणारा कवी अशा दोन व्यक्तिमत्त्वांचे बेमालून एकीकरण पहावयास मिळते. प्लेटोच्या विचारांची मोहिनी भिन्न मते असणाऱ्या सर्वच विचारवंतांच्या मनावर आजही आहे.

२) प्लेटो द्वैतवादाचा पुरस्कार करतो. इंद्रियसंवेदन सृष्टी आणि सारतत्त्वाची बुद्धीगम्य सृष्टी यांना तो पूर्णपणे स्वतंत्र मानतो.

३) ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या आयडियांच्या सिद्धांतावर अनेक आक्षेप घेतले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते अनुभवातील व अमूर्त सारतत्त्वे (आयडिया) अनुभवास येणाऱ्या घटनांचे स्पष्टीकरण करू शकत नाहीत.

४) ॲरिस्टॉटलच्यामते परिपूर्ण व आदर्श आयडियांचे मूर्त रुपामध्ये प्रकटीकरण कोणत्या शक्तीमुळे व कोणत्या प्रक्रियेमुळे होऊ शकते याचे स्पष्टीकरण प्लेटोने दिलेले नाही.

५) इंद्रिय संवेद्य वस्तू व सारतत्त्व जर एकत्र नसतील तर ते सार त्या वस्तूचे कसे होऊ शकेल ? तसेच ती विवक्षित वस्तू त्या सारतत्त्वाचे (आयडियाचे) मूर्त व व्यक्त रूप कसे होऊ शकेल ही तात्त्विक अडचण निर्माण होते.

६) प्लेटोचे तत्त्वज्ञान तार्किक युक्तिवादांऐवजी रुपकांमधून व काव्यात्मकतेमधून व्यक्त होते. अनुभवास येणाऱ्या वस्तूंना प्लेटो पडछाया प्रतिमा किंवा अनुकरण असे संबोधन वापरतो. गुहेचे रूपक काव्यात्मक सादरीकरणाचे उत्तम उदाहरण आहे.

७) इंद्रियसंवेद्य वस्तू व आयडिया यांच्यामधील संबंधाचे समाधानकारक स्पष्टीकरण प्लेटो देत नाही. प्लेटो अनुभवगम्य सृष्टीतील वस्तू आयडियामध्ये सहभागी (Participate) होतात, तसेच आयडिया भौतिक वस्तूंमध्ये प्रतिबिंबित होतात असे प्रतिपादन करतो.

प्लेटोच्या आयडियांना तीन प्रकारचे महत्त्व आहे. सत्ताशास्त्रीय दृष्टया आयडिया ह्या सदवस्तू आहेत. तार्किक दृष्टया एक आयडिया अनेक वस्तूंमधील साम्य -फरक ओळखून त्यांचे ज्ञान सुव्यवस्थित बनविते. प्रयोजनवादी दृष्टीने आयडिया हे ध्येय व वस्तूंचे अंतिम कारण आहे.

## २.९ सारांश

पाश्चात्य तत्त्वज्ञानाची सुरुवात ग्रीक तत्त्वज्ञानाने होते. इस. पूर्व सहाव्या शतकात थेलीस नावाच्या विचारवंताने स्वतः च्या बुद्धीने विश्वाच्या उत्पत्ती विषयी व मूलद्रव्याविषयी प्रश्न उभे केले. यानंतर बऱ्याच तत्त्वचिंतकांनी प्रयत्न केले. त्यानंतर सोफिस्ट यांनी विचारांची दिशा बदलून मानवकेंद्री विचार मांडण्यास सुरुवात केली. हळूहळू सोफिस्ट अतिशय व्यवहारवादी बनल्याने मानवी जीवनाच्या अध:पतनांस सुरुवात झाली. अशा वेळी सॉक्रेटिसची प्रश्नोत्तरी म्हणजेच संभाषण पद्धती होती. या संभाषण किंवा प्रश्न पद्धतीने मनुष्य हा स्वतः च्या बुद्धीच्या सहय्यानेब आंतरिक ज्ञान व्यक्त करू शकतो. यावर

सॉक्रेटिसचा विश्वास होता. नैतिक, सामाजिक, राजकीय, आत्मज्ञानासंबंधी प्रश्नांचा सॉक्रेटिसच्या चिंतनात अधिक महत्त्व व प्राधान्य आहे.

सॉक्रेटिसला ज्ञानाचे प्रचंड आकर्षण व प्रेम असूनही केवळ ज्ञानाकरिता ज्ञान मिळविणे हे त्यांचे ध्येय नव्हते. ज्ञानानुसार माणसांचा आचार असायला पाहिजे. ही सॉक्रेटिसची मुख्य नैतिकविचार धारा आहे सॉक्रेटिसच्या नैतिक विचारधारे नुसार कोणीही मनुष्य स्वच्छेने चूक करीत नाही. याचा थोडक्यात अर्थ असा ज्याला चांगले, शिव काय आहे ते समजते, तोच चांगले आचरण करतो. सॉक्रेटिसचा मुख्य संदेश बुद्धिनिष्ठा व नीतिनिष्ठा हा आहे. त्यांच्या नैतिक चिंतनातही बुद्धिनिष्ठेचा आविष्कार स्पष्टपणे दिसतो. कोणतीही रूढी हानिकारक होऊ नये यासाठी नैतिक चिंतन किंवा विवेकप्रधान नीतिमत्ता आवश्यक आहे. सॉक्रेटिसचा हा विचार त्याच्या प्रसिद्ध सूत्रात्मक वाक्यात प्रगट झाला आहे. ते वाक्य म्हणजे 'Virtue is knowledge' 'सद्गुण हे ज्ञान होय' असे आहे.

तत्त्वज्ञानाच्या इतिहासामध्ये प्लेटोनेच सर्वप्रथम सर्वसमावेशक तत्त्वचिंतनाची विचारप्रणाली निर्माण केली. सॉक्रेटिसच्या शिकवणुकीचा फार मोठा प्रभाव प्लेटोवर झाला होता. प्लेटोच्या लिखाणामध्ये त्याचे तत्त्वज्ञान सॉक्रेटिस या व्यक्तीरेखेच्या तोंडून येते. अशाप्रकारे प्लेटोने आपल्या गुरूबद्दलचा पूज्यभाव प्रकट केला आहे.

ज्ञान म्हणजे काय ह्या प्रश्नाचे उत्तर देताना प्लेटोने सॉफिस्ट तत्त्वचिंतकांच्या विचारांचे खंडन केले. ज्ञान म्हणजे इंद्रियसंवेदन व ज्ञान म्हणजे मत ह्या सिद्धांतामधील फोलपणा प्लेटो सिद्ध करतो.

प्लेटोच्या मते ज्ञान म्हणजे नित्य, चिरंतन व निरपेक्ष अशा सारतत्त्वांचे (आयडियांचे) ज्ञान होय. मनुष्याने ज्ञान नवीन बोध नसून पूर्वी प्राप्त झालेल्या ज्ञानाचे पुन:स्मरण असते. प्लेटो मानवी बोधाच्या मत व ज्ञान अशा दोन पातळ्या मानतो मत ही कनिष्ठ बोधावस्था, व्यावहारिक व प्रातिभासिक अवस्थामध्ये विभाजित होते. ज्ञान ही उच्च बोधावस्था, विवेक बुद्धी व विलक्षण बुद्धी या दोन स्तरांवर विभाजित होते.

गुहेच्या रूपकाच्या माध्यमातून प्लेटो मानवी मनाचा अज्ञानाकडून ज्ञानाकडे प्रवास स्पष्ट करतो.

प्लेटोच्या आयडियाचा सिद्धांत इंद्रियसंवेद्य सृष्टी व विचार सृष्टी असे द्वैत दर्शवितो. आयडिया स्थिर, शाश्वत अविकारी व परिपूर्ण आकार असून त्यांचे स्वतंत्र विश्व असते. अंतिम सत्ता सारतत्त्वांची बनलेली आहे. सर्व आयडिया, सोपानक्रमिक असून शिवतत्त्वाची आयडिया सर्वोच्च आहे. सारतत्त्वाचे ज्ञान द्वंदन्यायाद्वारे होते. ज्ञानाचे कार्य विशेषाकडून सामान्याकडे, सीमिताकडून असीमाकडे तसेच व्यवहारातून सारतत्त्वांकडे नेणे हे आहे.

## २.१० विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती सविस्तर स्पष्ट करा.

२. सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर पद्धती किंवा संभाषण पद्धती सविस्तर स्पष्ट करा.

३. सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन सविस्तर स्पष्ट करा.

४. टीपा लिहा.

१. सॉक्रेटिस अभ्यास पद्धती. २. सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर (संभाषण) पद्धती.

३. सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन .

५. प्लेटोने सॉफिस्ट तत्त्वज्ञांनाच्या सिद्धांताचे खंडन कशा प्रकारे केले आहे.

६. प्लेटोचा ज्ञान सिद्धांत स्पष्ट करा.

७. प्लेटोचा आयडियांचा सिद्धांत स्पष्ट करा.

८. टीपा लिहा

१. गुहेचे रूपक

२. प्लेटोच्या मते ज्ञानाच्या पातळ्या / अवस्था

## २.११ संदर्भ

1) A Critical History of Greek Philosophy"

W. T. Stace

2) A History of Philosphys

Volume I, Greece and Rome

Frederick Copleston SJ

❖❖❖❖

# ३

# ॲरिस्टॉटलचा कारणता सिद्धांत (सहेतुकवाद कल्पनेचा संदर्भ), रूपबंध आणि जडद्रव्य ; व्यक्तता आणि शक्तीगर्भता

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ कारणाताचे सिद्धांत (सहेतुकवाद कल्पनेचा संदर्भ)

३.३ रूपबंध आणि जडद्रव्य

३.४ व्यक्तता (Actuality) आणि शक्तीगर्भता (Potentiality)

३.५ स्टॉईकचे तत्वज्ञान

३.६ एपिक्टेटसचे स्टोईसीझम (५०-१३५ ई. स.)

३.७ पिर्हूनीझम तत्वज्ञान

३.८ सेक्सटस एम्पिरिकस: संशयवाद

३.९ सारांश

३.१० संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

- ॲरिस्टॉटलच्या चार कारण, रूपबंध आणि जडद्रव्य व व्यक्तता आणि शक्तिगर्भता या तत्त्वज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

- ॲरिस्टॉटलचा सत्त (being) आणि संभवना (becoming) दृष्टीकोन समजून घेणे ज्याप्रकारे ते त्याच्या सहेतुकवाद (teleology) आणि कारणताच्या कल्पनेमध्ये निहित आहे.

- ॲरिस्टॉटलच्या सद् वस्तुमीमांसाचे (metaphysics) महत्त्व समजून घेणे कारण ते त्याच्या युडेमोन (सौख्य , कल्याण) जीवनाच्या नीतिशास्त्राला लागू होते.

- स्टॉईक्सचे अद्वितीय तत्वज्ञान समजून घेणे

- एपिक्टेटसच्या  महत्त्वपूर्ण स्टोइक शिकवणी समजून घेणे
- तत्वज्ञानातील संशयवादाचे महत्त्व समजून घेणे
- पिर्हूनियन संशयवादाचा दृष्टिकोन समजून घेणे
- सेक्सटस एम्पिरिकसचा संशयवाद समजून घेणे ज्यानुसार कसे ज्ञानाच्या शक्यतेवर शंका नसून निर्णय किंवा विश्वास निलंबित करणे असे आहे.

## ३.१ प्रस्तावना

ॲरिस्टॉटल ( ३८४-३२२ ख्रि. पू.) हे प्राचीन ग्रीसमधील शास्त्रीय कालखंडातील महान तत्त्वज्ञांपैकी एक होते. ते प्लेटोचे विद्यार्थी होता. प्लेटोचा विचारांचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. तथापि ॲरिस्टॉटलचे तत्त्वज्ञान प्लेटोच्या तत्त्वज्ञानापेक्षा थोडे वेगळे होते. प्लेटोच्या स्वरुपात सिद्धांताचे (theory of forms) खंडन करण्यासाठी ते प्रसिद्ध आहे. प्लेटो कवी आणि नैतिक-धार्मिक विचारवंत होते व त्याउलट ॲरिस्टॉटल हे वैज्ञानिक आणि तर्कशास्त्रज्ञ होते. त्यांनी वस्तुमीमांसा, तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, कविता मानसशास्त्र, भाषाशास्त्र यासह विविध विषयांवर काम केले आहे. ॲरिस्टॉटलच्या कामांमध्ये ऑर्गनॉन (तर्कशास्त्र), द फिजिक्स, डी ॲक्सिमो , युडेमियन एथिक्स इत्यादींचा समावेश आहे. त्यांना पाश्चात्य तर्कशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते तसेच तर्कासाठी औपचारिक प्रणाली विकसित करणारे ते पहिले होते. ॲरिस्टॉटल हे ग्रीसमधील एथेन्स येथील लिसीयम नावाच्या शाळेचे संस्थापक होते. ॲरिस्टॉटलने सद् वस्तुमीमांसाचा प्रारंभ बिंदू आहे. प्लेटोच्या मते, भौतिक वस्तू बदलण्यायोग्य असतात आणि त्यांना वास्तविकता नसतात. तथापि, ते एका सामान्य नावाने शाश्वत आणि अपरिवर्तनीय स्वरूपाशी संबंधित आहेत आणि हे स्वरूप केवळ बुद्धीनेच समजू शकते. ॲरिस्टॉटल, एक वैज्ञानिक आणि अनुभववादी असून त्यांनी भौतिक जगाच्या वास्तवावर लक्ष केंद्रित करण्यास प्राधान्य दिले. रूपबंध आणि जडद्रव्य यांच्यातील संबंध ही ॲरिस्टॉटलसाठी एक मध्यवर्ती समस्या आहे जी तो चार कारणांच्या संकल्पनेद्वारे पोहोचतो. विश्वाचा एक टेलोस (उद्देश) आहे आणि प्रत्येक गोष्टीचा अंतिम उद्देश साध्य करणे हे उद्दिष्ट आहे, असे सांगून, त्याने या यांत्रिक आणि भौतिक जगाचे सहेतुक वाद स्पष्टीकरण सादर केले.

स्टोईसीझम हे हेलेनिस्टिक काळातील एक तात्विक चळवळ होती. त्याचे नाव स्टॉय पॉइकील या शब्दावरून आले आहे ज्याचा अर्थ द्वारमंडप असे आहे. अथेन्स येथील अगोरामध्ये स्टोईक सदस्य ह्या द्वारमंडपाजवळ भेटायचे आणि व्याख्याने आयोजित करायचे. तिसऱ्या शतकाच्या पूर्वार्धात अथेन्समधील सिटीअमच्या झेनोने त्याची स्थापना केली होती.  स्टोईक विचारप्रणालीच्या पहिल्या तीन प्रमुखांपैकी कोणाचेही संपूर्ण लिखाणे आढळली नाहीत: त्याचा जनक झेनो (३४४ - २६२ ख्रि. पू.), क्लीनथस (२३२ ख्रि. पू.) किंवा क्रिसीपस ( d. ca. 206 BCE) स्टोईक तत्वज्ञानी - सेनेका (४ ख्रि. पू. - पू ६५ ख्रि. पू ) एपिक्टेटस (५० - १३५ ई. स) आणि सम्राट मार्कस

ऑरेलियस (१२१ - १८०) यांची फक्त पूर्ण लिखाणे शिल्लक आहेत आणि ते प्रामुख्याने नीतिशास्त्रावर केंद्रित आहेत.

संशयवाद हा तत्त्वज्ञानातील ज्ञानमीमांसाचा मध्यवर्ती विषय आहे. हे ज्ञानाच्या वेगवेगळ्या उदाहरणांवर शंका घेण्याची किंवा प्रश्न करण्याची वृत्ती आहे. संशयवादानुसार ज्ञान केवळ एक प्रकारची समज मानली जाते. तात्विक संशयवाद (Philosophical skepticism) एकतर ज्ञान किंवा तर्कसंगत विश्वास शक्य आहे हे नाकारतो किंवा किमान असा दावा करतो की आपण सर्व गोष्टींबद्दल किंवा तर्कसंगत विश्वास शक्य आहे हे नाकारतो किंवा किमान असा दावा करतो की आपण सर्व गोष्टींबद्दल किंवा केवळ देव व आत्मा यासारख्या गैर-प्रायोगिक गोष्टींबद्दल निश्चितपणे काहीही जाणू शकत नाही.

## ३.२ कारणाताचे सिद्धांत (सहेतुकवाद कल्पनेचा संदर्भ)

'बदल' हे अपरिहार्य वास्तव आणि जगाचे स्वरूपही आहे. काही बदल नैसर्गिक असतात तर काही मानवी कृतींमुळे होतात. बदलाच्या प्रक्रियेत, गोष्टी नवीन रूप धारण करतात. अशा प्रकारे बदलाचा प्रश्न अनेक तात्विक प्रश्न निर्माण करतो.

ॲरिस्टॉटलसाठी बदलाच्या प्रक्रियेत हालचाल, पिढी, क्षय, वाढ इत्यादींचा समावेश होतो. बदल का घडतो या प्रश्नाचे काही स्पष्टीकरण आहे. अशा प्रकारे बदल किंवा चळवळीच्या विश्लेषणामध्ये, ॲरिस्टॉटलने चार कारणांचा सिद्धांत मांडला आहे. ॲरिस्टॉटलच्या 'ऐटिया' या शब्दाचे भाषांतर 'कारण' म्हणून केले जाते. तात्विक विद्वान परंपरेत ते 'स्पष्टीकरण' असे समजले जाते. ॲरिस्टॉटलच्या म्हणण्यानुसार, "आपल्याला एखाद्या गोष्टीचे ज्ञान तोपर्यंत होत नाही जोपर्यंत होत नाही जोपर्यंत आपण त्याचे 'का', म्हणजे त्याचे कारण समजत नाही."

चार कारणांशी संबंधित असलेले चार प्रश्न खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| हे कशा पासून बनवलेले आहे ? उपादान कारण | हे काय आहे ? आकारीक कारण | ते कशामुळे बनले ? निमित्त कारण ? | ते कशासाठी आहे ? प्रयोजन कारण |

ॲरिस्टॉटलच्या मते, कोणतीही गोष्ट मग ती नैसर्गिक वस्तू असो व मानवनिर्मित वस्तू किंवा सजीव किंवा निर्जीव वस्तू या चार कारणांच्या मदतीने स्पष्ट करता येते.

१) उत्पादन कारण (Material cause) - उत्पादन कारण म्हणजे बदलणारी वस्तू बनवणारे द्रव्ये, ती वस्तूची भौतिक पैलू आहे जी जाणता येते आणि ओळखली जाते. उदा. - कांस्य पुतळ्याचे कांस्य; लाकडी टेबलचे लाकूड.

२) आकारीक कारण (Formal cause)- आकारीक कारण म्हणजे वस्तूचे स्वरूप किंवा नमुना. याचा अर्थ व्याख्या, सार, आकार, गोष्टींची रचना असाही होतो. ही संकल्पना किंवा कारण आहे ज्याचा विचार मनात प्रथम येतो.

उदाहरणार्थ इमारतीची किंवा पुतळ्याची ब्लू प्रिंट.

३) निमित्त कारण (Efficient cause) - निमित्त कारण म्हणजे वस्तूला गती देणारे. हे परिवर्तनाचे मूळ किंवा तत्त्व आहे. हे त्या वस्तूच्या निर्मितीला चालना देते. उदाहरणार्थ - मुलाचे वडील, शिल्पकार इ.

४) प्रयोजन कारण (final cause) - प्रयोजन कारण वस्तूच्या अस्तित्वाचा उद्देश, त्या वस्तूचा शेवट किंवा ध्येय स्पष्ट करते. तो आपल्या अस्तित्वाचा अंतिम उद्देश आहे.

**सहेतुकवादाची कल्पना**

तर्कसंगत मानवी आचरण हे सामान्यतः पाठपुरावा केला जाणाऱ्या उद्दिष्टांच्या संदर्भात स्पष्ट केले जातो. त्याच आधारावर, मानवांना निसर्गातील इतर गोष्टींचे वर्तन समजते, जे म्हणजे ते कसे स्वतःच त्यांच्या ध्येयांचा पाठपुरावा करत असतात किंवा काही उद्देश साध्य करण्यासाठी कसे त्यांचे घडण झालेले असते. या उद्देशाला, ध्येयाला किंवा शेवटाला टेलोस म्हणतात आणि टेलोसची सर्वात उत्तम व्याख्या ॲरिस्टॉटलने दिले होते. ॲरिस्टॉटलच्या मते, कोणत्याही गोष्टीचे संपूर्ण स्पष्टीकरण मिळवण्यासाठी त्याच्या उपादन, आकारीक आणि निमित्त कारणांसह त्याचे प्रयोजन कारण विचारात घेतले पाहिजे.

अंतिम कारणाच्या स्पष्टीकरणासह ॲरिस्टॉटल टेलोसच्या संकल्पनेवर पोहोचला. ॲरिस्टॉटलच्या पूर्ववर्तींमध्ये सहेतुकवादाची कल्पना प्रमुख होती. तथापि, देवासारखी बाह्य कारणे हे नैसर्गिक गोष्टींचे प्राथमिक कारण आहे हे त्यांचे मत त्यांनी नाकारले. ॲरिस्टॉटलसाठी, निसर्ग स्वतःच बदलाचे अंतर्गत तत्त्व आहे.

सहेतुकवाद म्हणजे गोष्टींचा किंवा उद्देशांचा अभ्यास. ॲरिस्टॉटलचा असा विश्वास होता की गोष्टी कशा प्रकारे आहेत हे समजून घेण्यासाठी सर्वोत्कृष्ट स्पष्टीकरण म्हणजे ते कोणत्या उद्देशाने तयार केले गेले हे समजून घेणे आवश्यक आहे.

ॲरिस्टॉटलने सहेतुकवादावर दिलेला भर असे सूचित करतो की विश्वातील प्रत्येक गोष्टीचा अस्तित्वाचे कारण आहे. ते केवळ शारीरिक रचना किंवा जीवशास्त्रातील उद्देश पाहत नाही तर मानवी जीवन कसे व्यवस्थित केले जाऊ शकते आणि कसे अंतिम टोकाकडे निर्देशित केले जाऊ शकते ह्यावर पण लक्ष केंद्रित करतात. अशा प्रकारे ॲरिस्टॉटलची निसर्गाची संकल्पना केवळ यांत्रिक नसून सहेतुकयुक्त आहे. त्यांच्या मते, निसर्ग मानवांद्वारे चित्रित करण्यापेक्षा अधिक सामान्य अर्थाने कार्यक्षमता प्रदर्शित करतो. ॲरिस्टॉटलने असे निरिक्षण केले की टेलोस म्हणजे योजना, हेतू, किंवा बुद्धिमता असणे आवश्यक असेलच असे नाही.

ॲरिस्टॉटलच्या मते, हेतु समाविष्ट असणारे प्रयोजन कारण निश्चित झाल्यावर, उत्पादन, आकारीक आणि निमित्त कारणे समजली जातात.

### तुमची प्रगती तपासा

ॲरिस्टॉटलने दिलेल्या चार कारणांच्या सिद्धांतावर स्पष्टीकरण द्या.

सहेतुकवाद कल्पनेच्या विशेष संदर्भासह कारणता सिद्धांत स्पष्ट करा.

## ३.३ रूपबंध आणि जडद्रव्य

ॲरिस्टॉटलने प्रत्येक कारणाची स्थिती स्पष्ट करून रूपबंध आणि जडद्रव्य ह्यावर चर्चा सुरु केली. त्यांच्या मते, आकारीक आणि प्रयोजन कारण एकच आहे. आकारीक कारण म्हणजे एखाद्या गोष्टीचे सार. वस्तूचे सार (स्वरूप) लक्षात आल्यानंतर गोष्ट काय बनते हे म्हणजे प्रयोजन कारण आहे. पुढे ते सांगतात की, निमित्त कारण म्हणजे त्यात टाकलेल्या ऊर्जेद्वारे वस्तूंमध्ये हालचाल किंवा बदल घडवून आणणारा. पण कुशलतेने संगमरवरी कापून त्याला आकार का दिला जातो ? कारण शेवट म्हणजेच शिल्प साकारायचे होते. अशाप्रकारे प्रयोजन कारण हे निमित्त कारणाचे मार्गदर्शन करते. म्हणून, अशा प्रकारे आपण असे म्हणू शकतो की प्रयोजन कारणच निमित्त कारणामागील खरे स्पष्टीकरण आहे.

अशाप्रकारे असे म्हणता येईल की प्रयोजन कारण हेच जग बनण्याचे आणि त्यातील बदलाचे खरे कारण आहे. जर प्रयोजन कारण वस्तूच्या स्वरूपाचे आणि हालचालीचे कारण असेल तर प्रयोजन कारण म्हणजे आकारीक आणि निमित्त कारण आहे असे म्हणू शकतो. ॲरिस्टॉटलच्या मते, तिन्ही कारणे - निमित्त, आकारीक आणि प्रयोजन खरोखर एक आहेत आणि ते त्यांना एकत्र वस्तूचे 'स्वरूप' म्हणतात. उत्पादन कारण कुठल्याच प्रकारच्या कारणांमध्ये समाविष्ट करता येत नाही. अशाप्रकारे ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानात रूपबंध आणि जडद्रव्य हे दोनच सत्य आहेत जे जगामध्ये वस्तूंच्या बनण्याचे आणि विकासाचे स्पष्टीकरण देतात.

प्रत्येक वस्तू मानवी किंवा जीव हे जडद्रव्य आणि रूपबंध यांचे संयोजन आहे. रूपबंध हा असा आहे जो समान प्रकारच्या वस्तूंमध्ये वैश्विक घटक आणतो. जडद्रव्य प्रत्येक पदार्थाला विशिष्टता आणतो. प्लेटोच्या विपरीत, ॲरिस्टॉटलचा असा विश्वास होता की जडद्रव्य आणि स्वरूप हे वैयक्तिक गोष्टीचे अविभाज्य पैलू आहेत. स्वरूप आणि जडद्रव्य वैयक्तिक गोष्टींमध्ये एकत्र असतात. वस्तूचे स्वरूप किंवा सार अपरिवर्तनीय आहे तर जडद्रव्य बदल घडवून आणते. जडद्रव्य वेगवेगळी रूपे घेतात आणि प्रत्येक नवीन रूप वस्तूंमध्ये आधीपासूनच अस्तित्वात आहे. अशा प्रकारे रूपबंध आणि जडद्रव्य ही गोष्टींची शाश्वत तत्त्वे आहेत. अशाप्रकारे जगात असण्याची आणि बनण्याची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी, आपण जडद्रव्याचा विचार केला पाहिजे जो बदलतो परंतु कायम राहतो आणि अपरिवर्तनीय रूपबंध जे एकत्रितपणे आपल्या सभोवतालच्या विकसनशील जगासाठी जबाबदार आहेत.

**तुमची प्रगती तपासा**

ॲरिस्टॉटलचे रूपबंध आणि जडद्रव्य सिद्धांताचे तपशीलवार चर्चा करा

## ३.४ व्यक्तता (Actuality) आणि शक्तीगर्भता (Potentiality)

ॲरिस्टॉटलने जडद्रव्य आणि रूपबंधातील फरक ओळखला जो प्रत्येक पदार्थाला लागू होतो. पदार्थाचे रूपबंध हे त्याचे सार आहे जे त्यास संपूर्णपणे कार्य करण्यास सक्षम करते तर जडद्रव्याचे तत्त्व म्हणजे ज्या सामग्रीने वस्तू बनलेली असते. हे रूपबंध आणि जडद्रव्य सिद्धांत ॲरिस्टॉटलच्या दुसऱ्या सिद्धांताशी म्हणजे शक्तिगर्भता (डुनामिस) आणि व्यक्तता (एंटेलेचिया) ह्याच्याशी जोडलेला आहे. या जगाच्या सहेतुकवाद स्पष्टीकरणाचा आधार घेत, ॲरिस्टॉटलचे असे म्हणणे आहे की या जगातील प्रत्येक गोष्ट त्याचा उद्देश किंवा शेवट साध्य करण्यासाठी प्रयत्न करते. त्या पदार्थाच्या रूपबंधातून आलेले स्वयंपूर्ण उद्दिष्टे/उद्देश ॲरिस्टॉटल एंटेलची' म्हणतात.

ॲरिस्टॉटलच्या मते डुनामिस किंवा शक्तिगर्भता ही केवळ बदल घडवून आणण्याची शक्ती नसून ती अधिक आरोग्यदायी स्थितीत असण्याची क्षमता आहे. उदाहरणार्थ, संगमरवरी घ्या, जे एखाद्या शिल्प तयार करण्यासाठी कोरले जाऊ शकते. ॲरिस्टॉटलच्या मते संगमरवरात शिल्प बनण्याची क्षमता आहे; संगमरवरी हे एक शिल्प आहे.

अशा प्रकारे जडद्रव्य (संगमरवर), ॲरिस्टॉटलच्या परिभाषेत संभाव्यतेशी व शक्तिगर्भतेशी जोडलेले आहे; अंतिम उत्पादन किंवा स्वरूप (शिल्प) व्यक्ततेशी जोडलेले आहे. अशा प्रकारे शक्तीगर्भता आणि व्यक्तता या वैयक्तिक पदार्थाच्या विकासाच्या वेगवेगळ्या अवस्था आहेत. संभाव्य टप्पा व शक्तिगर्भता जो पहिला टप्पा आहे तो गोष्टींमध्ये लपलेला असतो आणि बदलाच्या प्रक्रियेदरम्यान शक्तिगर्भता प्रत्यक्षात आणली जाते म्हणजे ती व्यक्त होते.

तथापि शक्तिगर्भता आणि व्यक्ततेचे टप्पे सापेक्ष श्रेणी आहेत. एखादी गोष्ट दुसऱ्या गोष्टीची वास्तविकता म्हणजे व्यक्तता असू शकते परंतु तीच गोष्ट दुसऱ्या गोष्टीची संभाव्यता म्हणजे शक्तीगर्भता बनू शकते. उदाहरणार्थ, प्रौढ पुरुष हा तरुण मुलाची वास्तविकता (व्यक्तता टप्पा) आहे परंतु त्या पुरुषामध्ये पितृत्वाची क्षमता (शक्तिगर्भता टप्पा) आहे. ॲरिस्टॉटल जसा जडद्रव्यापेक्षा स्वरूपाला किंवा रूपबंधाला प्राधान्य देतो, त्याचप्रमाणे तो शक्तिगर्भते पेक्षा (जडद्रव्याचा पैलू) व्यक्ततेला (रुपबंधाचा पैलू) प्राधान्य देतो.

## ३.५ स्टॉईकचे तत्वज्ञान

स्टोईसीझम तत्त्वज्ञानला ज्ञानाची विशिष्ट शिस्त मानत नाही तर मुख्यतः जीवनाचा एक मार्ग मानतं. त्यानुसार, तत्त्वज्ञान हे कौशल्याचा अभ्यास आहे ज्याचा संबंध जीवनासाठी फायदेशीर आहे. त्याचे मुख्य लक्ष युडेमोनिक (कल्याण व सौख्य) सद्गुण नीतिशास्त्र आहे. स्टोईसीझमच्या मते सौख्य प्राप्त करण्यासाठी सद्गुणांचा सराव पुरेसा आहे.

स्टोईकचे असे मत होते की आरोग्य, संपत्ती आणि सुख यासारख्या बाह्य गोष्टींचा आसक्तीमुळे निर्णयातील चुका होतात आणि ते काही विध्वंसक भावनांना कारणीभूत ठरतात. या विध्वंसक भावनांवर मात करण्यासाठी लोकांनी आत्म-नियंत्रण विकसित केले पाहिजे आणि "निसर्गानुसार" इच्छाशक्ती (प्रोहायरेसिस) राखली पाहिजे असे स्टोईसीझम ने शिकवले.

ॲरिस्टॉटलचा कारणता सिद्धांत (सहेतुकवाद कल्पनेचा संदर्भ), रूपबंध आणि जडद्रव्य ; व्यक्तता आणि शक्तीगर्भता

## ३.६ एपिक्टेटसचे स्टोईसीझम (५०-१३५ ई. स.)

एपिक्टेटस हा हेरापोलिस फ्रिगिया (सध्याचे पामुक्कले, पश्चिम तुर्कीमधील) येथे गुलामगिरीत जन्मलेला ग्रीक स्टोईक तत्त्वज्ञ होता. त्यांच्या शिष्य एरियनने त्यांच्या शिकवणी लिहून ठेवल्या आणि 'डिस्कोर्सेस' आणि 'एन्चिरिडियन' नावाने प्रकाशित केल्या. एपिक्टेटसने रोमन सिनेटर आणि स्टोईक तत्वज्ञानी मुसोनियस रुफस यांच्या हाताखाली स्टोइक विचारांचा अभ्यास केला.

एपिक्टेटसचे तत्त्वज्ञान अखंडता, स्व - व्यवस्थापन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कल्पनांवर केंद्रित आहे. तो दोन केंद्रीय कल्पनांचे समर्थन करतो. - १) इच्छा आणि २) केंद्रीय संस्कारांचा (sense impressions) योग्य वापर.

**एपिक्टेटसच्या आणि स्टोईसीझमच्या मुख्य कल्पना खालीलप्रमाणे आहेत.**

**१. तत्त्वत्ज्ञान आणि जगण्याची कला:** एपिक्टेटसच्या मते, नैतिक तत्त्वज्ञानाचा व्यावहारिक हेतू लोकांना चांगले जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करण्याचा आहे. त्याच वेळी त्यांचा असा विश्वास आहे की आपले दु:ख हे आपल्या स्वतः च्या निर्णयातील चुकांमुळे आणि खरोखर चांगले काय आहे याबद्दलच्या चुकीच्या समजुतींमुळे येतात आणि यामुळे आपल्या वर्णांवर आणि भरभराट होण्याची व आनंदी राहण्याची क्षमता प्रभावित होते. त्यामुळे जीवनात आनंदी राहणे आणि भरभराट होणे हे पूर्णपणे आपल्यावर अवलंबून आहे. त्याचे म्हणणे आहे की तत्त्वज्ञान मनुष्यासाठी कुठलेही जादा व अनावश्यक वचन देत नाही. जगण्याची कला ही प्रत्येक व्यक्तीच्या स्वतः च्या जगण्यातूनच कळते.

**२. सद्गुण-हेच एकमेव चांगले:** एपिक्टेटसच्या मते सदगुण (अरेट) म्हणजे उत्कृष्टता हेच केवळ चांगले. स्टोईक्सचा असा विश्वास आहे की सुख, संपत्ती, दर्जा यामुळे आनंदी जीवन जगता येत नाही. त्यांच्या मते, युडेमोन ('आनंदी') जीवन केवळ पूर्णपणे कृतीतूनच प्राप्त होते. एपिक्टेटसच्या मते, उत्कृष्टतेच्या दिशेने प्रगती करण्यासाठी एखाद्याने आपल्या अस्तित्वाचे खरे स्वरूप समजून घेतले पाहिजे आणि योग्य स्थितीत त्याचे नैतिक चारित्र्य राखले पाहिजे.

**३. निसर्गाशी सुसंगत राहणे:** ही शिकवण दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याशी संबंधित आहे - आपल्या स्वतः च्या कृतींकडे लक्ष देणे आणि त्या कृतींना प्रोत्साहन देणाऱ्या जगाकडे लक्ष देणे जिथे आपल्या केलेल्या कृतींचा परिणाम दिसत असतो.

एपिक्टेटससाठी निसर्गाशी सुसंगत राहण्याचा अर्थ म्हणजे एखाद्याचे देवाने जे ठरवले आहे ते नशीब स्वीकारणे.

**४. प्रगती करणे:** प्रगती करण्यासाठी, एखाद्याने जीवनाचा आनंद लुटत असताना भोगापासून दूर राहिले पाहिजे आणि आपल्या अपयशाची जबाबदारी स्वीकारण्यास शिकले पाहिजे. उत्कृष्टता आणि युडेमोन जीवन मिळविण्यासाठी हे आवश्यक आहे.

**५. फक्त स्वतःवरच नियंत्रण:** सुखी जीवनासाठी, आपली इच्छा आणि नैतिक चारित्र्य योग्य स्थितीत राखणे आवश्यक आहे. त्यासाठी आधी आपल्या नियंत्रणात आणि सामर्थ्यात काय आहे हे समजून घेतले पाहिजे. आपले नैतिक चारित्र्य नियंत्रित आणि टिकवून ठेवण्याची जबाबदारी इतर कोणीचीही नसून फक्त आपली असते. इतर बाह्य गोष्टी किंवा परिस्थिती आपल्या नियंत्रणात नाहीत. पण चांगले आणि वाईट काय याचा निर्णय घेण्याचा, कोणत्याही परिस्थितीशी जुळवून घेण्याचा, आपल्या मनावर, आपल्या मतांवर, हेतूंवर, आपण कशाला महत्त्व देतो इत्यादींवर आपल्या क्षमतेवर नियंत्रण आहे. आपण वाईट किंवा अप्राप्य नसलेल्या गोष्टींबद्दल उदासीन राहण्याची क्षमता विकसित केली पाहिजे जे आपले नैतिक चारित्र्य कमकुवत करू शकते.

**६. केंद्रीय संस्कारांचा किंवा धारणांचा योग्य वापर:** जेव्हा आपण एखादी गोष्ट जाणतो तेव्हा त्याची काय छाप तयार होते आणि आपल्याला त्याची जाणीव होते. केंद्रीय संस्कारांचा योग्य वापर म्हणजे की आपण एखादी गोष्ट समजून त्याच्याबद्दलचे निर्णय घेण्यापर्यंत कसे जातो. युडेमोनिक जीवनासाठी आपण योग्य धारणा तयार करणे आवश्यक आहे. म्हणून केंद्रीय संस्कारांचा योग्य वापर युडेमोनियासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो.

**७. तीन स्टॉईक शिस्त/शिकवणी:** तीन स्टॉईक शिस्त ज्यांना टोपोई (अभ्यासाचे क्षेत्र) असेही म्हणतात ते युडेमोनियासाठी गरजेचे आहेत. यात हे समाविष्ट आहे:

**अ) इच्छा क्षेत्र:** हे क्षेत्र एका स्टॉईक विद्यार्थासाठी खरोखर काय इष्ट असावा ह्याच्याशी संबंधित आहे. ह्या शिकवणीनुसार, केवळ सद्गुण आणि सद्गुणात्मक कार्ये हीच इष्ट असावी.

**ब) कृतीची शिस्त:** हा व्यावहारिक व्यायाम आपला आवेग आणि कृती करण्याच्या प्रेरणांशी संबंधित आहे, प्रत्येक कृतीशी नाही. उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी आपण तर्कसंगत प्राणी म्हणून काय पाहिजे याच्याशी संबंधित आहे. आपल्या कृतीचे परिणाम आपल्या नियंत्रणात नसून कृती करणे हे आपल्या नियंत्रणात नसून कृती करणे हे आपल्या नियंत्रणात असते हे समजून घेणे आवश्यक आहे.

**क) संमतीचे शिस्त:** संमती म्हणजे सहमत होणे. एखाद्या गोष्टीला मान्यता देणे म्हणजे गोष्टींबद्दल निर्णय घेणे आणि त्या निर्णयांना वचनबद्ध करणे. हा व्यावहारिक व्यायाम युडेमोन जीवनासाठी देखील महत्त्वाचा आहे.

**८. देव:** एपिक्टेटसच्या मते 'देव' व 'जीअस' हे शब्द एकमेकांच्या बदल्यात वापरले जाऊ शकतात. देवाला जीवनाच्या जहाजाचा 'कर्णधार', जीवनातील गोष्टींचा 'दाता' म्हणून चित्रित केले आहे ज्याला आपण सर्व काही देणे लागतो. एपिक्टेटसच्या मते, एक स्टोईक विद्यार्थी देव किंवा विश्वाला दोष देणार नाही किंवा जर त्यांनी स्वतःला देवाला योग्य मार्गाने समजून घेतले असेल तर त्याला त्यांच्यामध्ये दोष सापडणार नाही. याचे कारण असे की जगाची रचना अशा पद्धतीने केली आहे की प्रत्येकाच्या वाटयाला प्रत्येकाच्या योग्यतेनुसार सर्वकाही आहे. एपिक्टेटससाठी जगातील सुव्यवस्था आणि सुसंवाद या बुद्धिमान देवाने राखले आहे.

**९. जीवन:** एपिक्टेटस जीवनासाठी विविध रुपकं देतो - जीवन हा एक सण आहे ज्याचा आपण आनंद घेतला पाहिजे आणि आपल्या वाटेवर येणाऱ्या कोणत्याही गोष्टीसाठी तयार असले पाहिजे, जीवन एक खेळ म्हणून आपण कसे खेळतो या खेळाशी संबंधित आहे, जीवन एक नाटक - जे सिचविते की आपण या जगात आपली भूमिका स्वीकारली पाहिजे आणि आपली पात्रे प्रामाणिकपणे बजावली पाहिजे, जीवन म्हणजे विणकाम जे सांगते की आपल्याकडे असलेल्या संसाधानांसह आपण शक्य तितकी सर्वोत्तम गोष्ट केली पाहिजे, जीवन आणि लष्करी सेवा जिथे आपण सर्वांनी देवाची सेवा करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

## ३.७ पिर्हूनीझम तत्वज्ञान

पिर्हूनीझम हे तात्विक संशयवादाचे स्वरूप आहे जे प्राचीन ग्रीक आणि रोमन जगात उदयास आले. त्याची स्थापना इ. स. पू. च्या चौथ्या शतकात पिर्हुने केली होती. या विचारप्रणाली बद्दलचे ज्ञान सेक्सटस एम्पिरिकसच्या लेखानांमध्ये टिकून आहे जे त्यांनी इसवी सनाच्या उत्तरार्धात आणि तिसऱ्या शतकाच्या सुरुवातीस लिहिले. स्टोईकसीझमप्रमाणेच, या शाळेचे मुख्य उद्दिष्ट युडेमोनिया म्हणजे कल्याण व सौख्य (eudaemonia) होते. ह्या उद्देशाने, पिर्हूनीझम सर्व अस्पष्ट विषयांबद्दल निर्णय स्थगित करण्याचा सल्ला देतो. निर्णयाच्या निलंबनासह समता किंवा अटाराक्सियाची स्थिती प्राप्त होते जी युडेमोनिया प्राप्त करण्याचा मार्ग आहे.

## ३.८ सेक्सटस एम्पिरिकस: संशयवाद

सेक्सटस एम्पिरिकस हा इसवी सनाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकातील पिर्हूनियन संशयवादी होता. त्यांचे पुस्तकं आऊटलाइन्स ऑफ पिर्हुनियन संशयवादावर उपलब्ध संपूर्ण माहिती आहे. पिर्हूनियन संशयवाद केवळ तात्विक, वैज्ञानिक आणि सैद्धांतिक बाबींवरच प्रश्न करत नाही तर त्यावर अजिबात विश्वास नसणे असा दृष्टिकोण देखील समाविष्ट आहे.

ग्रीक भाषेमध्ये, स्केप्टेस्टाय म्हणजे तपास करणे. पिर्हूनियन संशयवादी च्या मते, कट्टर तत्त्वज्ञानांचा असा विश्वास असतो की त्यांनी जर एखाद्या गोष्टीची चौकशी केली तर त्यांनी त्याचा शोध लावला आहे असे त्यांना वाटते. दुसरीकडे, शैक्षणिक संशयवादी

(academic skeptics) मानतात की कुठल्याही गोष्टीबद्दलचे ज्ञान कधीही मिळू शकत नाही. तथापि, एक पिर्हूनियन संशयवादी नेहमी सत्याचा शोध घेतात. अशा प्रकारे, सेक्सटसच्या मते, संशयींना त्यांचे ओळख मिळते. पिर्हूनियन संशयवादी नेहमी उत्तरांच्या शोधात असतात, आणि ह्याचमुळे या विचारप्रणालीचे कोणतेही निश्चित विचारांचे संच नाहीत. अशाप्रकारे याचा तात्विक अर्थ असा आहे की संशयवादी असणे म्हणजे स्वतःला कुठल्याच प्रकारच्या श्रद्धांच्या निश्चित संचाला न मानणे होय. मग संशवाद म्हणजे काय ? सेक्सटसच्या मते, संशयवाद ही एक क्षमता किंवा कौशल्य आहे एक प्रकारचे तत्वज्ञान आहे जे त्याच्या तत्त्वज्ञाने किंवा सिद्धांतांद्वारे ओळखले जात नाही परंतु तात्विक समस्यांकडे बघण्याच्या वृत्तीने ओळखले जाते.

सेक्सटसच्या मते, संशयवादी असा आहे की ज्याच्याकडे कोणत्याही युक्तिवादासाठी तितकेच विरोधी तरीही खात्रीशीर आणि वैध युक्तिवाद शोधण्याचे कौशल्य आहे. आत्मसात कसे होते ? सेक्सटसच्या मते, जेव्हा एखादी व्यक्ती समता किंवा मानसिक शांतता शोधत असते तेव्हा त्या व्यक्तीला एखाद्या विषयाच्या दोन्ही बाजूंना प्रश्न करण्याची किंवा समसेच्या दोन्ही बाजूंसाठी युक्तिवाद करण्याचे कौशल्य प्राप्त होते. सेक्सटसचा असा विश्वास आहे की जगातील गुंतागुंत आपल्याला गोंधळात टाकतात आणि आपल्याला त्रास देतात. उदाहरणार्थ, सेक्स्टस टॅटूचे (tatto) उदाहरण देतो - काही संस्कृतींमध्ये ते निषिद्ध मानले जाते तर इजिप्शियन आणि सुमेरियन संस्कृतींमध्ये ही एक स्वीकार्य प्रथा मानली जाते. अशा पद्धतींमुळे एखादी गोष्ट चांगली की वाईट याचा विचार करण्यात आपल्याला गोंधळ होतो. अशा गोंधळात टाकणाऱ्या परिस्थितींमुळे एखादी गोष्ट चांगली की वाईट याचा विचार करण्यात आपल्याला गोंधळ होतो. अशा गोंधळात टाकणाऱ्या परिस्थितींमुळे एखादी व्यक्ती गोष्टींची चौकशी करू लागते.

सेक्सटचा असा विश्वास आहे की उत्तरांची तपासणी करणाऱ्या व्यक्तीकडे एकल मनाची भावना असते ज्यामुळे त्याला समस्येच्या सर्व बाजू तपासण्यात मदत होते. एकल-बुद्धी एखाद्याला संशयी कौशल्य विकसित करण्यास सक्षम करते जे समान विश्वासार्ह शक्तीसह प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा विचार करण्याची क्षमता आहे. म्हणून जर आपण सत्याचा सतत तपास करत असलो तर आपल्याला सर्व विचारांच्या बाबतीत शांतता लाभते. एखाद्या गोष्टीबद्दल काय विचार केला जातो आणि तो आपल्याला कसा दिसतो यामधील संभ्रम सोडवण्याचा प्रयत्न करणारे संशयवादी उत्तरे शोधू शकले नाहीत. यामुळे त्यांनी त्यांची निकल लावण्याची वृत्ती व प्रयत्न स्थगित केले.

विचारांबद्दलच्या निवाड्याच्या निलंबनामुळे अधिक त्रास झाला नाही तर केवळ शांतात आली. त्यांच्या संशयवादी कौशल्यामुळे, सत्याच्या साधकांना अशी उत्तरे सापडली नाहीत परंतु मतांच्या बाबींवर निर्णय स्थगित करून ते निश्चितपणे मनाच्या समतेपर्यंत पोहोचले.

सेक्सटस एका उदाहरणाच्या सहाय्याने निकालाच्या निलंबनावर शांततेची ही अनपेक्षित प्राप्ती स्पष्ट करतो. अपेलीस एक चित्रकार घोडयाच्या तोंडावर फेस दाखवायचा होता.

अनेक प्रयत्न करूनही तो अयशस्वी झाला आणि शेवटी त्याने हार पत्करली. तो ज्या कापडाने पेंटिंगब्रश साफ करत होता तो कापड घेतला आणि त्याने पेंटिंगवर फेकून दिला. कापड, फेकल्यावर, चुकून घोडयाच्या तोंडावर अपेलीसला पाहिजे तसे फेसाचे तसे प्रतिनिधित्व तयार झाले. यावरून असे दिसून येते की अपेलीसचा संघर्ष शांत झाला जेव्हा त्याने खरेतर संघर्ष करणे थांबवले आणि गोष्टी जश्याच तश्या होऊ दिल्या.

## ३.९ सारांश

ॲरिस्टॉटलचे सद् वस्तुमीमांसा हे वस्तूंच्या स्वरूपाचे आणि स्वतः ह्याचे अभ्यास आहे. आनुभविक जगाच्या पातळीवर सद् वस्तुमीमांसीक चर्चा करून तो हे दाखवण्याचा प्रयत्न करतो की प्रत्येक करतो की प्रत्येक अस्तित्व हे उद्दिष्टाशिवाय नाही. त्याचे तत्वमीमांसा विविध संकल्पनाचे परीक्षण करते जसे की पदार्थ, कारण किंवा स्पष्टीकरण व बदलाचे उद्देश. अस्तित्वात असलेल्या प्रत्येक वस्तूच्या जीवनात एक टेलॉस असते आणि अशा प्रत्येक गोष्टीचे उद्दिष्ट हे आहे की ते टेलोस जे संभाव्य स्वरुपात आहे ते प्रत्यक्षात आणणे. एखाद्याचे पूर्ण स्वरूप ओळखणे ही युडेमन जीवनासाठी आवश्यक अट आहे. हाच तो मुद्दा आहे जिथून पुढे ॲरिस्टॉटलचे सद् वस्तुमीमांसा त्याच्या नीतिशास्त्राशी मिळते.

स्टोईक शिक्षक म्हणून एपिक्टेटसचे जीवन तात्विक ज्ञानासाठी वैयक्तिक शोध मानले जाऊ शकते. त्यांनी आपले जीवन इतरांचे प्रबोधन करण्यासाठी वाहून घेतले. देवाशी नातेसंबंध, भावनिक अनुकुलता, सद्गुणांमधून आत्मविकास, सांसारिक जीवनातील भौतिक विचलनांपासून अलिप्तता ही त्याच्या स्टोईक विचारांची मुख्य विषय होते. त्यांनी या शिकवणी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्याचे सुनिश्चित केले आणि त्यांना त्यांच्या धारणा, निर्णय सुधारण्यासाठी आणि युडेमोन जीवनाचे ध्येय साकारण्यासाठी मार्गदर्शन केले.

सेक्सटस ने सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या निश्वततेबद्दल मोठी चिंता व्यक्त केली. त्यांच्या मते, कोणत्याही दाव्याचा निकल देण्यापूर्वी त्यावर विश्वास ठेवला जाऊ नये. सत्य सापडल्याचा दावा करणाऱ्यांना सत्याचा निकषच सापडला आहे. कोणताही शोधलेला दावा खरा किंवा खोटा ठरवला जाऊ नये. याचा अर्थ असा नाही क तो शैक्षणिक संशयवाद्यांप्रमाणे ज्ञानाच्या शक्यतेवर विश्वास ठेवत नाही. तो केवळ विश्वास सोडण्याचा आग्रह धरतो की काहीही माहित होऊ शकता की नाही.

सेक्सटस असा युक्तिवाद करतात की कुतूहल, एखाद्याला उत्तरे शोधण्यास प्रोत्साहित करतो, केवळ ह्या अपेक्षेने की उत्तरे सापडली की आनंदयी शांतता. तथापि, या प्रक्रियेत एखाद्याला अपेक्षित उत्तरे सापडली की आनंदयी शांतता. तथापि, या प्रक्रियेत एखाद्याला अपेक्षित उत्तरे सापडत नाहीत, ह्याउलट त्या व्यक्तीला' हाताशी असलेल्या विचारांबद्दलचे निर्णय स्थगित करण्यास भाग पडतो आणि तरीही अनपेक्षितपणे शांतता लाभते. सेक्सटस नुसार निर्णय निलंबित करण्याची वृत्ती कठीण नाही आहे कारण आपण असेही कोणत्याही स्थिर विश्वासाशिवाय किंवा श्रद्धेशिवाय जगू शकते.

**तुमची प्रगती तपासा :**

१) व्यक्तता आणि शक्तीगर्भता ह्या ॲरिस्टॉटलियन तपशीलवार चर्चा करा.

२) एपिक्टेटसच्या स्टोईक शिकवणींची तपशीलवार चर्चा करा.

३) सेक्सटस एम्पिरिकसच्या संशयवादाबद्दल तपशीलवार माहिती द्या

४) रूपबंध आणि जडद्रव्याच्या संदर्भात व्यक्तता आणि शक्तीगर्भता यांच्यातील भेदाची तपशीलवार चर्चा करा.

५) एपिक्टेटसच्या स्टोईसिझममधील मुख्य कल्पना काय आहेत ?

६) सेक्सटस एम्पिरिकसच्या संदर्भासहित पिर्हूनियन संशयवादावर चर्चा करा.

## ३.१० संदर्भ


- दीप्ती गंगावणे, युरोपीय तत्त्वज्ञानाच्या पाऊलखुणा, कलासक्त, पुणे, ISBN13: 9788194402213

- The Discources of Epictetus, revised translation by Robin Hard, with an introduction by Chirstopher Gill, London : Everyman, 1995

- Annas, J., Barnes, 2000, Sextus Empiricus: Outlines of Scepticism (Cambridge Texts ib the History of Philosophy), Cambridge: Cambridge University Press, second edition.


❖❖❖❖

# ४

# पीटर अबेलर्ड : तर्क (REASON) आणि विश्वास/ श्रद्धा (FAITH) यांच्यातील संबंध

**घटक रचना :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ तर्क आणि श्रद्धा यांच्यातील संबंध

४.३ अशरींच्या शाळेची वैशिष्टये

४.४ धर्मशास्त्रावरील विचार

४.५ तत्त्वज्ञानावरील विचार

४.६ सारांश

४.७ संदर्भ


## ४.० उद्दिष्टे

- यहूदी तत्त्वज्ञानातील पीटर अबेलर्डचे महत्त्वपूर्ण योगदान समजून घेण्यासाठी.
- अबेलर्डचे तर्क आणि श्रद्धेचा सलोखा समजून घेण्यासाठी.
- मुताझिला आणि अशरी शाळांच्या भिन्न तात्विक दृष्टिकोनांमुळे इस्लामिक जगामध्ये होणारे महत्त्वपूर्ण बदल समजून घेणे.
- मुताझिला शाळेची विशिष्ट वैशिष्टये समजून घेणे
- अशरी शाळेची विशिष्ट वैशिष्टये समजून घेणे
- यहुदी नैतिकता आणि विचारांमध्ये मायमॉनीडीसचे अद्वितीय योगदान घेणे.
- नकारात्मक धर्मशास्त्राद्वारे (negative theology) देवाबद्दल मायमॉनीडीसचे मत समजून घेणे.
- तत्वज्ञानाच्या उपचारात्मक स्वरूपावर मायमॉनीडीसचे मत समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

मध्ययुगीन तत्त्वज्ञान हे विशेषतः ह्या नावाने ओळखले जाते कारण ते सुमारे ५ व्या शतकात पश्चिम रोमन साम्राज्याच्या पतनापासून ते १३ व्या व ११ व्या शतकात पुनर्जागरण होईपर्यंत उदयास आले. हे प्रामुख्याने प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतींचा पुनर्शोध करण्यासाठी ओळखले जाते जे शास्त्रीय कालखंडात विकसित झाले. मध्ययुगीन तत्वज्ञानाचे तर्क आणि श्रद्धा, देवाचे अस्तितत्व, धर्मशास्त्राचा उद्देश आणि सद् वस्तुमीमांसा इत्यादींमधील संबंधांच्या धर्मशास्त्रीय समस्यांवर लक्ष केंद्रित केले.

पीटर अबेलर्ड (c. 1079 - 21 एप्रिल 1142) हे महान फ्रेंच कॅथलिक तत्त्वज्ञ, तर्कशास्त्रज्ञ आणि धर्मशास्त्रज्ञ होते. त्यांच्या दोन लिखाणामध्ये लॉजिका 'इनग्रेडेंटिबस' आणि डायलेक्टिका यांचा समावेश आहे. त्यांना नामवादाचे (nominalism) जनक म्हणूनही ओळखले जाते ज्यानुसार केवळ विशिष्ट अस्तित्त्वात आहेत आणि केवळ शब्द (नाम) सार्वत्रिक आहेत. तर्काद्वारे तसेच भावनांद्वारे देवाला जाणता येते, असे मत त्यांनी मांडले. धर्मशास्त्र हा शब्द आधुनिक अर्थाने वापरणारे अबेलर्ड बहुधा पहिले होते जेव्हा त्यांनी तर्क आणि श्रध्येच्या संबंधासाठी युक्तिवाद केला.

मोझेन बेन मैमन (1138-1204) हे मायमॉनीडीस किंवा रामबाम म्हणून ओळखले जाणारे मध्ययुगीन यहुदी तत्त्वज्ञ आणि तोराह विद्वान होते. यहुदी कायदा आणि नैतिकता या विषयावर त्यांनी लिहिलेल्या लेखनाला मोठी प्रशंसा मिळाली. त्यांनी इजिप्त आणि मोरोक्कोमध्ये राबाय, चिकित्सक आणि तत्त्वज्ञ म्हणून काम केले. त्यांनी यहुदी कायद्यावर चौदा खंडांचे मिश्रेह तोराह नावाचे पुस्तकं लिहिले, जे हलाखाचे संहिताकरण होते ज्याचे यहुदी समुदायामध्ये महत्त्वपूर्ण स्थान होते. त्यांचे 'द गाइड ऑफ द पर्प्लेक्सड' हे पुस्तक यहुदी धर्मशास्त्र, विचार आणि अभ्यासाचे सर्वोत्तम पुस्तक आहे. त्यांच्यावर ॲरिस्टॉटल, अल- फराबी, इब्न सिना आणि त्याचे समकालीन इन्ब रुश्द यांचा प्रभाव होता. यहुदी आणि इस्लामिक जगात ते एक प्रमुख तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जात होते.

## ४.२ तर्क आणि श्रद्धा यांच्यातील संबंध

धर्माच्या बाबतीत, पीटर ॲबेलर्डचे मत होते की तर्क विश्वासाचा पाया आहे. तथापि, श्रद्धेबद्दलचे त्यांचे मत आणि श्रद्धेच्या बाबतीत तर्काच्या स्थानाची व्याप्ती हे सूचित करते की ते केवळ तर्कशुद्ध व्यक्ति नसून तर श्रद्धेला मानणारे व्यक्ति देखील होते.

अबेलर्डच्या मते, श्रद्धेच्या बाबतीत तर्क याला स्थान असते. परंतु त्याची भूमिका केवळ मर्यादित असते. तथापि धर्मशास्त्रात विचारवंताचे दोन पंथ अस्तित्वात आहेत - पहिले, द्वंदविरोधी (anti-dialecticians) आणि दुसरे म्हणजे, छद्य-द्वंद्ववादी (pseudo dialecticians). विरोधी द्वंद्ववादी तर्क आणि श्रद्धा यांच्या संश्लेषणाचे खंडन करतात आणि असे मानतात की श्रद्धेच्या बाबतीत तर्काला स्थान असू शकत नाही. दुसरीकडे छद्य-द्वंद्ववादी तर्क आणि श्रद्धेच्या संश्लेषणास अनुकूल आहेत आणि मानतात की

विश्वासाच्या बाबी समजून घेण्यासाठी कारण हे एकमेव साधन आहे. छद्म-द्वंदवादींच्या मते, आपण केवळ तेच स्वीकारले पाहिजे जे तर्कसमर्थित आहे. अबेलर्डला श्रद्धेच्या बाबतीत तर्काची भूमिका आहे विश्वास आहे असा विश्वास होता आणि याच वस्तुस्थितीमुळे द्वंदविरोधकांचा विरोध पत्करावा लागला. तर छद्म-द्वंद्ववादी लोकांनी श्रद्धेच्या बाबतीत तर्काला केवळ मर्यादित भूमिका दिल्याबद्दल अबेलर्डचा विरोध केला.

द्वंद्वविरोधकांच्या मते, कोणत्याही धार्मिक विधानाचा अर्थ मुळात अतिशय सोपा असतो. त्यामुळे सोप्या अर्थाशिवाय आणखी काही समजण्यासारखे नाही आणि म्हणूनच ते समजून घेण्यासाठी तर्क वापरण्याची  गरज नाही. अबेलर्ड धार्मिक अथवा श्रद्धेशी संबंधित विधाने समजून घेण्यासाठी द्वंद्वात्मक पद्धतीच्या बाजूने होते. त्यांच्या मते अश्या विधानांचे कधीच फक्त साधे अर्थ नसते. अशी विधाने ज्या संदर्भात वापरले जातात त्या संदर्भात त्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी विविध संदर्भासह सत्यापित केले पाहिजे. पडताळणी केल्यावर असे लक्षात येते की समान शब्द किंवा वाक्यांचे वेगवेगळ्या संदर्भात वेगवेगळे अर्थ आहेत. अशा प्रकारे विविध संदर्भांमध्ये अर्थाचे विश्लेषण करण्यासाठी, श्रद्धेच्या बाबतीत, तर्क आवश्यक आहे.

दुसरीकडे, छद्म-द्वंद्ववादी लोकांचा असा विश्वास होता की श्रद्धेच्या बाबतीत तर्कसाठी केवळ मर्यादित भूमिका असू शकत नाही. खरेतर त्यांच्यासाठी तर्क हे धार्मिक विधानांचा अर्थ समजून घेण्याचे एकमेव साधन आहे. अबेलर्डने त्यांना उत्तर देत म्हटले की सर्व समस्या केवळ तर्काने स्पष्ट केले जाऊ शकत नाही. मानवी बुद्धीच्या स्वतःच्या मर्यादा आणि क्षमता आहेत आणि तसेच काही अर्थ किंवा सत्य त्या मर्यादेच्या बाहेर आहेत. तरीही, जरी श्रद्धेच्या विधानांची मानवी बुद्धी पलीकडे वास्तविकता असली तरीही, ॲबेलर्डचा ठाम विश्वास होता की ते विश्वासाच्या पलीकडे असू शकत नाही. ख्रिश्चन धर्मातील पवित्र त्रैक्याचे (Holy Trinity) उदाहरण घेऊन तादात्म्याचे सिद्धांत सांगत अबेलर्ड हे स्पष्ट करतात. ह्या त्रेक्याचे तीन घटक आहेत - पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा हे एकमेकांसारखेच आहेत कारण त्यांचे अस्तित्व एकच आहे ते म्हणजे देव. तसे असतानाही ते एकसारखे नाहीत कारण ते तीन भिन्न अस्तित्व आहेत आणि परिभाषानुसार पिता म्हणजे पुत्र नसू शकतो किंवा त्याचप्रमाणे पवित्र आत्मादेखील असू शकत नाही. तथापि, जरी ते संख्यात्मकदृष्टया तीन असले तरी ते संख्यात्मकदृष्टया एकच देव आहेत. आणि जर तास नसेल तर एक देव नसून तीन देव असतील. तरीही पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांना वेगवेगळ्या प्रकारे लागू होणारे गुण देखीलदेवाला एकत्रितपणे लागू होत नाहीत.

ॲबेलर्ड म्हणतात की या समज पलीकडे कोणीही विचार करू शकत नाही. तर्क केवळ त्या प्रमाणात विश्लेषणाचे प्रमाणीकरण करते, त्यापलीकडे सर्व काही श्रद्धेच्या आधारावर अवलंबून असते.

## ४.३ अशरींच्या शाळेची वैशिष्टये

अशरी शाळेचे मुख्य वैशिष्टय शास्त्रातून मिळालेल्या परंपरानिष्ठ कट्टर अज्ञांवर आधारित आहे. अशरींच्या मते ईश्वराच्या अद्वितीय वैशिष्ट्यांचे आकलन मानवी समजाच्या पलीकडे आहे. त्यांच्या मते, कुराणमध्ये नमूद केलेले सर्व गुण आणि नावे ही देवाची वर्णने आहेत परंतु ते देवाच्या मूळ सारापासून वेगळे आहेत.

या विचारप्रणालीच्या मते, चांगले, वाईट, योग्य आणि अयोग्य ही नैतिक मुल्ये केवळ वस्तुनिष्ठ वास्तव नाहीत. कुराणमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सर्वशक्तिमान आणि परोपकारी देवाच्या आज्ञेतून स्पष्ट झालेल्या गोष्टी चांगल्या, योग्य आणि न्याय आहे, तर वाईट, चुकीचे किंवा अन्यायकारक ते आहे ज्याला देव मनाई करतो. देव न्यायी असल्याने काही अन्यायकारक करू शकत नाही असा विश्वास ठेवणाऱ्या मुताझिलाच्या विपरीत, अशरी लोकांचा असा विश्वास आहे की देव सर्व सामर्थ्यवान आहे, आणि तसे असताना त्याच्याकडे कुठलीही आज्ञा देण्याची किंवा कार्य करण्याची क्षमता त्याच्याकडे आहे. जे देव करतो ते कधीकधी मानवी समजच्या पलीकडे असल्यामुळे माणसाला ते अन्यायकारक किंवा चिकीच वाटू शकत. कारण त्यांचा असा विश्वास आहे की मानवाला जे अन्यायकारक वाटते ती केवळ चुकीची मानवी समज आहे. कुराण आणि मोहम्मद नेहमीच बौद्धिक अन्वेषणचे प्रमाणिकरण करतात, म्हणून कुराण आणि हदीस यांचे जुने अर्थ सातत्याने विकसित केले पाहिजेत आणि त्यांचा पुन्हा अर्थ लावला पाहिजे.

अशरींचा ठाम विश्वास आहे की देव सर्व जाणणारा आणि क्षमा करणारा असल्यामुळे नरकात असलेल्या लोकांना क्षमा करतो व पुण्यासाठी बक्षीस देतो. त्यांच्या मुळात कुराणच्या अनिर्मिततेवर विश्वास आहे; तथापि, जेव्हा ते लिखित स्वरूप घेते तेव्हा ते तयार होते. देवाची पवित्र नावे आणि गुणधर्मांमध्ये कायमस्वरूपी, आरंभ किंवा अंत नसलेला, निरपेक्ष, स्वतंत्र आणि एकता यांचा समावेश होतो. त्यांच्या मते खरा मुस्लिम होण्यासाठी इस्लामच्या पाच स्थंभांवर विश्वास ठेवला पाहिजे- शहादा (धर्मवर श्रद्धा ), नमाज, जकात (दान), सौम (उपवास), हज (तीर्थयात्रा). याशिवाय इस्लामच्या सर्व पैगंबरांवर आणि देवदूतांवर देखील विश्वास ठेवला पाहिजे.

अशरींच्या आग्रह आहे की मानवी इच्छा स्वातंत्र्य ही केवळ विचार आणि हेतू या बाबींमध्ये असते, कृतीत नाही. मनुष्याला ज्ञात असलेल्या सर्व शक्य मानवी कृती जरी देवाने निर्माण केल्या असतील, तरीही त्या कृतींची आणि त्यांच्या परिणामांची जबाबदारी ज्याने ती कृती प्राप्त केली आहे त्याच्यावरच आहे.

## ४.४ धर्मशास्त्रावरील विचार

मायमॉनीडीसच्या मते, तत्त्ववेत ज्याला आवश्यक अस्तित्व म्हणून संबोधतात ते अब्रहमच्या देवापेक्षा वेगळे नाही. तो देवामध्ये असे गुण किंवा गुणधर्म असल्याची कल्पना करतो जे देवाच्या मानवनिर्मित वर्णनापेक्षा अगदी भिन्न आहेत. या विशिष्टतेमुळे, तोराह आज्ञा देतो की एखाद्याने केवळ देवावर प्रेम आणि आदर करू नये तर त्याचे भय देखील

बाळगले पाहिजे. मायमॉनीडीसाठी, तोराह ता मतावर आधारित आहे की, देवावर प्रेम, करण्यासाठी एखाद्याने देवाच्या कृतींचा विचार केला पाहिजे आणि सृष्टीतील सुव्यवस्था आणि सुसंवादाची प्रशंसा केली पाहिजे. त्याच्या सृष्टीतील महानता ओळखून, देवाच्या तुलनेत माणूस किती नगण्य आहे याची जाणीव होऊ शकते.

मायमॉनीडीसचा तात्विक दृष्टीकोन विद्वानवादाच्या तत्त्वाशी अगदी सारखाच होता. टॅल्मुडच्या शिकवणी समजून घेण्यासाठी ते ॲरिस्टोटेलियन विज्ञानावर विसंबून राहिले. या मतानुसार, देवाने प्रकट केलेली सत्ये आणि मनुष्याच्या वैज्ञानिक आणि तात्विक निष्कर्षांमध्ये कोणतीही तफावत असू शकत नाही.

त्यांच्या धर्मशास्त्रीय विचारांची सुरुवात देवाच्या व्याख्येने होत नाही, तर निर्माण केलेल्या जगाच्या वर्णनाने होते. देवाचे सार अस्तित्व सूचित करते हे दाखवण्याऐवजी तो जगाचे सुव्यवस्थित अस्तित्व देवाचे अस्तित्व सूचित करतो हे दाखवतो. जगाचे मर्यादित स्वरूप एका अमर्याद आणि असीम अस्तित्वाकडे निर्देश करते. अशा प्रकारे मायमॉनीडीस विश्वाच्या क्रयातून सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ देवाचे अस्तित्व प्राप्त करतात. त्याच वेळी, मायमॉनीडीस ठामपणे सांगतात की जरी हे देव आहे हे दाखवण्यासाठी पुरेसा आधार देत असले तरी ते देव काय आहे हे दर्शवत नाही. याचे कारण असे की देवाला समजून घेण्यासाठी आपण जी वर्णने वापरतो ती मानवी भाषेतून घेतली गेली आहे ज्याची व्याप्ती मर्यादित आहे आणि त्यामुळे देवाचे संपूर्ण सार समजू शकत नाही. अशा प्रकारे देवाला मानवनिर्मित कोणत्याही एका वर्गात किंवा संकल्पनेत टाकता येत नाही. याचा अर्थ देवाची सर्व वर्णने निरर्थक आणि असत्य आहेत का ? मायमॉनीडीस आग्रहाने सांगतात की देवाचे त्याच्या खऱ्या सारात अचूक वर्णन करण्यासाठी एखाद्याने नाराकार्थी बोलले पाहिजे. उदाहरणार्थ 'देव सामर्थ्यवान आहे' हे म्हणण्यापेक्षा असे म्हटले पाहिजे की 'देवाला शक्तीची कमतरता नाही. याचा अर्थ देव या शब्दाच्या मानवी अर्थाने सामर्थ्यवान नाही किंवा तो शक्तीहीन नाही, उलट त्याच्याकडे शक्तीची कमतरता नाही. अशी नकारात्मक वाक्ये देवाच्या सामर्थ्याचे वर्णन मर्यादित मानवी सीमांमध्ये मर्यादित करत नाहीत. अशा नकारांचा अर्थ असा होतो की देव हा किंवा तो नाही तर याशिवाय दुसरा आहे. मानवी अभिव्यक्ती आपल्याला अपयशी ठरतात आणि त्यामुळे नेहमी गोष्टींचे सार समजत नाहीत. यावरून हे दिसून येते की देव मानवी समजांच्या पलीकडे आहे. मायमॉनीडीसच्या या मताला नकारात्मक धर्मशास्त्र म्हणतात.

## ४.५ तत्त्वज्ञानावरील विचार

मायमॉनीडीस सर्वोच्च परिपूर्णता प्राप्त करण्याचा आग्रह धरतात जी बौद्धिक आहे आणि जे ती प्राप्त करण्याचे मार्ग सुचवते. हे योग्य वर्तनाद्वारे प्राप्त केले जाऊ शकते, मग ते व्यक्तीसाठी किंवा समुदायासाठी असो. राजकीय स्तरावर, राज्याने केवळ जीवन आणि मालमत्तेचे संरक्षण केले पाहिजे असे नाही तर आपल्या नागरिकांना धार्मिक बाबींमध्ये शिक्षित केले पाहिजे. वैयक्तिक स्तरावर, नैतिकतेद्वारे आकांक्षा नियंत्रित करून आणि विज्ञान आणि तत्त्वज्ञान रस घेऊन सर्वोच्च परिपूर्णता प्राप्त केली जाऊ शकते.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटलप्रमाणे, मायमॉनीडीसचाही असा विश्वास आहे की शरीराप्रमाणेच आत्मा देखील रोगग्रस्त किंवा निरोगी असू शकतो. आजारी शरीराला जशी वैद्यांची गरज असते तशीच आजारी आत्म्यांनी सुज्ञ राज्यकर्त्यांचा शोध घेतला पाहिजे. त्याचा असा विश्वास आहे की यहुदी कायदा आत्मा समजून घेण्यावर आणि त्याची परिपूर्णता शोधण्यावर आधारित आहे. ॲरिस्टॉटलप्रमाणे ते सुवर्णमध्य (The Golden Mean) साधण्याचा आग्रह धरतो. ॲरिस्टॉल प्रमाणे, मायमॉनीडीस निरिक्षण आणि सरावाद्वारे व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा एक भाग बनलेल्या चारित्र्याचा सद्गुणांभोवती त्याचे विचार विकसित करतात. अशाप्रकारे एक शहाणा शासक नेहमी सद्गुणी कृतींची शिफारस करतो आणि आजारी आत्म्याला बरे करण्यासाठी चुकीच्या सवयींना प्रतिबंध करतो. मायमॉनीडीससाठी, टोकाच्या दरम्यानची सरासरी गाठणे हे देवाचे अनुकरण करण्यासारखे आहे कारण देवाची कामे अतिरेक किंवा कमतरतेच्या शक्यतेशिवाय परिपूर्ण आहेत.

यहुदी कायदा देखील परिपूर्णतेसाठी अत्यंत ब्रह्मचर्य किंवा उपासमारीची आज्ञा देत नाही. याचे कारण असे की जे गुण खरोखर आवश्यक आहेत ते म्हणजे चांगले निर्णय, दयाळूपणा आणि करुणा आहेत. मध्यम स्वभावाच्या उद्देशाने, यहुदी कायदा धर्मादाय, पालकांचा सन्मान, लैंगिक संयम, द्वेष आणि सूड टाळणे, या बद्दल बोलतो.

तथापि, मायमॉनीडीस देखील उपचारात्मक कारणांसाठी काहीवेळा टोकाची निवड करण्याची गरज ओळखतात. मायमॉनीडीसच्या मते, साधनांचा अभ्यास करणारा आणि ज्याचे चारित्र्य गुणधर्म संतुलित आहेत त्याला शहाणा (हखम) म्हटले जाते, परंतु परिस्थितीची मागणी असताना टोकाची निवड करणारी व्यक्ती पवित्र (हसीद) म्हणून ओळखली जाते. म्हणून धार्मिकता हे खऱ्या अर्थाने एक उत्कृष्ट वैशिष्टय आहे कारण त्यात सरासरी ओलांडण्याची आवश्यकता असते. रागाच्या विश्लेषणात, ॲरिस्टॉटलचा असा विश्वास आहे की ज्या व्यक्तीला योग्य वेळी आणि योग्य व्यक्तीवर राग येतो तो प्रशंसनीय आहे कारण तो खऱ्या अर्थाने सरासरी गाठतो. अपमान सहन करणे जितके चुकीचे आहे तितकेच हिंसक असणे देखील चुकीचे आहे. त्यामुळे योग्य प्रमाणात राग हा एक गुण आहे. मायमॉनीडीससाठी, राग हा एक अत्यंत वाईट गुणधर्म आहे म्हणून अशा लक्षणांना पूर्णपणे टाळणे हाच एक सद्गुण आहे. काही भावनांच्या बाबतीत अतिरेक असणे हे मायमॉनीडीसने चांगले मानले आहे आणि असे केल्याने त्याचा मानसिक आरोग्यावर काही परिणाम होत नाही.

मायमॉनीडीससाठी, सर्वोच्च ध्येय म्हणजे केवळ ॲरिस्टॉटलने सुचविलेले व्यावहारिक शहाणपण नाही तर देवासमोर नम्रता आणि लाज हे आहे. भगवंत भावनांच्या पलीकडे असल्याने भावनांच्या पलीकडे जाण्याचे आपले ध्येय असले पाहिजे. तद्वतच, एखाद्या व्यक्तीने पूर्णपणे वैराग्यपूर्ण मार्गाने वागले पाहिजे आणि भावनांनी प्रभावित न होता परिस्थितीच्या गरजेनुसार निवड केली पाहिजे. त्यामुळे केवळ टोकाची निवड करणेच नव्हे तर कधी कधी त्याच्याही पलीकडे जाणे हा मायमॉनीडीसच्या व्यावहारिक तत्त्वज्ञानाचा मुख्य मुद्दा आहे. अशा व्यक्तींच्या निर्णयक्षमतेवर परिणाम होत नाही, फक्त ते कोणत्याही विशिष्ट वर्ण लक्षणातून येत नाहीत.

प्लेटोप्रमाणे, मायमॉनीडीस असा विश्वास आहे की तत्त्वज्ञानाचे उपचारात्मक प्रभाव आहेत. मायमॉनीडीसचे म्हणणे आहे की लोक सहसा काल्पनिक आणि तात्पुरत्या गोष्टींसाठी एकेकाळी महत्त्व दिले होते त्या महत्त्वाच्या नव्हत्या. मायमॉनीडीसच्या मते, तत्त्वज्ञान आपल्याला भौतिक लाभांपासून अलिप्त राहण्यास आणि बौद्धिक आणि नैतिक परिपूर्णतेवर लक्ष केंद्रित करण्यास शिकवते. नैतिक परिपूर्णता ही केवळ बौद्धिक परिपूर्णतेसाठी आवश्यक असलेली अत नाही तर बौद्धिक परिपूर्णता प्राप्त झाल्यानंतर, म्हणजे हे लक्षात आल्यावर की पृथ्वीवरील वस्तू शाश्वत नाहीत, त्याच्या वर्तनात परिवर्तन होईल. अशी व्यक्ती विस्मय आणि आदराच्या स्थितीत शक्य तितका वेळ घालवेल. अशा स्थितीत नैतिक आणि बौद्धिक परिपूर्णता यातील भेदही नाहीसा होतो. मायमॉनीडीसचा तत्त्वज्ञानाच्या उपचारात्मक क्षमतेवर विश्वास आहे कारण भौतिक जगाबद्दलच्या चुकीच्या दृष्टीकोनातून आजारी आत्म्यांना बरे करण्याची क्षमता, निर्णयातील त्रुटी आणि नैतिक परिपूर्णतेद्वारे व्यक्तीला बौद्धिक परिपूर्णतेच्या ध्येयाकडे घेऊन जाऊ शकते.

## ४.६ सारांश

पीटर ॲबेलर्ड हा केवळ तर्कशुद्ध व्यक्ति नसून तर श्रद्धेला मानणारे व्यक्ति देखील होते. जरी तो श्रद्धेच्या बाबतीत तर्काला स्थान देण्यासाठी ओळखला जात असला तरी, त्याने तर्काच्या मर्यादा ओळखल्या आणि श्रद्धेचे क्षेत्र तर्काच्या क्षेत्रापेक्षा भव्य असल्याचे स्वीकारले. धार्मिक प्रश्नांच्या चौकशीच्या बाबतीत त्यांनी तर्कशक्तीचा मध्यम वापर करण्याचा आग्रह धरला. धर्मशास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञ यांना त्यांच्या मर्यादापलीकडे ढकलणारे सर्वात धाडसी धर्मशास्त्रात तसेच मध्ययुगीन काळातील तर्कशास्त्रज्ञ त्यांचे वर्णन योग्यरित्या केले जाते. ते त्यांच्या बुद्धी, प्रतिभा आणि वादविवाद क्षमतेसाठी ओळखले जात असे. तर्क आणि विश्वास / श्रद्धा यांच्यातील संबंध दाखवून, आधुनिक अर्थाने धर्मशास्त्र हा शब्द वापरणारे ते पहिले ठरले.

इस्लामच्या अशरी आणि मुताझिला शाळेने धर्मशास्त्रीय समस्यांबद्दल विचार करण्याचे त्यांचे स्वतःचे अनोखे मार्ग विकसित केले. या शाळांमधील मुख्य फरक मानवी कृती स्वतंत्र्याच्या चर्चेवर केंद्रित आहे, अशरी, इच्छा स्वातंत्र्य बद्दल मुताझिलाच्या मतांचे खंडन करतात. त्यांच्या मते, मानवाला काही कृती स्वातंत्र्य असेल किंवा नसेल पण त्यांना फक्त संपूर्ण विचार स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य आणि न्याय हे फक्त देवाचे क्षेत्र आहेत. त्यामुळे मानवामध्ये कोणतीही कृती निर्माण करण्याची शक्ती नाही.

दुसरे, म्हणजे मुताझिलाच्या मते, देव श्रद्धा असणाऱ्यांना स्वर्ग देतो आणि पाप्याला नरकाची शिक्षा देतो. देव अन्यायकारक असे काहीही करू शकत नाही. अशरी, मुताझिलाच्या विपरीत, देवाच्या कृती किंवा आज्ञा मानवी समजण्याच्या पलीकडे आहेत असे मानतात. मानवी बुद्धी दैवी न्याय समजू शकत नाही. त्यामुळे काहीवेळा देव सर्व शक्तिशाली आणि सर्वज्ञ असल्यामुळे आपल्यासाठी अन्यायकारक वाटेल असे काहीतरी करू शकतो किंवा आज्ञा देतो परंतु ती आपल्या समजुतीतील चूक आहे. देव देखील

नरकात असलेल्या लोकांच्या पापांची क्षमा करू शकतो. शेवटी, त्यांचा असा विश्वास आहे की देव जे काही करतो ते न्याय आणि योग्य असते.

मायमॉनीडीसने आपल्या धर्मशास्त्राद्वारे अनेक तत्त्वज्ञांवर विशेषतः अल्बर्टस मॅग्नस, ऍक्विनस आणि डन्स स्कॉटसचा प्रभाव पाडला आहे. तो यदुही विद्वान म्हणून प्रसिद्ध होता. यदुही धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञानातील त्यांच्या संपूर्ण कार्यात त्याचे मुख्य उद्दिष्ट ॲरिस्टॉटेलियन तत्त्वज्ञान आणि विज्ञानाचा तोराहच्या शिकवणीशी समेट करणे हे होते. तत्त्वज्ञानाकडे उपचारात्मक दृष्टिकोन आणि नकारात्मक धर्मशास्त्र त्यांचा यदुही समुदायातील या क्षेत्रांकडून नूतनीकरणाचा दृष्टीकोन प्रदान करतो. त्याचे कार्य मिश्रेह तोराह हे यदुही कायदा आणि नैतिकतेचे सर्वात तार्किक, अचूक आणि अधिकृत संहिताकरण राहिले आहे.

**तुमची प्रगती तपासा :**

१) पीटर ॲबेलर्ड यांनी मांडलेल्या ट्रक आणि श्रद्धा / विश्वास यांच्यातील संबंधावर चर्चा करा.

२) अशरी शाळेच्या वैशिष्ट्यांची तपशीलवार चर्चा करा.

३) मुताझिला आणि अशरी शाळेच्या विशिष्ट वैशिष्ट्यांबद्दल तपशीलवार चर्चा करा.

४) मायमॉनीडीसच्या तत्त्वज्ञानावरील महत्त्वपूर्ण मतांची तपशीलवार चर्चा करा.

५) पीटर अबेलर्ड श्रद्धेच्या बाबतीत तर्काची भूमिका कशी स्पष्ट करतात ?

६) मानवी इच्छा-स्वातंत्र्य विशेष संदर्भात मुताझिला आणि अशरी शाळांच्या वैशिष्ट्यांमधील फरक मांडा

७) मायमॉनीडीसने समोर आणलेल्या तत्त्वज्ञानाच्या उपचारात्मक स्वरुपाची चर्चा करा

८) मायमॉनीडीसचे नकारात्मक धर्मशास्त्र स्पष्ट करा.

## ४.७ संदर्भ


- दीप्ती गंगावणे, युरोपीय तत्त्वज्ञानाच्या पाऊलखुणा, कलासक्त, पुणे, ISBN13: 9788194402213

- Mc Callum, James Ramsay, 1948, Abelard's Christian Theology, Oxford: Blackwell. (Includes substantial selections from Abelard's Theologia Christiana.)

- Martin, R. C.; M. R. Woodward; D. S. Atmaja (1997). Defenders of Reason in Islam: Mu'tazilism from Medieval School to Modern Symbol. Oxford, England: Oneworld Publications

- Frank, Richard M. (2016) [2008]. Gutas, Dimitri (ed.). Classical Isamic Theology: The Ash'arites. Texts and Studies on the Development and History of Kalam. Variorum Collected Studies Series. Vol. III. Abingdon, Oxfordshire:Routledge. ISBN 978-8607-8979-6 Pines, S. (trans.), The Guide of the Perlpexed, Chicago: University of Chicago Press, 1963

❖❖❖❖